महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

Vol : 52 | Issue : 08 | Mumbai | Marathi Monthly | May 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30/-

राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद

६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा

महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा



डायल ११२ : अनोखी यशोगाथा

उत्तम शैक्षणिक संस्थेची निवड कशी करावी?



उच्चपदाकडे नेणारा राजमार्ग

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

आता दक्षता पीडीएफ स्वरूपात महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर मोफत उपलब्ध!

S.B.Collect

छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी
https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php
अथवा
खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.

दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त

वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine

YouTube MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!

मे २०२६ । वर्ष ५२ वे । अंक ०८ वा

मार्गदर्शन

सदानंद दाते
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

मो. सुवेज़ हक
पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक
विजय मनोहर खरात
सहायक पोलीस महानिरीक्षक

अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन
सुरेंद्र बनगे
कार्यालय अधीक्षक

पत्रव्यवहारासाठी पत्ता
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

वितरण व्यवस्था
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

मांडणी, मुद्रण व प्रकाशन
विजय मनोहर खरात यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.

संपादक : **विजय मनोहर खरात**
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.

संपादकीय...

दक्षताच्या सर्व वाचकांना नमस्कार. १ मे रोजी साजऱ्या होणाऱ्या महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा. विविध विषयांनी सजलेला, पोलीस दलातील घडामोडींचे प्रतिबिंब असलेला दक्षताचा मे महिन्याचा अंक सहर्ष सादर करत आहोत.

गडचिरोली जिल्ह्यातील बंगाडी या अतिदुर्गम सीमावर्ती भागात अत्यल्प कालावधीत पोलीस मदत केंद्र स्थापन करण्यात आले. या केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी जनजागरण मेळावा तसेच जीवनावश्यक गोष्टींचे वाटप हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. पोलीस दल व सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे माओवादी मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करून लोकशाही मार्ग स्वीकारत आहेत. या सगळ्याचा लेखाजोखा मांडणारा लेख अंकात प्रकाशित केलेला आहे.

तसेच हॅरिस ब्रिज, दापोडी येथे डायल ११२ प्रणालीचा वापर करून आत्महत्या करायला निघालेल्या महिलेला वाचवण्यात पोलिसांना यश आले, त्याची यशोगाथाही प्रसिद्ध करत आहोत.

दिनांक २९ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान नागपूर शहर येथे आयोजित '६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५–२६' मध्ये विविध स्पर्धा पार पडल्या. यात आयोजित स्पर्धांमध्ये पोलीस व्हिडिओग्राफी आणि अँटी सबोटेज चेक या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघास द्वितीय पुरस्कार मिळाला. तसेच बेस्ट आयटी प्रोजेक्ट इन सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस, सेंट्रल पोलीस ऑर्गनायझेशन सदराखाली महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक व पोलीस उपनिरीक्षक श्री. माजिद खान पठाण यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचा वृत्तांत अंकात सादर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संयुक्त गट ब परीक्षेअंतर्गत प्रशासकीय सेवेतील विविध महत्त्वाच्या पदांसाठी उमेदवार निवडले जातात. या परीक्षांच्या सर्वंकष तयारीसाठी खास मार्गदर्शन करणारा लेख अंकाचे आकर्षण ठरेल असा आहे.

याखेरीज श्री. सुरेश वांदिले, श्री. संजीव देवकर, श्रीमती भारती सावंत, श्री. सचिन बेंडभर यांच्या आशयसंपन्न लेखांनी अंकाची उपयुक्तता आणि वाचकस्नेही पैलू वाढेल असे वाटते. त्याचप्रमाणे याही अंकात तपासकथा, पाककृती, सोशल मुशाफिरी, शब्दकोडे ही नियमित सदरे अंतर्भूत आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

आपला स्नेहांकित,

(विजय खरात)
सहायक पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

पोलीस महासंचालकांचा संवाद

संवादे साधतो समन्वय...

> पोलीस दलात राबवण्यात येणाऱ्या 'सर्व कर्मचारी संवाद बैठक' या माध्यमातून पोलीस दलाच्या विविध स्तरांमध्ये अंतर्गत समन्वय वाढून संघटनेची कार्यक्षमता बळकट होण्यास चालना मिळेल असा विश्वास वाटतो.

सस्नेह नमस्कार.

पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या तक्रारींचे प्रभावीपणे निराकरण व्हावे आणि पोलीस दलात संघटनात्मक सुधारणा घडवून आणून पोलिसांच्या कामात सुधारणा व्हावी या हेतूने सर्व पोलीस ठाणी, शाखा आणि विभागीय स्तरावर दरमहा 'सर्व कर्मचारी संवाद बैठक' आयोजित करण्यात येणार आहे. या माध्यमातून संघटनेतील परस्पर संवाद केवळ पदानुक्रमावर आधारित न राहता विविध स्तरांवरील कर्मचाऱ्यांनाही निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या बैठकीतील चर्चेदरम्यान मुख्यतः कर्तव्य वाटप, उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर, सुट्ट्यांचे नियोजन, अतिरिक्त कामाचा ताण यांसारख्या मनुष्यबळविषयक बाबी आणि रजा, वेतन, भत्ते, निवास व्यवस्था, बदली, सेवाशर्ती, कार्यपरिसर, वैयक्तिक अडचणी यांसारख्या वैयक्तिक बाबी यांविषयी आपले मत मांडण्याची सर्व अधिकारी व अंमलदारांना संधी प्राप्त होणार आहे. तसेच गुन्हे तपासाच्या पद्धतीत सुधारणा, नवीन कायद्यांची अंमलबजावणी, हरवलेल्या बालकांचा शोध, अमली पदार्थ विरोधी कार्यवाही, शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढवण्यासाठी उपाययोजना, प्रशासकीय कार्यपद्धती सुलभ करण्यासाठी करावयाची अंमलबजावणी, विविध विषयांवरील मानक कार्यपद्धती (SOP) तयार करणे, कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी उपाययोजना अशा विविध विषयांवर विचारमंथन करण्यात येणार आहे. यामुळे पोलीस दलाच्या विविध स्तरांमध्ये अंतर्गत समन्वय वाढून संघटनेची कार्यक्षमता बळकट होण्यास चालना मिळेल असा विश्वास वाटतो.

महिला, बालके, वृद्ध तसेच कोणत्याही वयोगटातील गरजू आणि संकटग्रस्त नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत एकाच टोल फ्री क्रमांकावर पोलिसांची मदत उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली – डायल ११२' हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. या अनुषंगाने संपूर्ण राज्यातील ४४ घटक २४×७ प्रतिसाद देत मदत उपलब्ध करून देत आहेत. या प्रणालीमध्ये व्हॉट्सॲप, एक्स, फेसबुक, जीमेल या सोशल मीडियाचा समावेश केल्यामुळे नागरिक आता सोशल मीडियाद्वारेदेखील या प्रणालीअंतर्गत मदत मिळवू शकतात. तसेच सामाजिक आपत्कालीन सेवा, वैद्यकीय सेवा (ॲम्ब्युलन्स), पॅनिक बटन सेवा यांचाही डायल ११२ प्रणालीमध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना केवळ एकाच नंबरवर मदत मिळणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प सप्टेंबर २०२१ पासून राज्यात राबविला जात आहे. २०२१ पासून दरवर्षी प्रतिसाद दिल्या गेलेल्या प्रकरणांमध्ये क्रमश: वाढ होत असून २०२२ मध्ये ८५९५४०, २०२४ मध्ये १६२१६१४, २०२५ मध्ये १९३८२३३, २०२६ या वर्षात ३१ मार्चपर्यंत एकूण ६३६५७५ प्रकरणांमध्ये मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रणालीच्या प्रतिसाद कालावधीमध्ये लक्षणीय घट झाली असून २०२१ मधील सरासरी ५४ मिनिटांचा कालावधी कमी होऊन सरासरी ९ मिनिटांपर्यंत पोहोचला आहे. सन २०२६ मध्ये सदर कार्यप्रणाली मध्ये Hot Dispatch

६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५-२६ दिनांक २९ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान नागपूर शहर येथे संपन्न झाला.

सुविधेमुळे आमूलाग्र सुधारणा घडून आली असून, कॉल टेकर यांचा सरासरी प्रतिसाद कालावधी ३ मिनिटे ३० सेकंद वरून १ मिनिट ४० सेकंदापर्यंत कमी करण्यात यश आले आहे. ही उल्लेखनीय बाब आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक बैठक दिनांक ३० मार्च २०२६ रोजी राज्य पोलीस मुख्यालय, महाराष्ट्र राज्य येथे संपन्न झाली. या प्रसंगी मुख्यमंत्र्यांनी परिणामकारक गुन्हे तपास, दोषसिद्धीच्या प्रमाणात सुधारणा, दोषसिद्धी दरम्यान तंत्रज्ञानाचा वापर, रस्ते अपघात कमी करण्यासाठी रणनीती अशा विविध मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. या अनुषंगाने राज्यातील पोलीस दल आपली जबाबदारी हे आद्य कर्तव्य समजून उत्तमरीच्या पार पाडेल व भविष्यातही अशाच प्रकारे चांगले काम करत राहील, असा विश्वास आहे.

दिनांक २९ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ दरम्यान नागपूर शहर येथे '६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५-२६' अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. सदर स्पर्धेत देशभरातील विविध राज्य केंद्रशासित प्रदेश केंद्रीय स्तरावरील विविध पोलीस संघटना यांचे एकूण २९ संघ सहभागी झाले ज्यामध्ये एकूण १३२७ पोलीस अधिकारी व अंमलदार आणि १४४ पोलीस श्वान यांचा समावेश होता. पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांचे व्यावसायिक कौशल्य वाढवणे, स्पर्धकांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, विविध राज्यांच्या तपास पद्धती अवगत करून नवीन तंत्रज्ञानाचे आदान प्रदान करणे, पोलीस दलामधील समन्वय वाढवणे आणि कार्यपद्धती सुधारणे अशी विविध उद्दिष्टे समोर ठेवून अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा आयोजित करण्यात येतो. या स्पर्धेत कॉम्प्युटर अवेअरनेस, पोलीस डॉग कॉम्पीटिशन, पोलीस व्हिडिओग्राफी, अँटी सबोटेज चेक, सायंटिफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन, आणि पोलीस फोटोग्राफी या विषयांअंतर्गत स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात पोलीस व्हिडिओग्राफी आणि अँटी सबोटेज चेक या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघाने द्वितीय पुरस्कार प्राप्त केला. त्याचप्रमाणे बेस्ट आयटी प्रोजेक्ट इन सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस, सेंट्रल पोलीस ऑर्गनायझेशन या सदराखाली महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक व पोलीस उपनिरीक्षक श्री. माजिद खान पठाण यांचा गौरव करण्यात आला आहे. सर्व यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन.

शांतता, सुरक्षा, आणि विकास या त्रिसूत्रीचा वापर करून आपल्या अनोख्या कार्यपद्धतीने गडचिरोली पोलीस दलाने माओवादाविरुद्धच्या संघर्षात विजय मिळवत उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. जिल्ह्यातील बंगाडी या अतिदुर्गम सीमावर्ती भागात अत्यल्प कालावधीत पोलीस मदत केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे केंद्र केवळ सुरक्षेचे प्रतीक नसून स्थानिक नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरले आहे. तसेच पोलीस दल व सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे माओवादी मोठ्या संख्येने आत्मसमर्पण करून लोकशाही मार्ग स्वीकारत आहेत. या माध्यमातून जिल्ह्यात सकारात्मक बदल घडवून आणला जात आहे. माओवादविरोधी लढा निर्णायक टप्प्यात पोहोचला असून सुरक्षा बळकटीकरण, प्रभावी मोहिमांची अंमलबजावणी आणि पुनर्वसन धोरण यांच्या समन्वयातून गडचिरोली पोलीस दलाने लोकाभिमुख आणि विकासाभिमुख पोलिसिंगचा आदर्श घालून दिला आहे. गडचिरोली पोलीस दलाची ही कामगिरी निश्चितच स्तुत्य व उल्लेखनीय आहे. गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्ह्यांमधील विशेष अभियान पथकामध्ये (सी-६०) सेवा बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनाकडून दखल घेण्यात आली असून, सन २०२६-२७ या आर्थिक वर्षापासून त्यांना 'सी-६० सेवा पदक' प्रदान करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. याअंतर्गत पहिल्या दोन वर्षांसाठी दरवर्षी ५०० पदके वितरीत केली जाणार असून तिसऱ्या वर्षापासून पात्र अधिकारी व अंमलदारांना पदक वितरीत केले जाईल. राज्यातील नक्षलविरोधी कारवायांमध्ये अग्रभागी कार्यरत असणाऱ्या आणि अत्यंत खडतर परिस्थितीत कर्तव्य पार पाडणाऱ्या या पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा अशाप्रकारे सन्मान होणे, ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

१ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाच्या व जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने सर्वांना हार्दिक शुभेच्छा. जयहिंद!

आपला स्नेहांकित,

सदानंद दाते

सदानंद दाते
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

अंतरंग

मे २०२६

पोलीस विशेष

०७. ३६ वी महाराष्ट्र पोलीस क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

१०. मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. नित्यानंद राय यांच्या हस्ते '६९ वा अखिल भारतीय कर्तव्य मेळावा २०२५-२६' चा समारोप समारंभ संपन्न

२३. गडचिरोलीचा परिवर्तन प्रवास: सुरक्षेची भक्कम पायाभरणी, माओवादाचा ऱ्हास – **नीलोत्पल, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

३५. जालना जिल्हा पोलिसांची डिजिटल व्हॅनद्वारे अनोखी जनजागृती

४५. कर्तृत्वाची परीक्षा

५२. डायल ११२ आणि दापोडी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलिसांची तत्पर कारवाई

छायाचित्र दालन

०९. राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद

४१. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी – पोलीस सन्मान सोहळा

कविता

४४. मी पुनःश्च हरी ओम केलाय... – **बाळकृष्ण ठाणगे**

६६. घड्याळाचे काटे – **डॉ. दिनेश बारी**

७१. असा हा आहे महाराष्ट्र – **दत्तात्रय जोशी**



विशेष लेख

१४. महाराष्ट्र लोकसेवा आयोग उच्चपदाकडे नेणारा राजमार्ग – **एस. वाय. संदे**

लेख

२८. आपत्कालीन आर्थिक नियोजन का व कसे करावे?– **सुधाकर कुलकर्णी**

३१. ग्रीष्म ऋतू: थोडा घातक थोडा आल्हाददायक – **भारती सावंत**

३८. स्क्रिनच्या सावलीत हरवलेले बालपण – **रोजमेरी दुधाट**

४८. आशा : अभी ना जाओ छोड कर – **संजीव देवकर**

नवी दिशा... नवीन संधी

१९. उत्तम शैक्षणिक संस्थेची निवड कशी करावी? – **सुरेश वांदिले**

कथा

४२. बेवारस – **सचिन बेंडभर**

तपासकथा

५४. प्रतीक्षा – **रामचंद्र मोहिते, पोलीस निरीक्षक शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे**

५९. अपराधी कोण? – **नंदा पाराजे, तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, मंगरूळपीर उपविभाग, वाशिम**

६२. जाब – **बी. एन. हातमोडे, पोलीस निरीक्षक खुलताबाद पोलीस स्टेशन, छ. संभाजीनगर**

६७. उलगडा – **यशवंत सोळसे, पोलीस निरीक्षक, उमरेड पोलीस ठाणे, नागपूर**

७२. एक कॉल – **प्रविण पाथरकर, पोलीस उपनिरीक्षक, एमआयडीसी वाळुंज पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर**

७७. सोशल मुशाफिरी

७९. पाककृती

८१. शब्दकोडे

३६ वी महाराष्ट्र पोलीस क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

३६ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ ही २० ते २७ एप्रिल २०२६ या कालावधीत मुंबई शहर पोलीस आयुक्तालय मार्फत कलिना पोलीस मुख्यालय येथे आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत मुंबई पोलीस क्रीडा संघासोबतच महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून १२ पोलीस आयुक्तालये, परिक्षेत्रांमधील साधारणत: पाच हजार खेळाडू, पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांनी एकूण १८ विविध क्रिडा प्रकारांमध्ये सहभाग घेतला होता.

मुंबई पोलीस क्रीडा संघाने पुरुष व महिला या दोन्ही गटात अनुक्रमे २१० व १७४ असे गुण पटकावत सलग दुसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले आहे

पोलीस क्रीडा स्पर्धेची क्षणचित्रे

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे आणि समारोपप्रसंगी माननीय मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच माननीय पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, श्री. सदानंद दाते यांच्यासह राज्यातील इतर अपर पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, पोलीस उप आयुक्त आणि इतर वरिष्ठ दर्जाचे पोलीस अधिकारी देखील उपस्थित होते. पुढील वर्षी होणाऱ्या ३७ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेचे आयोजन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे करण्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेचा ध्वज संबंधितांना सन्मानपूर्वक हस्तांतरित करण्यात आला.

स्पर्धेच्या समारोप प्रसंगी सहभागी सर्व पोलीस आयुक्तालये /परिक्षेत्रे यांचे परेड संचलनाचे कार्यक्रम तसेच बँड पथक आणि सायलेंट ड्रिल यांचे नेत्रदीपक आणि मनमोहक संचालनासह सायोनाराद्वारे स्पर्धेची सांगता करण्यात आली. सदर स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहाने यशस्वीरित्या पार पाडण्यात आल्या ■

छायाचित्र दालन

मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची अर्धवार्षिक परिषद ३० मार्च २०२६ रोजी महाराष्ट्र पोलीस मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे संपन्न झाली त्याचे छायाछित्र दालन

मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. नित्यानंद राय यांच्या हस्ते

'६९ वा अखिल भारतीय कर्तव्य मेळावा २०२५-२६' चा समारोप समारंभ संपन्न

अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा ही राष्ट्रीय स्तरावरील भारतीय पोलीस दलाकरिता अत्यंत महत्त्वाची स्पर्धा आहे. ही स्पर्धा दरवर्षी वेगळ्या राज्यात आयोजित केली जाते. सन २०२५-२६ च्या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील नागपूर शहराची निवड झाल्याने, '६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५-२६' ही स्पर्धा दिनांक २९ मार्च ते ०३ एप्रिल २०२६ यादरम्यान, नागपूर शहर येथे आयोजित करण्यात आली होती.

'अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५-२६ स्पर्धे'चे उद्घाटन, मा. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते, तसेच मा. श्री. ॲड. आशिष जैस्वाल, अर्थ राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. सदानंद दाते (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य), मा. श्री. सुनिल रामानंद (अपर पोलीस महासंचालक, सीआयडी, पुणे), मा. श्री. मधुकर पांडे, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), मा. श्री. डॉ. रविंद्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदर मेळाव्यास भारतातील वेगवेगळ्या राज्यांमधील अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. २९ मार्च २०२६ रोजी पाच वाजता पोलीस मुख्यालय स्थित छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा हा पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांचे व्यावसायिक कौशल्य वाढविणे, स्पर्धकांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, वेगवेगळ्या राज्यांच्या तपास पद्धती अवगत करून नवीन तंत्रज्ञानाचे आदान-प्रदान करणे, पोलीस दलात एकमेकांमध्ये असलेला समन्वय वाढविणे व कार्यपद्धती सुधारणे याकरिता आयोजित करण्यात येतो. पोलीस कर्तव्य

मेळाव्यात १) कॉम्प्युटर अवेअरनेस २) पोलीस डॉग कॉम्पीटिशन, ३) पोलीस व्हिडीओग्राफी, ४) ॲन्टी सबोटेज चेक, ५) सायंटीफिक एड टु इन्व्हेस्टीगेशन व ६) पोलीस फोटोग्राफी या विषयांमधील इव्हेंटमध्ये स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

सदरील स्पर्धा नागपूर शहरातील रामद व बाबा अभियांत्रिकी विद्यापीठ, गिट्टीखदान, नागपूर, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ४, हिंगणा रोड, नागपूर व पोलीस प्रशिक्षण केंद्र, बजाजनगर, नागपूर येथे घेण्यात आल्या. स्पर्धेकरिता, देशभरातील वेगवेगळी राज्ये, केंद्रशासित प्रदेश व केंद्रीय स्तरावरील विविध पोलीस संघटना यांचे एकूण २९ संघ सहभागी झाले ज्यामध्ये एकूण १३२७ पोलीस अधिकारी, अंमलदार स्पर्धक आणि १४४ पोलीस श्वान स्पर्धक यांचा समावेश होता.

०३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी १७.१० वा. पोलीस कर्तव्य मेळाव्याचा समारोप समारंभ पोलीस मुख्यालय येथील शिवाजी स्टेडियम येथे प्रमुख अतिथी मा. श्री. नित्यानंद राय, केंद्रीय गृहराज्यमंत्री, भारत सरकार, तसेच मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या उपस्थितीत पार पडला. समारंभाच्या सुरुवातीला प्रथम मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री यांना पोलीस बँड पथकाद्वारे मानवंदना देण्यात आली. तसेच पोलीस कर्तव्य मेळाव्यातील स्पर्धेकरिता देशभरातून आलेल्या राज्य, केंद्रशासित प्रदेश व केंद्रीय स्तरावरील विविध पोलीस संघटनेच्या एकूण २९ संघांनी लयबद्ध तालावर बँड पथकाचे उत्तम पथसंचालन सादर केले. पथसंचालनाचे नेतृत्व परेड कमांडर श्री. प्रशांत ठवरे, पोलीस निरीक्षक, नागपूर शहर यांनी केले.

मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये कर्तव्य मेळाव्याचे उद्दिष्ट कथन केले व सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यामध्ये,

१) कॉम्प्युटर अवेअरनेस स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक तेलंगाणा राज्य संघास, तर द्वितीय पुरस्कार सीमा सुरक्षा दलास (बीएसएफ) प्रदान करण्यात आले.

२) पोलीस डॉग कॉम्पीटिशनमध्ये प्रथम पुरस्कार केंद्रीय पोलीस राखीव दलाच्या श्वान पथकास, तर द्वितीय पुरस्कार सीमा सुरक्षा बलास (एसएसबी) प्रदान करण्यात आला. तसेच बेस्ट डॉग ऑफ दी कॉम्पीटिशन या सदराखाली केंद्रीय राखीव पोलीस दलाचा श्वान 'बॉबी' यास पारितोषिक प्रदान करण्यात आले.

३) पोलीस व्हिडीओग्राफी या स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार तेलंगाणा राज्य पोलीस दलाचे संघास प्रदान करण्यात आला, तर द्वितीय पुरस्कार महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघास प्रदान करण्यात आला.

४) ॲन्टी सबोटेज चेक या स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार तेलंगाणा राज्य पोलीस दलाच्या संघास प्रदान करण्यात आला, तर द्वितीय पुरस्कार महाराष्ट्र पोलीस दलाच्या संघास प्रदान करण्यात आला.

५) सायंटिफिक एड टू इन्व्हेस्टीगेशन या स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार तामिळनाडू राज्य पोलीस दलाच्या अ संघास प्रदान करण्यात आला, तर द्वितीय पुरस्कार तेलंगाणा राज्य पोलीस दलाच्या संघास प्रदान करण्यात आला. तृतीय पुरस्कार तामिळनाडू राज्य पोलीस दलाच्या ब संघास प्रदान करण्यात आला

६) पोलीस फोटोग्राफी या स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार बॉर्डर सिक्युरिटी फोर्सच्या संघास प्रदान करण्यात आला, तर द्वितीय पुरस्कार तेलंगाणा राज्य पोलीस दलाच्या संघास प्रदान करण्यात आला. बेस्ट आयटी प्रोजेक्ट इन सेंट्रल आर्म्ड पोलीस फोर्सेस/ सेंट्रल पोलीस ऑर्गनायझेशन या सदराखाली महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक व पोलीस उपनिरीक्षक श्री. माजिद खान पठाण यांना प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५–२०२६ मधील सर्वोत्कृष्ट संघाचे पारितोषिक तेलंगाणा राज्य पोलीस दलास प्रदान करण्यात आले.

समारोप समारंभाचे प्रमुख अतिथी मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. नित्यानंद राय, भारत सरकार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सहभागी संघांचे व पारितोषिक विजेत्या संघांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. आपल्या भाषणात त्यांनी तंत्रज्ञानविषयक गुन्हेगारी वाढली असल्याने गुन्हे तपासात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा तसेच नवीन तपास पद्धतींचा व अवगत केलेल्या तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवावे व क्लिष्ट गुन्ह्यांची उकल करावी, असे सांगितले. तसेच अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५–२६ चे सर्वोत्तम आयोजन केल्याबद्दल नागपूर शहर पोलीस दल व पोलीस आयुक्त, नागपूर शहर तसेच राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांचेही अभिनंदन करून कौतुक केले.

नमूद कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन करण्यापूर्वी प्रमुख अतिथी मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री, श्री. नित्यानंद राय, भारत सरकार, यांना मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच मा. श्री. सुनिल रामानंद, अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे, मा. श्री. मधुकर पांडे, अपर पोलीस महासंचालक, प्रशासन, व मा. श्री. प्रदीप शेजुळ, उपमहानिर्देशक, आयबी यांना मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी समारोप समारंभाचे प्रमुख अतिथी मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री, श्री नित्यानंद राय, भारत सरकार यांनी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५–२६ चा समारोप झाल्याचे अधिकृतपणे घोषित केले. सरतेशेवटी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये आदिवासी नृत्य, पाईप डान्स व रायफल पीटीचे सादरीकरण होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

'६९ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५–२६' या स्पर्धेच्या समारोप समारंभास देशभरातील राज्य, केंद्रशासित प्रदेश व केंद्रीय स्तरावरील अनेक मा. वरिष्ठ पोलीस अधिकारी, नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त, मा. सह पोलीस आयुक्त, सर्व मा. अपर पोलीस आयुक्त, सर्व मा. पोलीस उप आयुक्त, सर्व मा. सहायक पोलीस आयुक्त, सर्व पोलीस निरीक्षक, तसेच

कार्यक्रमाच्या शेवटी समारोप समारंभाचे प्रमुख अतिथी मा. केंद्रीय गृहराज्यमंत्री, श्री नित्यानंद राय, भारत सरकार यांनी अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा २०२५-२६ चा समारोप झाल्याचे अधिकृतपणे घोषित केले. सरतेशेवटी सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये आदिवासी नृत्य, पाईप डान्स व रायफल पीटीचे सादरीकरण होऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

अधिकारी व अंमलदार, त्याचप्रमाणे स्पर्धेत सहभाग घेतलेले सर्व स्पर्धक, स्पर्धा परीक्षक, आमंत्रित मान्यवर, पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या परिवारातील सदस्य, पत्रकार आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. श्री. सुनिल रामानंद, अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांनी पोलीस कर्तव्य मेळाव्याच्या समारोपीय कार्यक्रम प्रसंगी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती क्षिप्रा मानकर, अमरावती यांनी केले. ■

एस. वाय. संदे

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
उच्चपदाकडे नेणारा राजमार्ग



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संयुक्त गट–ब परीक्षा ही पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक आणि सहायक कक्ष अधिकारी यांसारख्या राज्याच्या प्रशासनातील अत्यंत प्रतिष्ठित पदांसाठी चालवली जाणारी एक महत्त्वाची निवड प्रक्रिया आहे. या स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी केवळ शैक्षणिक हुशारी पुरेशी नसून, उमेदवाराला महाराष्ट्राची सामाजिक–आर्थिक स्थिती, राज्याचा इतिहास आणि प्रत्येक विभागाच्या विशिष्ट

कामकाजाची सखोल समज असणे आवश्यक असते. ही निवड प्रक्रिया पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि पोलीस उपनिरीक्षक पदासाठी शारीरिक चाचणी व मुलाखत अशा विविध आव्हानात्मक टप्प्यांत विभागलेली आहे

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या संयुक्त पूर्व आणि मुख्य परीक्षेचा नवा पॅटर्न आणि अभ्यासक्रम खालीलप्रमाणे आहे:

परीक्षेचा नवा पॅटर्न

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संयुक्त परीक्षा प्रामुख्याने गट-ब (अराजपत्रित) आणि गट-क पदांसाठी घेतली जाते. परीक्षेचे स्वरूप खालील टप्प्यांत विभागलेले आहे:

१. संयुक्त पूर्व परीक्षा :

- ही परीक्षा १०० गुणांची असते.
- यात एकूण १०० वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न विचारले जातात आणि परीक्षेचा कालावधी १ तास असतो.
- या परीक्षेसाठी १/४ (०.२५) नकारात्मक गुण पद्धती लागू आहे.
- ही परीक्षा सर्व पदांसाठी (पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी, सब रजिस्ट्रार) सामायिक असते.

२. मुख्य परीक्षा :

- पूर्व परीक्षेत पात्र ठरलेले उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरतात.
- मुख्य परीक्षा एकूण ४०० गुणांची असते, ज्यामध्ये दोन पेपर असतात.

– पेपर १ (सामायिक): मराठी (१०० गुण), आणि इंग्रजी (१०० गुण) असे एकूण २०० गुण.

– पेपर २ (पदनिहाय): सामान्य अध्ययन आणि बुद्धिमापन चाचणी (१०० प्रश्न) २०० गुणांचा असतो.

३. शारीरिक चाचणी आणि मुलाखत (केवळ पोलीस उपनिरीक्षक - पोलीस उपनिरीक्षक पदासाठी):

- **शारीरिक चाचणी:** ही चाचणी १०० गुणांची असते, परंतु ती आता केवळ पात्रता स्वरूपाची करण्यात आली आहे. मुलाखतीसाठी पात्र ठरण्यासाठी या चाचणीत किमान ६०% (६० गुण) मिळवणे आवश्यक आहे.
- **मुलाखत:** शारीरिक चाचणीत पात्र उमेदवारांची ४० गुणांची मुलाखत घेतली जाते.

अभ्यासक्रम

१. पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम:

पूर्व परीक्षेत प्रामुख्याने खालील विषयांचा समावेश होतो.

- **इतिहास:** आधुनिक भारताचा, विशेषतः महाराष्ट्राचा, इतिहास.
- **भूगोल:** महाराष्ट्राच्या भूगोलाच्या विशेष अभ्यासासह पृथ्वी, हवामान, नद्या, जमिनीचे प्रकार, पिके इत्यादी.
- **अर्थव्यवस्था:** भारतीय अर्थव्यवस्था (राष्ट्रीय उत्पन्न, शेती, बँकिंग) आणि शासकीय अर्थव्यवस्था.
- **राज्यशास्त्र:** भारतीय राज्यघटनेचा प्राथमिक अभ्यास, ग्रामव्यवस्थापन आणि प्रशासन.
- **सामान्य विज्ञान:** भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि आरोग्यशास्त्र.
- **अंकगणित व बुद्धिमत्ता:** बेरीज, वजाबाकी, सरासरी, टक्केवारी आणि तार्किक विचार करण्याची क्षमता.
- **चालू घडामोडी:** जागतिक, भारतीय आणि विशेषतः महाराष्ट्रातील महत्त्वाच्या घडामोडी.

२. मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम:

- **पेपर १:** यामध्ये मराठी आणि इंग्रजी व्याकरण, शब्दसंग्रह, प्रयोग, वाक्यरचना आणि उताऱ्यावरील प्रश्नांचा समावेश होतो.
- **पेपर २:** सामान्य अध्ययन आणि बुद्धिमापन चाचणी १०० प्रश्न २०० गुण

अशा प्रकारे, उमेदवाराला

आधी सामायिक विषयांची तयारी करावी लागते.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची संयुक्त परीक्षेसाठी वयोमर्यादा आणि शैक्षणिक पात्रता काय आहे?

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची) संयुक्त परीक्षेसाठी (गट–ब आणि गट–क) आवश्यक वयोमर्यादा आणि शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे आहे:

१. शैक्षणिक पात्रता

पदवी: उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी असणे आवश्यक आहे.

- अंतिम वर्षाचे विद्यार्थी: जे विद्यार्थी पदवीच्या अंतिम वर्षात आहेत, ते संयुक्त पूर्व परीक्षेला बसू शकतात. मात्र, मुख्य परीक्षेसाठी अर्ज करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत त्यांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.
- मराठी भाषेचे ज्ञान: उमेदवाराला मराठी भाषेचे (बोलणे, वाचणे आणि लिहिणे) ज्ञान असणे अनिवार्य आहे.

२. वयोमर्यादा

वयोमर्यादा पदांनुसार आणि प्रवर्गानुसार खालीलप्रमाणे आहे. (वयाची गणना प्रामुख्याने १ ऑगस्ट २०२६ रोजी केली जाईल).

- सहायक कक्ष अधिकारी (सहायक कक्ष अधिकारी) आणि राज्य कर निरीक्षक (राज्य कर निरीक्षक):

– किमान वय: १८ वर्षे

– कमाल वय (अमागास): ३८ वर्षे

– कमाल वय (मागासवर्गीय): ४३ वर्षे

- पोलीस उपनिरीक्षक (पोलीस उपनिरीक्षक):

– किमान वय: १९ वर्षे.

– कमाल वय (अमागास): ३१ वर्षे

– कमाल वय (मागासवर्गीय): ३४ वर्षे .

- विशेष सवलती (पोलीस उपनिरीक्षक पदासाठी):

प्राविण्यप्राप्त खेळाडू: ३६ वर्षांपर्यंत (मागासवर्गीय असल्यास ३९ वर्षे)

माजी सैनिक: ३६ वर्षांपर्यंत (मागासवर्गीय असल्यास ३९ वर्षे)

अनाथ उमेदवार: ३४ वर्षांपर्यंत

३. शारीरिक पात्रता (केवळ पोलीस उपनिरीक्षक पदासाठी)

पोलीस उपनिरीक्षक पदासाठी पात्र ठरण्यासाठी उमेदवारांनी खालील शारीरिक निकष पूर्ण करणे आवश्यक आहे :

निकष	पुरुष उमेदवार	महिला उमेदवार
उंची (अनवाणी)	किमान १६५ सेंमी	किमान १५७ सेंमी
छाती (न फुगवता)	किमान ७९ सेंमी	लागू नाही
छाती (फुगवून)	किमान ८४ सेंमी (५ सेंमी फुगवता यावी)	लागू नाही
वजन	लागू नाही	किमान ४० किलो

महत्त्वाची टीप: दिव्यांग उमेदवार पोलीस उपनिरीक्षक या पदासाठी पात्र मानले जात नाहीत. संयुक्त परीक्षेतील इतर पदांसाठी प्रवर्गानुसार वयात सवलत दिली जाते.

२. शारीरिक कार्यक्षमता चाचणी (Physical Efficiency Test - PET)

ही चाचणी एकूण १०० गुणांची असते. पुरुष आणि महिला उमेदवारांसाठी इव्हेंट्स खालीलप्रमाणे आहेत:

पुरुष उमेदवारांसाठी (एकूण १०० गुण):

१. गोळाफेक : ७.२६ किलो वजनाचा गोळा ७.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त लांब फेकल्यास १५ गुण मिळतात. ५ मीटरपेक्षा कमी फेकल्यास शून्य गुण मिळतात.

२. पुल-अप्स : एकूण ८ पुल-अप्स काढल्यास २० गुण (प्रति पुल-अप २.५ गुण) मिळतात.

३. लांब उडी : ४.५० मीटर किंवा त्यापेक्षा जास्त उडी मारल्यास १५ गुण मिळतात. २.५० मीटरपेक्षा कमी उडी असल्यास शून्य गुण मिळतात.

४. धावणे : हे अंतर २ मिनिट ३० सेकंदात पूर्ण केल्यास ५० गुण मिळतात. ३ मिनिट ३० सेकंदापेक्षा जास्त वेळ लागल्यास शून्य गुण मिळतात.

महिला उमेदवारांसाठी (एकूण १०० गुण):

१. धावणे (२०० मीटर): यासाठी ४० गुण निर्धारित आहेत.

२. चालणे (३ किमी): या इव्हेंटसाठी ४० गुण आहेत.

३. गोळाफेक : ४ किलो वजनाचा गोळा फेकायचा असतो, यासाठी २० गुण आहेत.

शारीरिक चाचणीत किमान ६० गुण मिळवणारे उमेदवारच ४० गुणांच्या मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

पोलीस उपनिरीक्षक मुलाखतीच्या तयारीसाठी काही खास टिप्स सांगा.

पोलीस उपनिरीक्षक (पोलीस उपनिरीक्षक) पदाची मुलाखत हा निवडीचा अंतिम टप्पा असून तो ४० गुणांचा असतो. ही केवळ तुमची बौद्धिक चाचणी नसून, तुमच्या व्यक्तिमत्त्वाची, स्वभाववैशिष्ट्यांची आणि पोलीस दलातील मूल्यांशी तुमच्या सुसंगततेची चाचणी आहे.

मुलाखतीच्या तयारीसाठी काही खास टिप्स खालीलप्रमाणे आहेत:

१. स्वतःबद्दल आणि विभागाबद्दल सखोल माहिती

- महाराष्ट्र पोलीस दल: पोलीस विभागाचे ब्रीदवाक्य, ध्येय, व्हिजन आणि मूल्यांची माहिती ठेवा. विभागासमोर सध्या असलेली आव्हाने आणि पोलीस सुधारणांबाबत तुमची मते तयार ठेवा.
- स्थानिक समस्या: तुम्ही ज्या भागात राहता किंवा ज्या भागात काम करू इच्छिता, तिथल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि गुन्हेगारी विषयक समस्यांची माहिती असणे आवश्यक आहे.
- तुमची पार्श्वभूमी: तुमच्या अर्जात दिलेल्या माहितीवर, तुमच्या छंदांवर आणि तुमच्या अनुभवांवर आधारित प्रश्नांची पूर्ण तयारी ठेवा.

२. STAR पद्धतीचा वापर (STAR Method)

मुलाखतीत जेव्हा तुम्हाला तुमच्या भूतकाळातील अनुभवांबद्दल विचारले जाते, तेव्हा STAR पद्धतीचा वापर करून उत्तरे द्या.

- ड (Situation): प्रसंगाचे वर्णन करा.
- ढ (Task): तुमचे उद्दिष्ट किंवा आव्हान काय होते ते सांगा.
- अ (Action): तुम्ही नेमकी काय कृती केली ते स्पष्ट करा (येथे आम्ही ऐवजी मी' काय केले यावर भर द्या).
- ठ (Result): त्या कृतीचा काय परिणाम झाला आणि तुम्ही त्यातून काय शिकलात ते सांगा.

३. प्रसंगनिष्ठ प्रश्नांची तयारी

सध्या मुलाखतींमध्ये जर तुम्ही पोलीस अधिकारी असाल तर काय कराल? अशा प्रकारचे प्रश्न विचारले जातात. यामध्ये खालील विषयांवर भर असतो:

- सचोटी : जर तुमच्या जवळच्या नातेवाईकाने गुन्हा केला किंवा तुम्हाला लाच देण्याचा प्रयत्न झाला, तर तुमची भूमिका काय असेल?
- निर्णयक्षमता: दबावाखाली असताना तुम्ही किती वेगाने आणि तार्किक विचार करून निर्णय घेता, हे तपासले जाते.
- बळाचा वापर: कायद्याच्या चौकटीत राहून

परिस्थिती हाताळण्यासाठी बळाचा वापर कधी आणि किती करावा, याची जाण असणे गरजेचे आहे.

४. देहबोली आणि संवाद कौशल्य

- डोळ्यांशी संपर्क : उत्तर देताना मुलाखतकारांच्या डोळ्यांत बघून आत्मविश्वासाने बोला.
- बसण्याची पद्धत: ताठ बसा, हात बांधणे किंवा पाय हलवणे टाळा.
- स्पष्टता: आवाजात स्पष्टता ठेवा आणि उत्तरे देताना घाई करू नका.
- ऐकणे: प्रश्न पूर्ण ऐकल्याशिवाय उत्तर द्यायला सुरुवात करू नका.

५. प्रामाणिकपणा

- जर तुम्हाला एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसेल, तर ते नम्रपणे मान्य करा. चुकीची माहिती देऊ नका.
- तुमच्या मर्यादांबद्दल विचारले असता, त्या मान्य करा आणि त्या सुधारण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न करत आहात, हे सांगा.

६. चालू घडामोडी आणि अष्टपैलू अभ्यास

- दररोज किमान एक मराठी आणि एक इंग्रजी वर्तमानपत्र वाचण्याची सवय ठेवा.
- पोलीस प्रशासन, नवीन कायदे (उदा. IPC, CrPC च्या

जागी आलेले नवीन कायदे), महिला सुरक्षा आणि मानवी हक्क या विषयांवरील ताज्या घडामोडींचा अभ्यास करा.

७. वैयक्तिक शिष्टाचार

- पोशाख: व्यावसायिक आणि नीटनेटका पोशाख करा (पुरुषांसाठी फॉर्मल शर्ट-पॅन्ट आणि टाय किंवा सूट; महिलांसाठी साडी किंवा फॉर्मल ड्रेस)
- वेळ पाळा: मुलाखतीच्या ठिकाणी वेळेवर पोहोचा .
- सराव (Mock Interviews): आरशासमोर बोलण्याचा सराव करा किंवा मित्र आणि मार्गदर्शकांकडून सराव मुलाखती घेऊन फीडबॅक मिळवा.

मुलाखत हा तुमच्या आत्मविश्वासाचा आणि मानसिक सक्षमतेचा आरसा आहे, त्यामुळे शांत राहून आपली मते स्पष्टपणे मांडणे हे यशाचे सूत्र आहे.

थोडक्यात सांगायचे तर, महाराष्ट्र शासनात गट-ब अधिकारी बनण्याचा मार्ग हा केवळ बौद्धिक क्षमताच नव्हे तर शारीरिक आणि मानसिक सहनशक्तीची परीक्षा पाहणारा एक मॅरेथॉन प्रवास आहे. परीक्षेच्या पहिल्या पेपरमध्ये मराठी भाषेचे असलेले महत्त्व आणि दुसऱ्या पेपरमधील तांत्रिक ज्ञान उमेदवाराच्या निवडीत निर्णायक ठरते. वेळेचे काटेकोर नियोजन, दर्जेदार संदर्भ साहित्याचा वापर, सातत्यपूर्ण सराव परीक्षा आणि पोलीस उपनिरीक्षक पदासाठी सुरुवातीपासूनच ठेवलेली शारीरिक सज्जता हीच यशाची खरी सूत्रे आहेत. राज्यस्तरावरील विषयांवर विशेष लक्ष केंद्रित करून आणि शिस्तबद्ध तयारी करून उमेदवार या स्पर्धात्मक प्रक्रियेत आपले स्थान निश्चित करू शकतात आणि एक स्थिर व सन्मानजनक करिअर प्राप्त करू शकतात. ■

सुरेश वांदिले
मुंबई

उत्तम शैक्षणिक संस्थेची निवड कशी करावी?

बारावीनंतर खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांची करिअरची वाट निश्चित होते. आपल्याकडे अनेक शासकीय आणि खाजगी महाविद्यालयांमधून विविध प्रकारचे अभ्यासक्रम चालवले जातात. मात्र उच्च शिक्षणासाठी एखाद्या संस्थेत प्रवेश घेताना नक्की कोणते निकष विचारात घ्यायचे, यासंदर्भात विद्यार्थ्यांचा आणि पालकवर्गाचा अनेकदा गोंधळ उडालेला दिसतो. या अनुषंगाने मार्गदर्शन करणारा लेख...

बारावीच्या परीक्षा संपलेल्या आहेत. काही सीईटीही झालेल्या आहेत. आता प्रवेश कोणत्या संस्थेत घ्यायचा याविषयी प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांच्या घरी खल सुरू झाला असणार. अनेक पालक आणि विद्यार्थ्यांसोबत चर्चा केल्यानंतर असे निदर्शनास येते, की खाजगी आणि शासकीय शिक्षण संस्थांबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये अनेक प्रकारच्या समजुती

किंवा गैरसमजुती असतात. त्यापैकी बऱ्याच समजुती ऐकीव माहितीवर आधारीत असून त्यांना कोणताही ठोस आधार नसतो. खाजगी संस्था या श्रीमंत व सर्वसाधारण बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांसाठी असतात, असे बऱ्याच पालकांना वाटत असते. अशा संस्थेत प्रवेश घेतल्यावर उज्ज्वल भविष्याच्या संधी मिळू शकत नाहीत, अशी त्यांची समजूत असते. काही पालक आणि विद्यार्थ्यांचा शासकीय संस्थांमधील अध्यापक व पायाभूत सुविधा यांच्या गुणवत्तेवर प्रचंड विश्वास असतो.

समजुती बदलण्याची गरज

शासकीय आणि खाजगी शिक्षण संस्थांबाबत असणाऱ्या या भ्रामक समजुती वा चित्र बदलण्याची गरज आहे. तरच पदवीस्तरीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा विचार वस्तुनिष्ठ पद्धतीने केला जाऊ शकतो.

गेल्या काही वर्षांमध्ये भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या शैक्षणिक संस्थांचा उदय आणि विकास झाला आहे. यामध्ये केंद्रीय विद्यापीठे, सेंटर ऑफ एक्सलन्स आणि इंस्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स असा दर्जा मिळालेल्या शासकीय आणि खाजगी शैक्षणिक संस्था, डीम्ड टू बी युनिव्हर्सिटीचा दर्जा मिळालेल्या शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यापीठे, स्वायत्त शैक्षणिक संस्था आणि शासकीय विद्यापीठे यांचा समावेश आहे. डीम्ड टू बी युनिव्हर्सिटीचा दर्जा प्राप्त केलेल्या शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्यात येते. त्यामुळे या संस्था आपला अभ्यासक्रम सध्याच्या काळाशी सुसंगत असा ठरवू शकतात व त्यात सातत्याने बदल करू शकतात. शासकीय विद्यापीठांना असणारा दर्जा आणि अधिकार या संस्थांना मिळालेला असतो. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार, अशा संस्था स्वतःच्या नावासोबत विद्यापीठ हा शब्द वापरू शकत नाहीत.

> काही खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षण महागडे असले तरी त्या चांगल्या पायाभूत सुविधा, उच्च दर्जाचे अध्यापक आणि उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण पुरवण्यात यशस्वी ठरतात.

शासकीय शिक्षण संस्था

शासकीय विद्यापीठांना राज्य आणि केंद्र शासनामार्फत निधी पुरवठा केला जातो. या विद्यापीठांचे शैक्षणिक शुल्क खाजगी विद्यापीठांपेक्षा कमी असते. बहुतेक शासकीय विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली असते. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ, हैदराबाद विद्यापीठ, बनारस हिंदू विद्यापीठ, अलिगढ मुस्लिम विद्यापीठ अशा काही विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त केली आहे.

उत्तम दर्जा

तसेच काही खाजगी शैक्षणिक संस्थांमधील शिक्षण महागडे असले तरी त्या चांगल्या पायाभूत सुविधा, उच्च दर्जाचे अध्यापक आणि उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण पुरवण्यात यशस्वी ठरतात. या संस्थांकडे सुसज्ज प्रयोगशाळा, वाचनालये आणि आधुनिक काळाशी सुसंगत रोजगारक्षम अभ्यासक्रम असतात. या संस्था आपला अभ्यासक्रम सातत्याने अद्ययावत करून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास घडवून आणतात. त्यामुळे या संस्थांमधील विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी मिळतात. मात्र असे असले तरी काही शासकीय विद्यापीठांना आपल्या अभ्यासक्रमात बदल करायला थोडा कालावधी लागतो. राज्य शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठांना संबंधित राज्य सरकार मार्फत निधी दिला जातो. या निधीतून उत्कृष्ट पायाभूत सुविधा, संशोधनासाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे अपेक्षित असते. ही अपेक्षा बरीच विद्यापीठे पूर्ण करतात. अनेक विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणावर अभ्यासक्रम चालवले जातात. त्यातील काही कालसुसंगत असतात तर काही जुन्या पठडीतील असतात.

महत्त्वाची सूत्रे

नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) या उपक्रमांतर्गत देशातील शैक्षणिक संस्थांची क्रमवारी ठरवली जाते. यासाठी (१) अध्यापन सुविधा (२) शैक्षणिक वातावरण (३) संसाधने (४) विद्यार्थ्यांची गुणवत्ता (५) संशोधन सुविधा (६) प्लेसमेंट (७) सर्वसमावेशकता आणि (८) संस्थेबाबतची धारणा या घटकांचा विचार केला जातो.

एनआयआरएफच्या क्रमवारीत अनेक खाजगी संस्था शासकीय संस्थांपेक्षा वरच्या स्थानावर दिसतात. त्यामुळे पदवीस्तरीय अभ्यासक्रमासाठी खाजगी अथवा शासकीय संस्थेची निवड करताना पुढील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे: (१) शैक्षणिक शुल्क (२) पायाभूत सुविधा (३) संशोधन सुविधा (४) प्लेसमेंट सेल (५) अध्यापकांचा दर्जा (६) अभ्यासक्रम रचना (७) व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधी (८) ग्रंथालय, (९) शैक्षणिक वातावरण (१०) संस्थेची प्रतिष्ठा (११) प्रवेश प्रक्रिया (१२) स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन (१३) भविष्यकालीन दृष्टी (१४) शैक्षणिक सहकार्य (१५) संशोधन प्रकाशने.

एनआयआरएफची क्रमवारी दरवर्षी बदलत असते. त्यामुळे संस्थांना आपली गुणवत्ता टिकवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतात. ज्या संस्था यात कमी पडतात त्या क्रमवारीत मागे पडतात. पदवीस्तरीय अभ्यासक्रमासाठी संस्था किंवा विद्यापीठांची निवड करण्यासाठी एनआयआरएफची क्रमवारी एक महत्त्वाचे साधन ठरू शकते.

एनआयआरएफ रँकिंगनुसार विविध शाखांमधील टॉप १० संस्था

अभियांत्रिकी

१. आयआयटी मद्रास २. आयआयटी दिल्ली ३. आयआयटी मुंबई ४. आयआयटी कानपूर ५. आयआयटी खरगपूर ६. आयआयटी रुरकी ७. आयआयटी हैदराबाद ८. आयआयटी गुवाहाटी ९. एनआयटी तिरुचिरापल्ली १०. आयआयटी बीएचयू (वाराणसी).

वैद्यकीय

१. एम्स (AIIMS) नवी दिल्ली २. पीजीआयएमईआर (PGIMER) चंदीगड ३. ख्रिश्चन मेडिकल कॉलेज (CMC) वेल्लोर ४. जवाहरलाल इन्स्टिट्यूट (JIPMER) पुदुचेरी ५. संजय गांधी पदव्युत्तर संस्था लखनौ ६. बीएचयू (BHU) वाराणसी ७. निमहान्स (NIMHANS) बेंगळुरू ८. किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी लखनौ ९. अमृता विश्व विद्यापीठम कोईम्बतूर १०. कस्तुरबा मेडिकल कॉलेज मणिपाल.

व्यवस्थापन

१. आयआयएम अहमदाबाद २. आयआयएम बेंगळुरू ३. आयआयएम कोझिकोड ४. आयआयएम दिल्ली ५. आयआयएम लखनौ ६. आयआयएम मुंबई ७. आयआयएम कोलकाता ८. आयआयएम इंदूर ९. एक्सएलआरआय जमशेदपूर १०. शैलेश जे. मेहता स्कूल ऑफ मॅनेजमेंट.

महाविद्यालये (कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखांसाठी एकत्रित श्रेणी)

१. हिंदू कॉलेज दिल्ली २.

मिरांडा हाऊस दिल्ली ३. हंस राज कॉलेज दिल्ली ४. किरोडीमल कॉलेज दिल्ली ५. सेंट स्टीफन्स कॉलेज दिल्ली ६. रामकृष्ण मिशन विद्यामंदिर हावडा ७. आत्माराम सनातन धर्म कॉलेज दिल्ली ८. सेंट झेवियर्स कॉलेज कोलकाता ९. पीएसजीआर कृष्णम्मल कॉलेज कोईम्बतूर १०. पीएसजी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कोईम्बतूर.

(एनआयआरएफ मध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांसाठी स्वतंत्र विभाग नसून महाविद्यालय या एकाच श्रेणीमध्ये या सर्व शाखांच्या नामांकित संस्थांचा समावेश होतो.)

महाराष्ट्रातील महत्वाच्या संस्था

अभियांत्रिकी

भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबई, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT) मुंबई, विश्वेश्वरैया नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VNIT) नागपूर, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (COEP) पुणे, डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी (DIAT) पुणे, वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट (VJTI) मुंबई, आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (AIT) पुणे, नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (NMIMS) मुंबई, डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी (MIT) वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIIT) नागपूर.

वैद्यकीय

अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (AIIMS) नागपूर, सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय (AFMC) पुणे, ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय व सर जे. जे. रुग्णालय समूह मुंबई, सेठ जी. एस. वैद्यकीय महाविद्यालय व केईएम रुग्णालय मुंबई, भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठ वैद्यकीय महाविद्यालय पुणे, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय पुणे, टोपीवाला नॅशनल वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय नवी मुंबई.

व्यवस्थापन

भारतीय व्यवस्थापन संस्था मुंबई (पूर्वीचे), एस. पी. जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रीसर्च मुंबई, शैलेश जे. मेहता स्कूल ऑफ मॅनेजमेंट, आयआयटी मुंबई, नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मुंबई, सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट पुणे, भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर, सिम्बायोसिस सेंटर फॉर मॅनेजमेंट अँड ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट पुणे, जमनालाल बजाज इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मुंबई, के. जे. सोमय्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई, प्रिं. एल. एन. वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई.

महाविद्यालये (कला, वाणिज्य आणि विज्ञान):

फर्ग्युसन कॉलेज पुणे, सेंट झेवियर्स कॉलेज मुंबई, आर. ए. पोदार कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स मुंबई, एच. आर. कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स मुंबई, रामनारायण रुईया ऑटोनॉमस कॉलेज मुंबई, मिठीबाई कॉलेज ऑफ आर्ट्स मुंबई, के. जे. सोमय्या कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स मुंबई, बी. वाय. के. कॉलेज ऑफ कॉमर्स नाशिक, डी. जी. रुपारेल कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स मुंबई, सिम्बायोसिस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स पुणे.

संकेतस्थळ–

www.nirfindia.org ■

नीलोत्पल
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

गडचिरोलीचा परिवर्तन प्रवास:

सुरक्षेची भक्कम पायाभरणी, माओवादाचा ऱ्हास

माओवाददृष्ट्या अतिसंवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात शांतता, सुरक्षा आणि विकास या त्रिसूत्रीवर आधारित कार्यपद्धतीने गडचिरोली पोलीस दलाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दुर्गम व अतिदुर्गम भागांमध्ये सुरक्षा यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी नव्या पोलीस मदत केंद्रांची स्थापना, तसेच माओवाद्यांना आत्मसमर्पणासाठी प्रोत्साहित करणारी प्रभावी धोरणे या दोन्ही माध्यमांतून जिल्ह्यात सकारात्मक बदल घडवून आणला जात आहे.

बंगाडी सारख्या अतिदुर्गम व सीमावर्ती भागात अत्यल्प कालावधीत उभारण्यात आलेले नवीन पोलीस मदत केंद्र हे केवळ सुरक्षेचे प्रतीक नसून, स्थानिक नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरले आहे. दुसरीकडे, पोलीस दल व सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मोठ्या संख्येने माओवाद्यांनी आत्मसमर्पण करून हिंसेचा मार्ग सोडत लोकशाही व्यवस्थेवर विश्वास दाखवला आहे.

सदर तीनही घटना गडचिरोली जिल्ह्यातील बदलत्या परिस्थितीचे द्योतक असून माओवादविरोधी लढा निर्णायक टप्प्यात पोहोचत असल्याचे स्पष्ट होते. सुरक्षा बळकटीकरण, प्रभावी मोहिमा आणि पुनर्वसन धोरण यांच्या समन्वयातून गडचिरोली पोलीस दलाने लोकाभिमुख व विकासाभिमुख पोलिसिंगचे आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

अतिदुर्गम भागातील सुरक्षेला बळकटी: बंगाडी येथे नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना

माओवादग्रस्त अतिसंवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागांमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याबरोबरच स्थानिक नागरिकांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने गडचिरोली पोलीस दलाकडून सातत्याने प्रभावी पावले उचलली जात आहेत. या उपक्रमांच्या मालिकेत उपविभाग भामरागड अंतर्गत बंगाडी येथे दिनांक १९ मार्च २०२६ रोजी नवीन पोलीस मदत केंद्राची यशस्वी स्थापना करण्यात आली. बंगाडी हे ठिकाण उपपोस्टे लाहेरीपासून सुमारे ०८ किमी अंतरावर तसेच छत्तीसगड राज्याच्या सीमेपासून केवळ ०२ किमी अंतरावर असणाऱ्या परिसरात मोडते. या भागात पोलीस मदत केंद्र उभारण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांपर्यंत सुरक्षा यंत्रणा अधिक प्रभावीपणे पोहोचणार असून, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मोठी मदत होणार आहे. सन २०२३ पासून सुरक्षा पोकळी कमी करण्याच्या दृष्टीने उभारण्यात आलेल्या पोलीस मदत केंद्र बंगाडी साखळीतील हे ११ वे पोलीस मदत केंद्र ठरले आहे. सदर पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलवाद विरोधी अभियान), नागपूर श्री. संदिप पाटील, पोलीस उप–महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. अंकित गोयल, उप–महानिरीक्षक (अभियान), सीआरपीएफ श्री. अजय कुमार शर्मा, १९२ बटालियनचे कमांडंट श्री. परविंदर सिंग तसेच इतर वरिष्ठ अधिकारी व स्थानिक ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत पार पडले.

बंगाडी हे ठिकाण उपपोस्टे लाहेरीपासून सुमारे ०८ किमी अंतरावर तसेच छत्तीसगड राज्याच्या सीमेपासून केवळ ०२ किमी अंतरावर असणाऱ्या परिसरात मोडते. या भागात पोलीस मदत केंद्र उभारण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांपर्यंत सुरक्षा यंत्रणा अधिक प्रभावीपणे पोहोचणार असून, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मोठी मदत होणार आहे. पोलीस मदत केंद्र ठरले आहे.

या पोलीस मदत केंद्राची उभारणी ही अत्यंत नियोजनबद्ध आणि समन्वयपूर्ण पद्धतीने अवघ्या २४ तासांत पूर्ण करण्यात आली.

नवीन पोलीस मदत केंद्रात पोलीस दलाच्या सोयीसुविधांचा विचार करून अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये १५ पोर्टा कॅबिन, जनरेटर शेड, पिण्याच्या पाण्यासाठी आरओ प्लँट, मोबाईल टॉवर, स्वच्छतागृह सुविधा तसेच सुरक्षेसाठी मॅक वॉल, बी.पी. मोर्चा व ०८ सॅन्ड मोर्चांचा समावेश आहे.

गडचिरोली पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटनानिमित्त जनजागरण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्थानिक नागरिकांमध्ये विविध जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. महिलांना साड्या, पुरुषांना धोतर व ब्लँकेट, स्वयंपाकासाठी भांडी संच, बकेट व मच्छरदाणी,

युवकांना टी–शर्ट, नोटबूक, पेन व शालेय साहित्य, तसेच मुलांना क्रिकेट साहित्य व व्हॉलीबॉल संच देण्यात आला. गडचिरोली पोलीस दलाकडून यापूर्वी दिनांक २३ नोव्हेंबर २०२५ रोजी फुलनार (गुंडूरवाही) येथे पोलीस मदत केंद्र, १९ डिसेंबर २०२५ रोजी तुमरकोठी येथे नवीन पोलीस स्टेशन आणि २४ जानेवारी २०२६ रोजी बिनागुंडा येथे पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे दुर्गम भागातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिकच दृढ झाली आहे. या नवीन पोलीस मदत केंद्राच्या स्थापनेमुळे या भागातील नागरिकांपर्यंत सुरक्षा आणि विकास पोहोचविणे शक्य होणार असून, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल.

नवीन पोलीस मदत केंद्रामुळे भविष्यात या भागात राष्ट्रीय महामार्ग, पूल, मोबाईल टॉवर तसेच गुंडेनूर नाल्यावरील बांधकाम प्रकल्पांना आवश्यक सुरक्षा उपलब्ध होणार आहे. परिणामी, विकास कामांना गती मिळून या अतिदुर्गम भागात शासकीय सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचतील. याचबरोबर, भविष्यात एस.टी. बस सेवा सुरू करण्यासही अनुकूल वातावरण निर्माण होणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून त्यांनी पोलीस प्रशासनाप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. गडचिरोली पोलीस दलाचा हा उपक्रम केवळ सुरक्षेपुरता मर्यादित नसून विकासाभिमुख व लोकाभिमुख पोलिसिंगचे प्रभावी उदाहरण ठरत आहे.

वरिष्ठ माओवादी मुख्य प्रवाहात: ११ जणांचा ऐतिहासिक निर्णय

गडचिरोली पोलीस दल व केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) यांच्या संयुक्त व सातत्यपूर्ण प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले असून, दिनांक १९ मार्च २०२६ या दिवशी एकूण ११ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ०१ डिव्हिजनल कमिटी मेंबर, ०१ एरिया कमिटी सचिव, ०१ पीपीसीएम, ०१ कमांडर, ०१ एसीएम पदावरील वरिष्ठ माओवादी तसेच इतर ०६ सदस्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने या सर्वांवर एकत्रितपणे ६८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

आत्मसमर्पित माओवाद्यांमध्ये सोनी ऊर्फ बाली वत्ते मट्टामी (क), बदरी ऊर्फ रामबत्ती आयतु मट्टामी (एरिया कमिटी सचिव), सुखलाल बोळगा कोक्सा (कमांडर), शांती ऊर्फ सोमरी गंगा तेलामी (क), यमुनक्का ऊर्फ रुखमाक्का पोट्टी पेंदाम यांच्यासह गणेश उलगे कोवासी, मिनको ऊर्फ जम नीकाय मट्टामी, धनु दसरु वेळंजे, सुनिता ऊर्फ वंगे वत्ते होयाम, रमेश पांडू मडावी, किशोर सुक्रैय्या वासम, या सदस्यांचा समावेश आहे. हे सर्व माओवादी छत्तीसगड व गडचिरोली जिल्ह्यातील विविध भागात सक्रिय होते.

गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळ लक्षणीयरीत्या कमकुवत झाली असून, कधीकाळी

१० उपविभागांमध्ये सक्रिय असलेली ही चळवळ आता मुख्यत्वे भामरागड उपविभागाच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. पोलीस दलाच्या सातत्यपूर्ण माओवादविरोधी अभियानामुळे व स्थानिक पातळीवर राबविण्यात येणाऱ्या विकासाभिमुख उपक्रमांमुळे नागरिकांचा विश्वास दृढ झाला आहे.

यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान) श्री. संदिप पाटील यांनी उर्वरित माओवाद्यांना हिंसेचा मार्ग सोडून शस्त्रे खाली ठेवण्याचे व सन्मानाने जीवन जगण्यासाठी लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. गडचिरोली पोलीस दल व सीआरपीएफ यांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे जिल्ह्यात शांतता, सुरक्षा व विकास यांना अधिक चालना मिळत आहे.

माओवाद चळवळीला आणखी एक धक्का: ०९ सदस्यांचा आत्मसमर्पणाचा निर्णय

गडचिरोली जिल्ह्यात माओवादाविरोधातील मोहिमेत गडचिरोली पोलीस दल व केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) यांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले असून ३१ मार्च २०२६ रोजी एकूण ०९ माओवादी सदस्यांनी आत्मसमर्पण केले आहे. यामध्ये ०३ एसीएम (एरिया कमिटी मेंबर) पदावरील वरिष्ठ माओवाद्यांसह इतर ०६ सदस्यांचा समावेश असून महाराष्ट्र शासनाने त्यांच्यावर एकत्रितपणे ३० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

आत्मसमर्पणावेळी शांती वंजा बड्डे हिने एके ४७ रायफल व ३० जिवंत काडतुसे, तर सुक्की बामी कुंजाम हिने कारबाईन रायफलसह आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे छत्तीसगड सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे व दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. मौजा कुमनार जंगल परिसरातून ०१ एके-४७ रायफल, ०३ मॅगझीन, ५७ जिवंत काडतुसे, ०३ वॉकीटॉकी, ०४ बॅटऱ्या व २० पेनड्राईव्ह जप्त करण्यात आले.

आत्मसमर्पित माओवाद्यांमध्ये दसरी ऊर्फ पिडे सनु वेको, रामजी अडमा पोटाम, शांती वंजा वड्डे, मनकु मासो पोड्याम, सरिता रामा वेलकम, लखमी आयतु कुंजाम, नंदे जोगा मडे, राकेश कोरके मज्जी व सुक्की बामी कुंजाम यांचा समावेश आहे. हे सर्व सदस्य छत्तीसगड राज्यातील विविध भागातील असून माओवाद्यांच्या नॅशनल पार्क, सँड्रा दलम, इंद्रावती दलम तसेच माड व पामेड एरिया यामध्ये सक्रिय होते. विशेष बाब म्हणजे, आत्मसमर्पणावेळी शांती वंजा बड्डे हिने एके ४७ रायफल व ३० जिवंत काडतुसे, तर सुक्की बामी कुंजाम हिने कारबाईन रायफलसह आत्मसमर्पण केले. आत्मसमर्पित माओवाद्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे छत्तीसगड सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रे व दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. मौजा कुमनार जंगल परिसरातून ०१ एके–४७ रायफल, ०३ मॅगझीन, ५७ जिवंत काडतुसे, ०३ वॉकीटॉकी, ०४ बॅटऱ्या व २० पेनड्राईव्ह जप्त करण्यात आले. तसेच गुंडापुरी जंगल परिसरातून ७.६२ एसएलआर रायफल ०२ नग, सिंगल शॉट शस्त्र ०१ नग व डेटोनेटर ५० नग हस्तगत करण्यात आले.

गडचिरोली पोलीस दल

व सीआरपीएफ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे सन २०२५ पासून आतापर्यंत एकूण १३२ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे. तसेच सन २००५ पासून राबविण्यात येत असलेल्या शासनाच्या आत्मसमर्पण व पुनर्वसन योजनेमुळे आजपर्यंत एकूण ८०५ माओवाद्यांनी मुख्य प्रवाहात प्रवेश केला आहे. पोलीस दलाकडून आत्मसमर्पित माओवाद्यांचे प्रभावी पुनर्वसन करण्यात येत असल्यामुळे अनेक माओवादी हिंसक जीवनाचा त्याग करून समाजाच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत आहेत.

यापूर्वी १५ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलित ब्यूरो सदस्य व सीपीआय (माओवादी) चे प्रवक्ते मल्लोजुला वेनुगोपाल राय उर्फ भूपती उर्फ सोनू याच्यासह एकूण ६१ माओवाद्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह आत्मसमर्पण केल्यामुळे माओवादी चळवळीला मोठा धक्का बसला होता. या घटनेनंतर देशभरात ९४० माओवादी सदस्यांनी ५६९ शस्त्रांसह आत्मसमर्पण केले आहे.

सदर घटनाक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील माओवादी चळवळ लक्षणीयरीत्या कमकुवत झाली असून, कधीकाळी जिल्ह्यातील १० उपविभागांमध्ये सक्रिय असलेली ही चळवळ आता प्रामुख्याने भामरागड उपविभागाच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. गडचिरोली पोलीस दल व सीआरपीएफ यांच्या सातत्यपूर्ण कारवाया, प्रभावी धोरणे तसेच शासनाच्या पुनर्वसन योजनांमुळे माओवादाविरोधातील लढा निर्णायक टप्प्यात पोहोचत असून, जिल्ह्यात शांतता व विकासाचा मार्ग अधिक सुलभ होत आहे.

आत्मसमर्पणाची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिल्यामुळे माओवाद्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा पर्याय प्राप्त झाला असून, या धोरणाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. सन २०२२ पासून आजपर्यंत एकूण १६६ जहाल माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे.

या सर्व कार्यक्रमाप्रसंगी श्री. संदिप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान) नागपूर, श्री. अंकित गोयल, पोलीस उप महानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर, श्री. अजय कुमार शर्मा, उप महानिरीक्षक (अभियान) सीआरपीएफ, गडचिरोली परिक्षेत्र, श्री. परविंदर सिंग, कमांडंट सीआरपीएफ १९२ बटालियन, श्री. एम. रमेश अपर पोलीस अधीक्षक (अभियान) गडचिरोली, श्री. गोकुल राज जी., अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गडचिरोली, श्री. कार्तिक मधिरा अपर पोलीस अधीक्षक अहेरी, श्री. चंचल परवाना स्टाफ ऑफीसर उप-महानिरिक्षक सीआरपीएफ कार्या, श्री. अनिकेत हिरडे सहा. पोलीस अधीक्षक गडचिरोली, श्री. विशाल नागरगोजे पोलीस उपअधीक्षक (अभियान) श्री. अमर मोहिते उपविभागीय पोलीस अधिकारी, भामरागड हे उपस्थित होते. ■

सुधाकर कुलकर्णी
पुणे

आपत्कालीन आर्थिक नियोजन का व कसे करावे?

तहान लागल्यावर विहीर खणण्यापेक्षा आधीच वेळ असताना विहीर खणणे अधिक श्रेयस्कर असते. ही गोष्ट आपल्या दैनंदिन आयुष्यासदेखील लागू आहे. आयुष्यात अचानक उद्भवलेल्या आर्थिक आपत्तीच्या काळात आपण योग्य आर्थिक नियोजन केल्यास अशा आपत्तीचा सामना करणे सोपे जाते. हे नियोजन कसे करावे? गुंतवणुकीचे पर्याय कोणते? याचा परामर्ष लेखात घेतला आहे

आपल्या जीवनात आपत्ती कधी व कशी येईल हे सांगता येत नाही. उदा: अकाली मृत्यू, अपघात, गंभीर आजारपण, व्यवसायात अडचण किंवा मंदी, काही अपरिहार्य कारणाने नोकरी जाणे यामुळे काही काळ घरी बसावे लागणे या व अन्य काही कारणाने आपल्या जीवनात आपत्ती येतात. अशा आपत्तींना सामोरे जाताना जर पुरेसे आर्थिक पाठबळ नसेल, तर आपत्तीचे गांभीर्य आणखी वाढते. अशी आर्थिक समस्या येऊ नये म्हणून आपत्कालीन आर्थिक नियोजन करणे अत्यंत गरजेचे असते. असे नियोजन नसल्यास प्रसंगी उधार उसनवार कर्ज किंवा जवळील सोने, जागा किंवा शेअर्स यांसारख्या गोष्टींची विक्री करून परिस्थितीचा सामना करायची वेळ येते. विशेष म्हणजे अशी विक्री

करताना आपल्याला बाजारभावाने विक्री करता येईलच असे नाही. प्रसंगी वेळेचे महत्त्व जाणून कमी किमतीस विक्री करावी लागते. यामुळे आपण या भविष्यातील गरजा विचारात घेऊन गुंतवणूक केलेली असते ती आपत्ती काळात वापरली गेल्याने आपल्याला भविष्यातील उद्दिष्टे पूर्ण करणे कठीण होऊन जाते. या दृष्टीने आपण आपले आपत्कालीन नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते. ते कसे करावे हे आता पाहू.

अकाली मृत्यूमुळे कुटुंबावर येणाऱ्या आर्थिक समस्येवर मात करण्यासाठी योग्य त्या कव्हरची आयुर्विमा पॉलिसी शक्य तितक्या लवकर घेणे आवश्यक आहे. साधारणपणे आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या १० ते १५ पट कव्हर असावे व हे कव्हर टर्म प्लॅन पद्धतीने घ्यावे. यामुळे कमीत कमी प्रिमियममध्ये जास्तीत जास्त कव्हर मिळू शकते. वार्षिक १० लाख उत्पन्न असणाऱ्याने किमान १ कोटी रुपयांचे कव्हर घ्यावे व असे १ कोटीचे कव्हर असणारी टर्म इन्श्युरन्स पॉलिसी २५ वर्षे वयाच्या निरोगी व्यक्तीस ३० वर्षे मुदत असणारी टर्म इन्श्युरन्स पॉलिसी सुमारे १० ते १२ हजाराच्या वार्षिक प्रीमियममध्ये मिळू शकते. अशा पॉलिसीचा प्रीमियम इन्श्युरन्स कंपनीनुसार कमी अधिक असू शकतो तसेच प्रीमियम वाढत्या वयानुसार वाढत असतो आणि म्हणूनच कमी वयात पॉलिसी घेतल्यास अल्प प्रीमियममध्ये पॉलिसी मिळू शकते. पॉलिसी धारकाचा दुर्दैवाने अकाली मृत्यू झाल्यास अवलंबून असणाऱ्या कुटुंबीयांची आवश्यक ती आर्थिक तरतूद होऊ शकते. या पॉलिसी सोबत अपघात तसेच अपंगत्व यांवर मात करयासाठी अल्पसा रायडर प्रीमियम देऊन पॉलिसीची उपयुक्तता आणखी वाढवता येते. अचानक उद्भवणारे आजारपण व यामुळे होणारा खर्च यासाठीची आर्थिक तरतूद आपल्याला मेडिक्लेम पॉलिसी घेऊन करता येते. तरुणपणी सुरुवातीस कमी रकमेचे पॉलिसी कव्हर घेतले तर चालू शकते, मात्र किमान ३ लाख रुपयांपर्यंतचे कव्हर असणे हितावह असते. असे कव्हर सुरुवातीच्या काळात फ्लोटर पद्धतीने घेतल्यास प्रीमियमची बचत होते व यात कुटुंबातील सर्वांचा समावेश होऊ शकतो. मात्र जर आपले आईवडील आपल्यावर अवलंबून असतील तर त्यांचा सम ावेश फ्लोटर पॉलिसीत न करता त्यांच्यासाठी स्वतंत्र पॉलिसी घेणे सोयीचे असते. कारण स्वतंत्र पॉलिसीत प्रत्येकाचे कव्हर वेगळे असून संबंधित व्यक्तीसच त्याचा क्लेम मिळू शकतो. विशेषत: उतारवयात ३ ते ४ लाखाची स्वतंत्र पॉलिसी घेऊन किमान दहा लाखांची टॉप पॉलिसी घ्यावी. यामुळे कमीत कमी प्रीमियम मध्ये १३-१४ लाखांचे कव्हर मिळते, व यामुळे हॉस्पिटलायझेशनची बहुतांश रक्कम विमा कंपनीकडून क्लेम स्वरूपात परत मिळते व संभाव्य आर्थिक समस्या टाळता येते. आजकाल आजारपणाप्रमाणेच अपघातामुळेसुद्धा वैद्यकीय खर्च तसेच दैनंदिन काम न करता आल्याने आर्थिक प्रश्न उद्भवू शकतो. अशा आर्थिक समस्येवर अपघात विमा पॉलिसी घेऊन मात करता येते. साधारणपणे २५ लाखांचे कव्हर असणाऱ्या अपघात विमा पॉलिसीला अंदाजे २००० ते ३००० रुपये इतका वार्षिक प्रीमियम पडू शकतो. पॉलिसी धारकाचा अपघाती मृत्यू झाल्यास विम्याची संपूर्ण रक्कम वारसास

मिळते.

अपघातामुळे अपंगत्व आल्यास अपंगत्वाच्या प्रमाणात पॉलिसी धारकास रक्कम क्लेम स्वरूपात दिली जाते. उदा., १००% अपंगत्व म्हणजे दोन्ही डोळे, दोन्ही हात, दोन्ही पाय, किंवा एक हात एक पाय अपघातात निकामी झाल्यास पॉलिसी कव्हरची संपूर्ण रक्कम पॉलिसी धारकास क्लेम म्हणून दिली जाते, याउलट अपंगत्व काही प्रमाणात आल्यास त्या प्रमाणात क्लेम दिला जातो. उदा., ४०% अपंगत्व असल्यास पॉलिसी कव्हरच्या ४०% इतका क्लेम दिला जातो. सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली अपंगत्वाची टक्केवारी यासाठी ग्राह्य धरली जाते. आपल्या गरजेनुसार २५ लाख/ ५० लाख किंवा १०० लाख कव्हर असणारी वैयक्तिक अपघात विमा पॉलिसी घ्यावी. त्यासाठी अनुक्रमे २०००–३०००, ३००० ते ४००० व ६००० ते ८००० इतका वार्षिक प्रीमियम पडू शकतो. अशा पॉलिसीचा प्रीमियम इन्श्युरन्स कंपनीनुसार कमी अधिक असू शकतो. कर्करोग, हृदयविकार, किडनी ट्रान्सप्लांट, ट्युमर यांसारख्या गंभीर आजारपणामुळे येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी क्रिटीकल केअर पॉलिसी घेणे हितावह असते. कारण पॉलिसीधारकास यातील कुठल्याही आजाराचे निदान झाल्यास पॉलिसी कव्हर इतकी रक्कम क्लेम म्हणून दिली जाते. तर काही तुलनेने कमी गंभीर आजारांचे निदान झाल्यास ५०% इतकी रक्कम क्लेम म्हणून दिली जाते. विशेष म्हणजे या पॉलिसीचा मिळणारा क्लेम हा मेडिक्लेम पॉलिसीच्या अतिरिक्त असतो, मात्र हा क्लेम मिळण्यासाठी संबंधित व्यक्ती आजाराचे निदान झाल्यापासून किमान ३० दिवस हयात असणे आवश्यक असते. या पॉलिसीच्या प्रीमियम कव्हरची रक्कम अर्जदाराच्या वयावर अवलंबून असते. याव्यतिरिक्त काही कारणाने नोकरी जाणे, मंदी किंवा अन्य काही कारणाने व्यवसायातून अपेक्षित उत्पन्न न आल्याने येणाऱ्या आर्थिक समस्येवर मात करता यावी यासाठी किमान ६ महिन्यांच्या खर्चाची

गंभीर आजारपणामुळे येणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यासाठी क्रिटीकल केअर पॉलिसी घेणे हितावह असते. कारण पॉलिसीधारकास यातील कुठल्याही आजाराचे निदान झाल्यास पॉलिसी कव्हर इतकी रक्कम क्लेम म्हणून दिली जाते. तर काही तुलनेने कमी गंभीर आजारांचे निदान झाल्यास ५०% इतकी रक्कम क्लेम म्हणून दिली जाते.

तरतूद करणे हितावह असते. ही रक्कम आपल्याला लगेचच मिळावी म्हणून अशी रक्कम बँकेच्या बचत (सेव्हिंग्ज) खात्यात किंवा लिक्विड शॉर्ट टर्म म्युच्युअल फंडात गुंतवावी. यातून मिळणारा रीटर्न जरी कमी असला तरी गरजेच्या वेळी रक्कम लगेचच मिळू शकते. याशिवाय बँकेत ठेव असल्यास ठेव रकमेच्या ७५ ते ८०% इतकी रक्कम कर्ज म्हणून त्वरित मिळू शकते व यावर व्याजही ठेवीच्या व्याजापेक्षा केवळ १% इतकेच जास्त द्यावे लागते. जर आपल्याला काही कालावधीनंतर पैसे मिळण्याची शक्यता असेल, तर सोने विकण्यापेक्षा त्यावर कर्ज घेऊन गरज भागवणे योग्य ठरू शकते. आजकाल बँका तसेच गोल्ड लोन कंपन्या सहजगत्या सोने तारणावर कर्ज देऊ करतात. आता बँका चांदी तारण घेऊनही कर्ज देऊ लागल्या आहेत. पोस्टाचे एनएससी शेअर्स, म्युच्युअल फंड यांच्या तारणावरसुद्धा सहज कर्ज मिळू शकते. मात्र कमीत कमी कर्ज घेऊन ते वेळीच परत केल्यास व्याजापोटी कमी रक्कम भरावी लागते. गरजेनुसार कर्ज शक्यतोवर बँकेकडूनच घ्यावे. खाजगी कंपन्या अथवा खाजगी सावकाराकडून कर्ज घेण्याचे टाळावे. कर्ज परतफेड करणे शक्य असेल तरच कर्ज घ्यावे, अन्यथा सोने/ चांदी/ शेअर्स/ म्युच्युअल फंड विकणे हितावह असते. यावरून आपल्या असे लक्षात येईल, की आपत्ती जरी टाळता आली नाही तरी योग्य नियोजन केल्यास एखाद्या आपत्तीमुळे उद्भवणाऱ्या आर्थिक समस्येवर मात करता येऊ शकते. आपत्ती नियोजन करण्यापूर्वी शक्यतो तज्ज्ञाचा सल्ला घ्यावा. ■

भारती सावंत
नवी मुंबई

ग्रीष्म ऋतू: थोडा घातक थोडा आल्हाददायक

सरला हा वसंत ऋतू
ग्रीष्माचा होई ताप सुरू
शरीराला मिळण्या गारवा
थंड पाण्याने स्नान करू

ग्रीष्म ऋतूची चाहूल लागते व उन्हाचा ताप वाढू लागल्याचे जाणवते. नुकताच पानगळीचा मोसम संपून नव्या पोपटी पालवीने वृक्ष अन लतिका बहरून गेलेल्या दिसतात. वसंतात फुलाफळांना बहर आलेला असतो. आम्रवृक्षावरील मोहोर आणि त्यावर बसून कोकिळेने

केलेले मधुरगान कानामनाला तृप्ती देतात. वसंत ऋतूत फुललेला वृक्षांचा मोहोर आणि पाखरांची किलबिल ग्रीष्मातील उष्म्यामुळे कमी भासते. ग्रीष्मात सूर्य उत्तरायणात प्रवेश करतो. दिवस मोठा व रात्र लहान होते. सूर्याच्या सततच्या उष्णतेमुळे नद्या, विहिरी यांतील पाणी आटू लागते. सर्वत्र उष्ण वारे वाहू लागतात. उष्णतेमुळे सकल सजीव सृष्टी, पशुपाखरे आणि मानव यांच्या अंगाची लाहीलाही होते. दिवसभर शेतात काम करताना शेतकऱ्यांचा घाम निथळत असतो. वृक्षांच्या सावलीत आराम केला की थोडा श्रमपरिहार होतो. बरेच लोक बाहेर जाताना स्वतःला उन्हापासून वाचवण्यासाठी टोप्या वापरतात. फ्रीजमधील थंडगार पाणी, आईस्क्रीम, कलिंगड, खरबूज खाऊन शरीरात थंडावा आणण्याचा प्रयत्न करतात. काहीजण थंड पेय प्राशन करत राहतात.

ग्रीष्म ऋतूत जलाशयातील पाण्याची वाफ होते आणि पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने पुन्हा पृथ्वीवर बरसते. यामुळे आपणाला वर्षभर पाणीपुरवठा होतो. पिके चांगली येतात. तापलेल्या धरणीला गारवा मिळतो. यामुळे ग्रीष्मातला उन्हाळा कितीही असह्य वाटला तरी तो भविष्यकाळासाठी उपयुक्त आहे. दुःखानंतर सुखाची चाहूल लागण्यासाठी धरती मातेलाही भाजून यावे लागते.

ग्रीष्म ऋतूत जलाशयातील पाण्याची वाफ होते आणि पावसाळ्यात पावसाच्या पाण्याने पुन्हा पृथ्वीवर बरसते. यामुळे आपणाला वर्षभर पाणीपुरवठा होतो.

उन्हाने हवालदिल झालेल्या जिवाला पावसाळा प्रसन्न करून जातो. ग्रीष्म ऋतूत फळांना मात्र चांगलाच बहर येतो. आंबे, चिंचा, जांभळे, करवंदे, बोरे, फणस ही सर्व जीवनसत्त्वे पुरवणारी आंबटगोड फळे ग्रीष्मातच खायला मिळतात.

फळांना येताच बहर
घेऊ मिळून रसास्वाद
आंबटगोड फलाहार
जॅम जेलीस देऊ दाद

तप्त उन्हाळ्याच्या या काळात जास्त पाणी पिणे उत्तम! यामुळे शरीरातील पाण्याचे घामावाटे उत्सर्जन झाल्याने शरीरात निर्माण झालेली पाण्याची कमतरता भरून काढली जाते. या काळात हलका आहार घ्यावा, कारण पाणी पिण्याने जेवणाचे पचन होत नाही. दूध, तूप, भात, वरण, तसेच तांदळाचे पदार्थ सेवन करावे. वाळा गुलाब घातलेले जल प्राशन करावे. दुपारच्या वेळी घराबाहेर जाणे टाळावे. स्कार्फ, छत्री, टोपी यांचा वापर करून डोक्याचे संरक्षण करावे. दुपार भोजनानंतर वामकुक्षी आवश्यक!

दरवाजावरील वाळ्याचे पडदे घराला थंडावा देतात. घराजवळ झाडे, बागबगीचा असावा. यामुळे थंड हवेचे झोत घरात येत राहतात. जाई जुईचे मांडव उन्हाळ्याची तीव्रता कमी करतात. शरीराला गरम पडणारे पदार्थ, अपेयपान टाळावे. ज्यायोगे शरीरातल्या तापमानाचा समतोल राखला जातो, अशाच पदार्थांचे सेवन करावे. पशुपक्ष्यांसाठी अंगणात पाणी भरून ठेवावे. शक्य असेल तर मटका पाणपोईची व्यवस्था करावी. म्हणजे पांथस्थाची तहान भागेल. बाहेर जाताना शक्यतो सफेद, हलके आणि ढगळ कपडे परिधान करावे. यामुळे उन्हाळ्याचा त्रास जाणवणार नाही. शाळा महाविद्यालयांना उन्हाळ्यात सुट्टी असल्याने दुपारच्या वेळी मुलांनी शक्यतो घरगुती खेळ खेळावेत. सकाळी प्राणायाम, व्यायाम करून शरीराची चेतनामयता जागृत ठेवावी. संध्याकाळी थंड वाऱ्याच्या ठिकाणी भ्रमणासाठी जावे. यामुळे शरीरात सुस्ती, आळस वाढणार नाही. चैत्र, वैशाख महिन्यांत गावोगावच्या यात्रा, जत्रा असतात. अशावेळी उन्हात भटकणे टाळावे. शिवाय अशा ठिकाणी तळलेल्या भजी, जिलेबी, फरसाण अशा पदार्थांचे सेवन करू नये. नाहीतर आरोग्याच्या तक्रारी उद्‌भवू लागतात. गुढीपाडवा म्हणजे हिंदू पंचांगाप्रमाणे वर्षाचा पहिला दिवस! असे सण ग्रीष्मातच येतात. वैशाखातला अक्षय तृतीया हा

साडेतीन मुहूर्तातील सण मानला जातो. या दिवशी पितरांचे श्राद्ध केले जाते. तर्पण, दान, जप करून अक्षय्य फळप्राप्तीचे पुण्य मिळवले जाते.

ऋतूंच्या वैविध्यामुळे पृथ्वीवरील सजीवांना सुसह्य जगणे शक्य होत असते. कधी उन्हाळा तर कधी हिवाळा आणि मधूनच जलवर्षाव करणाऱ्या पर्जन्यसरी! ग्रीष्म म्हणजे गृहिणींना वर्षभर लागणारे पापड, कुरडया, शेवया, पापड्या, सांडगे करून डबे भरून ठेवायची पर्वणीच जणू! लोणच्याच्या बरण्या भरून वर्षभर आस्वाद घेता येतो.

बहरूनी आली फुले फळे
कधी जलधारांचीही वृष्टी
झाली चैतन्यमय हिरवीगार
वसुंधरेवरची सजीव सृष्टी

ग्रीष्मात लग्नसराईचा हंगाम असतो. स्त्रिया, मुली सुंदर शालू नेसून अलंकृत होऊन विवाह सोहळ्यात लगबग करतात. उन्हाचा त्रास जाणवला तरी त्यांचा उत्साह ओसंडून वाहत असतो. पूर्वी मंदिरासमोर, बागेत किंवा मैदानात, दारात लग्ने लावली जायची. हल्ली लग्ने एसी हॉलमध्ये लावली जातात. एसी असलेल्या गाडीतून सर्वचजण हॉलमध्ये गेल्यामुळे बाहेरचा उष्मा तितकासा जाणवत नाही. यामुळे शरीरातील टवटवीतपणा टिकून राहतो. शिवाय उन्हामुळे तलखी होत नाही. चैत्र वैशाखात गावोगावच्या यात्रा असतात. देवाच्या पालख्या निघतात. भंडारा गुलाल उधळला जातो.

घामाने निथळून जाऊन भक्त देवाच्या काठ्या खांयावर नाचवत मिरवणुकीत नाचत असतात. या काळात सण जयंत्यांची रेलचेल असते. ज्योतिराव फुले, आंबेडकरांची जयंती साजरी केली जाते. आंब्या फणसाची चंगळ असल्याने लहानथोर सर्वांनाच मुरांबा, साखरांबा, कैरीचे पन्हे, आंबापोळी, आमरस, फणस पोळी खायची चंगळ असते. शाळांना सुट्टी असल्याने मुले रानावनात हुंदडायला, मैदानावर खेळायला तयारच असतात. ग्रीष्मात फुलांनाही बहर आलेला असतो. यामुळे बहावा, गुलमोहर जागोजागी फुललेले दिसतात. बहाव्याच्या झाडाखाली हळदीचा सडा पडल्याप्रमाणे दिसते, तर गुलमोहराची फुले अग्निशिखेप्रमाणे वाटतात. रातराणी आपल्या दरवळामुळे बेधुंद करते. चाफ्याचा मोहक सुगंध मनाला प्रसन्नता देतो. वाटेवरून जाणाऱ्याला मधुमालतीच्या फुलांचा सुवास मोहवून टाकतो.

उन्हाळ्यात पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने पशुपक्षी तहानेने व्याकुळ झालेले दिसतात. तळी विहिरी यांनी तळ गाठल्यामुळे लोक विहिरीत खाली उतरून पाण्याचे हंडे, कळश्या भरताना दिसतात.

दुपारनंतर मध्येच विजा कडाडून ढगांचा गडगडाट सुरू होतो आणि गारांच्या माऱ्यासह पर्जन्यधारा बरसू लागतात. उन्हाच्या तलखीने बेचैन झालेल्या जिवाला थंडावा मिळतो. लहान मुले पागोळ्या वेचण्यासाठी अंगणात पावसात भिजत राहतात. 'ये रे ये रे पावसा' अशी गाणी म्हणत नाचतात. पावसाने चिंब झालेल्या मातीला धुमारे फुटू लागतात आणि मृद्‌गंध तनामनाला वेडावून जातो. उन्हाच्या तडाख्यात लहान मुले कॅरम, पत्ते, सोंगट्या असे बैठे खेळ खेळत राहतात. साप, विंचू यांसारखे सरपटणारे प्राणी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी दगडाखाली किंवा पाणवठ्याशेजारील बिळात लपून बसतात. गायी, म्हशी, शेळ्या, दुपारी आम्रवृक्षाखाली बसून रवंथ करतात किंवा झाडांवर बसून फळांवर चोची मारत राहतात. पाणी साठलेल्या डब्यात डुंबून शरीराला गारवा मिळवतात. पाखरे या पाण्यात आपले पंख बुडवून शीतलता आणतात.

उन्हाळ्यात पाण्याचे प्रमाण कमी झाल्याने पशुपक्षी तहानेने व्याकुळ झालेले दिसतात. तळी विहिरी यांनी तळ गाठल्यामुळे लोक विहिरीत खाली उतरून पाण्याचे हंडे, कळश्या भरताना दिसतात.

ग्रीष्म ऋतूत उन्हाळा खूप असल्याने अंगावर फोड येणे, घामोळ्या, नाक फुटणे, हाताला कंड सुटणे असा त्रास सुरू होतो. यावर उपाय म्हणून चंदन, वाळा, प्रवाळ, अनंतमूळ पावडर अंगाला चोळून थंडावा आणला जातो. पचायला जड असणाऱ्या आहाराच्या सेवनामुळे आम्लपित्त, मूळव्याधी यांसारख्या व्याधी उद्‌भवू शकतात. यावर नारळपाणी, थंड दूध पिऊन उपाय साधला जातो. तांब्याच्या भांड्यातील पाणी पिऊन उष्णतेचा प्रादुर्भाव रोखला जातो. मधुर आमरस बनवताना त्यात सुंठ पावडर, गूळ, आले, तूप घालून चवदार आमरस चाखला जातो. पुदिना, कांदा घालून पदार्थातील उष्मा कमी केला जातो. सर्व जीवनसत्त्वे पुरवणारी आणि शरीरात पाण्याचा समतोल राखणारी फळे खाऊन ग्रीष्म ऋतूचा ताप कमी करणे आपल्याच हातात आहे, नाही का?

कोकिळेचे कुहूकुहू
येता आंब्याला मोहोर
ऋतूंच्या वैविध्यामुळे
सृष्टीला येतसे बहर

■

जालना जिल्हा पोलिसांची डिजिटल व्हॅनद्वारे अनोखी जनजागृती

जालना जिल्हा पोलीस दलाने अमली पदार्थ विरोधी, महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा इत्यादी विषयांवर जिल्ह्यातील १४८ शाळेतील ४१,०००/– विद्यार्थ्यांना डिजिटल व्हॅनद्वारे जनजागृतीचा अनोखा उपक्रम राबवला आहे.

श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक, जालना व श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक, जालना यांच्या संकल्पनेतून अंमली पदार्थ, महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा याबद्दल जनजागृती करण्यासाठी एक विशिष्ठ प्रकारची डिजिटल व्हॅन तयार करण्यात आली. सदर व्हॅनद्वारे जगजागृती करण्यासाठी सहा. पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड,

प्रभारी अधिकारी दहशतवाद विरोधी शाखा, जालना यांच्या अंतर्गत जनजागृती कक्षाची स्थापना केली गेली आहे.

जनजागृतीसाठी व्हॅनमध्ये डिजिटल स्क्रीन बसवून त्याद्वारे जालना जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय, कॉलेज, मुख्य बाजारपेठ, मुख्य चौक, गर्दीची ठिकाणे, एमआयडीसी मधील कंपन्या या ठिकाणी पोलीस अधिकारी व अंमलदार हे व्यक्तीश: जाऊन शालेय विद्यार्थी, कॉलेजच्या तरुणांना अमली पदार्थ विरोधी जनजागृती व अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत माहिती देत आहेत. आतापावेतो १४८ शाळा, कॉलेज या ठिकाणी भेट देऊन ४१,०००/– विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

विशेष उपक्रम

जालना जिल्ह्यातील सामाजिक संस्था (एनजीओ) यांच्या सहभागाने SAFE जालना अभियान उपक्रम राबविण्यात येत आहे.

S-Say No to Drugs

A-Awareness in Society

F-Fight Drug Abuse

E-Empower Youth

SAFE जालना या विशेष उपक्रमाच्या अंतर्गत जालना जिल्ह्यातील सामाजिक संस्था (एनजीओ) यांच्या मदतीने सामान्य नागरिकांसाठी अमली

पदार्थ, महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा जनजागृतीच्या दरम्यान मुले व युवक हे अमली पदार्थांपासून दूर राहून मैदानी खेळांकडे आकर्षित होतील या उद्देशाने त्यांना बास्केटबॉल, फुटबॉल, क्रिकेट, बॅटमिंटन या खेळाच्या किटचे वाटप करण्यात आले आहे.

जनजागृतीसाठी व्हॅनमध्ये डिजिटल स्क्रीन बसवून त्याद्वारे जालना जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालय, कॉलेज, मुख्य बाजारपेठ, मुख्य चौक, गर्दीची ठिकाणे, एमआयडीसी मधील कंपन्या या ठिकाणी पोलीस अधिकारी व अंमलदार हे व्यक्तीश: जाऊन शालेय विद्यार्थी, कॉलेजच्या तरुणांना अमली पदार्थ विरोधी जनजागृती व अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम याबाबत माहिती देत आहेत.

अमली पदार्थ जनजागृतीसाठी राबविण्यात आलेले प्रशिक्षण व कार्यशाळा

१.जालना जिल्ह्यातील नवनियुक्त पोलीस पाटील यांना अमली पदार्थ, महिला सुरक्षा, सायबर सुरक्षा जनजागृती व पॉक्सो कायद्याचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी त्यांचे पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना येथे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

२.अमली पदार्थ जनजागृतीसाठी जालना जिल्ह्यातील ८५ शाळांच्या शालेय शिक्षकांची कार्यशाळा घेऊन त्यांना अमली पदार्थ सेवनाचे दुष्परिणाम व अमली पदार्थ विरोधी कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

३.जालना जिल्ह्यातील औषध दुकानदार व पुरवठादार यांची

पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना येथे पोलीस अधीक्षक,जालना यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन त्यांना प्रतिबंधित ड्रग्जबाबत माहिती देण्यात आली आहे.

हेल्पलाईन नंबर

अमली पदार्थांसंदर्भात गोपनीय माहिती देण्यासाठी संपूर्ण जालना जिल्ह्याच्या अंतर्गत ७८४३०५१०२६ हा हेल्पलाईन नंबर प्रसारित करण्यात आला असून त्यावर येणाऱ्या कॉल्सची गांभीर्याने दखल घेतली जाते. प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे जालना जिल्ह्यामध्ये अवैधपणे अमली पदार्थ बाळगणारे, विक्री करणारे, लागवड करणारे तसेच अमली पदार्थ सेवन करणाऱ्या इसमांविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

सोशल मीडियावर अमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी रिल्स स्पर्धेचे आयोजन

संपूर्ण जालना जिल्ह्यामध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती करण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करण्याच्या अनुषंगाने श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक, जालना यांच्या मार्गदर्शनखाली रिल्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. याद्वारे अमली पदार्थ विरोधी व अमली पदार्थाचे सेवनाने होणारे दुष्परिणाम यावर विशेष रिल्स तयार करून त्या सोशल मीडियावर प्रसारित केल्या गेल्या. ज्या रिल्सला सर्वाधिक पसंती मिळाली त्या रिल्स स्टारला उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात आले आहे.

अमली पदार्थांसंदर्भात गोपनीय माहिती देण्यासाठी संपूर्ण जालना जिल्ह्याच्या अंतर्गत ७८४३०५१०२६ हा हेल्पलाईन नंबर प्रसारित करण्यात आला असून त्यावर येणाऱ्या कॉल्सची गांभीर्याने दखल घेतली जाते. प्राप्त झालेल्या माहितीप्रमाणे जालना जिल्ह्यामध्ये अवैधपणे अमली पदार्थ बाळगणारे, विक्री करणारे, लागवड करणारे तसेच अमली पदार्थ सेवन करणाऱ्या इसमांविरुद्ध अमली पदार्थ विरोधी कायद्याप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

सदरचा अमली पदार्थ, महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा जनजागृती उपक्रम श्री. अजयकुमार बन्सल पोलीस अधीक्षक, जालना व श्री. आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक, जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड व ग्रेटर पोलीस उप निरीक्षक यासीन दस्तगीर, सहा पोलीस उप निरीक्षक शेख अख्तर, पोलीस अंमलदार मारोती शिवरकर, कैलास कुरेवाड, विनोद गडदे, महेंद्र सोनवणे, दिपक बडुरे व गौतम बोबडे (सर्व नेमणुक दहशतवाद विरोधी शाखा, जालना) यांनी यशस्वी करण्यसाठी प्रयत्न केले आहेत. ■

रोजमेरी दुधाट
कोल्हापूर

स्क्रिनच्या सावलीत हरवलेले बालपण

आजचा काळ हा विज्ञान-तंत्रज्ञानाचा सुवर्णकाळ मानला जातो. स्मार्टफोन, इंटरनेट, सोशल मीडिया या साधनांनी मानवी जीवनात क्रांती घडवून आणली आहे. संवाद सुलभ झाला, माहिती सहज उपलध झाली, शिक्षणाच्या नव्या वाटा खुल्या झाल्या. परंतु या सर्व प्रगतीसोबतच एक गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. तो म्हणजे स्मार्टफोनच्या विळख्यात अडकलेले बालपण.

पूर्वीचे बालपण म्हणजे मोकळेपणा, आनंद, खेळ, मैत्री आणि निसर्गाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते होते. मुले अंगणात, मैदानात धावायची, झाडांवर चढायची, सायकल चालवायची, भातुकली, लगोरी, कबड्डी, खो-खो असे खेळ खेळायची. या खेळांमधून त्यांचा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकास घडत असे. परंतु

आजचे बालपण मात्र चार भिंतींमध्ये आणि एका छोट्याशा स्क्रीनमध्ये कैद झाले आहे.

स्मार्टफोन हे साधन मुलांच्या हातात आले आणि त्यांच्या आयुष्याचा केंद्रबिंदूच बदलून गेला. जेवताना, झोपताना, शाळेत जाताना, अगदी मित्रांबरोबर बसतानाही यांचे लक्ष फोनमध्येच असते. यामुळे त्यांच्या विचारशक्ती, कल्पनाशक्तीवर आणि सर्जनशीलतेवर परिणाम होत आहे. फोनवरील गेम्स, व्हिडिओज आणि सोशल मीडियाचे आकर्षण इतके वाढले आहे, की वास्तव जगापेक्षा आभासी जग त्यांना अधिक प्रिय वाटू लागले आहे.

तंत्रज्ञान हे शाप नाही, पण त्याचा अतिरेक नक्कीच धोकादायक आहे. स्मार्टफोन हा साधन म्हणून उपयोगी आहे, पण त्याच्या विळख्यात अडकून बालपण हरवणे ही अत्यंत चिंतेची बाब आहे. आज गरज आहे ती संतुलन राखण्याची – तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांमध्ये योग्य समतोल साधण्याची.

स्मार्टफोनच्या विळख्यात बालपण - हरवलेला आनंद की प्रगतीचा शाप?

आजच्या २१ व्या शतकात तंत्रज्ञानाने मानवी आयुष्य कमालीचे सोपे केले आहे. मात्र, याच तंत्रज्ञानाचा एक भाग असलेला स्मार्टफोन आजच्या लहान मुलांसाठी एक मोठे संकट बनू लागला आहे. ज्या वयात मुलांच्या हातात माती, खेळणी आणि

गोष्टीची पुस्तके असायला हवीत, त्या वयात आज त्यांच्या हातात चमकणारे आणि वेगवान इंटरनेट आले आहे. मुलांचे निरागस बालपण आता हळूहळू या डिजिटल स्क्रीनमध्ये लुप्त होताना दिसत आहे.

मैदानी खेळांची जागा घेतली व्हर्च्युअल जगाने

काही दशकांपूर्वी, संध्याकाळ झाली की मैदाने मुलांच्या आवाजाने दुमदुमून जात असत. लपंडाव, विटी–दांडू, पकडापकडी यांसारख्या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम होई आणि सांघिक भावना वाढायची. पण आज चित्र बदलले आहे. मुले तासन्तास एका जागी बसून पबजी, फायर किंवा रोलॉस सारखे गेम्स खेळताना दिसतात. यामुळे मुलांची शारीरिक हालचाल मंदावली असून बालपणीच लठ्ठपणा आणि मधुमेहासारखे आजार बळावत आहेत. या वाढत्या स्क्रीनच्या वापराचा सर्वात मोठा परिणाम मुलांच्या शारीरिक आरोग्यावर होत आहे. सतत स्क्रीनकडे बघितल्यामुळे आज डोळ्यांचे विकार, डोकेदुखी, झोपेच्या समस्या वाढत आहेत.

स्मार्टफोनमुळे मुलांच्या सामाजिक वर्तणुकीतही बदल होत आहे. प्रत्यक्ष संवाद कमी झाला आहे. मित्रांशी खेळण्याऐवजी ते ऑनलाईन गेम्समध्ये गुंतून राहतात. त्यामुळे त्यांच्यातील सहकार्य, समजूतदारपणा, भविष्यात आवश्यक असणारी भावनिक जुळवाजुळव या गुणांचा विकास होत नाही. नात्यांमध्ये ऊब राहात नाही. मुले अधिक एकाकी बनतात.

या समस्येसाठी केवळ मुलांना दोष देणे योग्य नाही. पालक आणि समाज या दोघांचीही याबाबत मोठी जबाबदारी आहे. व्यस्त जीवनशैलीमुळे मुलांसाठी वेळ देणे कमी झाले आहे. परिणामी, स्मार्टफोन हा त्यांच्या मित्रासारखा बनतो. पण हा मित्र त्यांच्या बालपणाला गिळंकृत करत आहे, हे लक्षात येत नाही.

या परिस्थितीवर उपाय काय?

सर्वप्रथम, पालकांनी मुलांसोबत अधिक वेळ घालवणे आवश्यक आहे. त्यांना खेळण्यासाठी प्रोत्साहन देणे, निसर्गाशी जोडले जाण्यासाठी त्यांना उत्तेजन देणे, पुस्तके वाचण्याची सवय लावणे हे महत्त्वाचे आहे. स्मार्टफोनचा वापर पूर्णपणे बंद करणे शक्य नसले तरी यावर मर्यादा आणणे अत्यंत गरजेचे आहे. शाळांनीही याबाबत जागरूकता निर्माण करावी आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवावेत.

मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम

स्मार्टफोनच्या अतिवापरामुळे मुलांच्या मनावर गंभीर परिणाम होत आहेत. सोशल मीडियावरील लाईक्स आणि कमेंट्सच्या जगात मुले स्वतःची तुलना इतरांशी करू लागली आहेत. यातून त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होत आहे. तसेच, सततच्या फोन वापरामुळे मुलांमध्ये चिडचिडेपणा, एकाग्रतेचा अभाव आणि झोपेच्या तक्रारी वाढल्या आहेत. मैदानी खेळांतून मिळणारा खरा आनंद आता डोपामाईन या कृत्रिम लहरीमध्ये अडकला आहे.

कल्पनाशक्तीचा ऱ्हास

बालपण म्हणजे कल्पनांच्या जगात जगणे. आजी-आजोबांच्या गोष्टी ऐकून स्वतःचे एक वेगळे विश्व निर्माण करण्याची ताकद मुलांमध्ये असायची. मात्र, आता स्मार्टफोनवर तयार केलेले व्हिडिओ आणि रील्स बघितल्यामुळे मुलांच्या स्वतःच्या विचार करण्याच्या आणि कल्पनाशक्तीच्या क्षमतेवर मर्यादा येत आहेत. त्यांना रेडिमेड मनोरंजन मिळत असल्यामुळे ती स्वतः काही नवीन निर्माण करण्याचा प्रयत्न करत नाहीत.

सामाजिक संवाद आणि कौटुंबिक दुरावा

आज एकाच घरात राहूनही घरातील सदस्य एकमेकांशी बोलण्याऐवजी आपापल्या फोनमध्ये व्यस्त असतात. मुले पालकांशी संवाद साधण्यापेक्षा युट्यूबवरील अनोळखी व्यक्तींचे व्हिडिओ बघण्यात धन्यता मानतात. यामुळे मुलांमध्ये सामाजिक कौशल्यांचा अभाव निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. कोणाशी कसे बोलावे, भावना व्यक्त कशा कराव्या हे त्यांना उमजेनासे झाले आहे.

पालकांची जबाबदारी

आपल्या मुलांना स्मार्टफोनच्या विळख्यामधून सहीसलामतरीत्या बाहेर काढण्यासाठी पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेकदा पालक आपले काम सोपे व्हावे यासाठी मुलांच्या हातात फोन देतात. ही फार मोठी चूक आहे.

- जर पालक सतत फोन वापरत असतील, तर मुलेही तेच करणार. यामुळे मुलांसमोर फोनचा वापर मर्यादित ठेवावा.
- मुलांना फोन वापरण्यासाठी ठरावीक वेळमर्यादा घालून द्यावी.
- मुलांना वाचन, चित्रकला, संगीत किंवा मैदानी खेळांकडे वळवावे.

निष्कर्ष

स्मार्टफोन हे प्रगतीचे साधन आहे, पण याचा अतिवापर बाल्यावस्थेचा शत्रू ठरत आहे. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणासाठी आणि ज्ञानासाठी जरूर व्हावा, पण तो मुलांच्या नैसर्गिक विकासाच्या आड येऊ नये. जर आपण वेळीच सावध झालो नाही, तर भविष्यात आपल्याकडे यंत्रासारखी चालणारी मुले असतील, पण त्यांच्याकडे मानवी संवेदना आणि निरागस बालपण नसेल.

शेवटी असे म्हणता येईल, की बालपण हा आयुष्यातील सर्वात सुंदर आणि नाजूक टप्पा आहे. ते स्क्रीनच्या प्रकाशात नव्हे, तर निसर्गाच्या सान्निध्यात, खेळांच्या आनंदात आणि नात्यांच्या ऊबेत फुलायला हवे. जर आपण आज जागे झालो नाही, तर उद्याचे बालपण केवळ ऑनलाईन राहील आणि आयुष्यातला खरा आनंद हरवून गेलेला असेल.

मुलांना गॅजेट्स देऊ नका, त्यांना तुमचा वेळ द्या! कारण स्मृतींमध्ये फोनचे पिक्सेल्स नाही, तर तुमच्यासोबत घालवलेले क्षण जिवंत राहतात. ■

छायाचित्र दालन

फेब्रुवारी २०२६ करिता गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न, सर्वोत्कृष्ट मालमत्ता हस्तगत व सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी या बक्षिसांकरिता खालील नमूद गुन्हेतपासांची निवड करण्यात आली. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न या बक्षिसासाठी गोंदिया घटकातील सालेकसा पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्ट्रेशन क्रमांक ४२२/२०२५ ची निवड करण्यात आली. पोलीस निरीक्षक भूषण बोराडे, सहायक पोलीस निरीक्षक किशोर मावसकर, पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम आहेरकर, पोलीस अंमलदार ठाकरे व जांभूळकर यांना प्रत्येकी रुपये २००० रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षीस हे ठाणे शहर घटकातील शिळ डायघर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्ट्रेशन नंबर १३७/२०२१ या गुन्ह्याला जाहीर झाले असून पोलीस निरीक्षक रामचंद्र काशिनाथ मोहिते व पोलीस अंमलदार सचिन माधव सावळे यांना अनुक्रमे रुपये १५,०००/- व रुपये १०,०००/- पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. **सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी मे महिन्याच्या सदर अंकात पृष्ठ क्रमांक ५४ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.** ■

पोलीस निरीक्षक रामचंद्र मोहिते, शिळ डायघर सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी

पोलीस अंमलदार सचिन सावळे, शिळ डायघर सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी

कथा

बेवारस

सचिन बेंडभर
जुन्नर

दुपारचा एक वाजला होता. अंगणातल्या बदामाच्या झाडाखाली सावलीला घोंगडं टाकून सारं घरदार गणपादाची वाट बघत व्हतं. कुणीच कुणासंगं बोलंना. तेवढ्यात मालूच्या मांडीवर बसलेल्या सुमीनं 'गणपादा आला' म्हणताच सगळी टवकारली. गणपादा आला, तसाच घरात घुसला. आप्पाच्या फोटूकडं एकटक बघत राहिला. डोळ्यांतून टपाटपा आश्रू वघळाया लागलं.

आप्पाचा कालच दशक्रिया विधी पार पडला होता. तसा विचार केला, तर आप्पानी जग जितलंच म्हणावं लागलं. थोडं आढंवेढं घेतलं कावळ्यांनी, पण बहिनीनी पिंडाच्या पाया पडताच शिवला अन् कशातच जीव गुतला नाय, हे

आप्पानी जगाला दाखवून दिलं. लोकांनी अशा दुःखात बी कावळा शिवल्यावर टाळ्या पिटल्या.

आप्पा तसा एकाएकीच गेला. ना दुखणं, ना खुपणं. एका कंपनीच्या पाईप लायनीत आप्पाची जमीन गेली, त्या जागेची भरपाई म्हणून पावणेतीन लाख रुपये मिळालं.

आप्पाला दोन मुलगं. ते बी लेकुरवाळं. पण आप्पाला वाटायचं लेकासुनंच्या ताब्यात माल गेला, की म्हातारपणी आपुन उघडंच. त्यात शेजारपाजारच्या मंडळींनी कान फुकलं. लेकीनीबी टेका दिला, तसं म्हातारं जाम फुगलं. आप्पाचा थोरला मुलगा गणपादा, त्याचा इश्वास वाटायचा म्हाताऱ्याला, पण धाकटा मारुती दहावी नापास असला तरी आप्पाला त्यो चॅप्टर वाटायचा. म्हणून आप्पानी आपल्या भाच्याला म्हणजे हनुमंतरावला बोलावून घेतला. त्यो गडी भलता हुशार. एवढं त्याचं बाजारीगाव पण दहा वर्षं सरपंचपदावरून हटला नाय.

आप्पानी घरात जाहीर करून टाकलं,

''पावणेतीन लाखातलं पंचवीस हजार बहिनीला म्हणजे हनुवतरावाच्या नावावर टाकणार आन् आडीच लाख माझ्या नावावर ठेवून दोन्ही मुलगं वारस लावणार. माझ्या मागं ते तुमचंच हायेत.''

धाकट्या लेकासुनंला

पैसं मिळायचा टाईम आला तसा हनुमंतराव हजर. सगळ्या घरादारावर त्याची छाप. सगळ्या पैशाचं ठरल्यानुसार दोन चेक काढायचं तसा दोन्ही आकड्यातला फरक व साम्य त्याच्या नजरंत रुतलं.

मिरच्या झोंबल्या, पण गणपादाच्या समजूतदारपणामुळं ती दोघंबी गार पडली. पैसं मिळायचा टाईम आला तसा हनुमंतराव हजर. सगळ्या घरादारावर त्याची छाप. सगळ्या पैशाचं ठरल्यानुसार दोन चेक काढायचं तसा दोन्ही आकड्यातला फरक व साम्य त्याच्या नजरंत रुतलं. मदाऱ्याला बी जमायचं नाय असा तो आकड्यांच्या खेळात तरबेज. सरपंच असताना सरकारी योजनांचं चेक गावाला आलं, कुणी किती बी ध्यान दिलं तरी त्याच्यापुढे चेक झिरपायचंच.

हनुमंतरावनी म्हाताऱ्याला इंडिकात टाकलं. बजावून सांगितलं,

''कंपनीवालं लई लबाड. तुम्हाला बोलण्यात फसवित्याल. मीच काय ते बोलतो.''

ठरल्याप्रमाणे आप्पानी सांगून टाकलं, 'माझा भाचा म्हणंल तसं करा.' हनुमंतरावानी आप्पाचं संमतिपत्रक लिहून दोन चेक घेतलं. बँकेत आप्पाचं खातं काढलं व्हतं. बँकेत चेक जमा केला. बाहेर आल्यावर हनुमंतरावानी पासबूक काढून बँकेच्या साहेबानी लिहिलेल्या रकमेवर एक शून्य चढवला. आप्पाला किरकोळ खर्चाला पाचश्याची पत्ती हवाली करून गाडीतून घरी आणून सोडला. आप्पानी घरी येताच ट्रंकेत पासबूक ठेवलं. आप्पाच्या सांगण्यावर इश्वास ठेवण्यापेक्षा खात्री करावी म्हणून गणपादानी म्हाताऱ्याला बोलण्यात गुंगावलं तसं मारुतीनी पासबूक काढून अडीच लाख असल्याची खात्री करून घेतली. पंचवीसावर किती शून्य हायेत ते हातावर लिहून घेतलं अन् हसतहसत गपपादाला खुणावलं, ''बरुबर हाये समदं.''

चेक खात्यावर भरला, त्या दिवसापासून आप्पाची झोपच उडाली. आप्पा झोपला तरी बोटं चाळायचा. रातच्याला कधीही उठून बसायचा. दिवसा झाडाखाली उताणा पडून अडीच लाख म्हंजी किती? याचाच विचार करायचा. मधीच गालातल्या गालात हसायचा.

आप्पाची भावकी तशी जवळच. कुणी म्हाताऱ्याला उलटसुलट शिकवील म्हणून सारं घरदार त्याच्या पाळतीवर असायचं. आप्पाच्या बहिनीचा फेरा आठवड्याला सुरू झाला. भावाला काही भलतंसलतं शिकवील म्हणून धाकटी सून तिच्या मागावर असायची.

आप्पाच्या डोक्यातल्या वादळात प्रश्नच प्रश्न उधळायचे. अडीच लाख म्हणजे हजाराच्या किती नोटा? पाचश्याच्या किती? डोक्यात तसाच किंतू घेऊन म्हातारं

दोन महिन्यात थकलं. मनातलं काहूर वाढतच गेलं, त्याचं वादळ झालं अन् बोट चाळता चाळताच एक दिवस म्हातारं गेलं. घरादाराला दुःख झालं, पण भावकीला वाटलं, 'मेलं ते मेलं पण शनिवारीच गेलं...' सगळा क्रियाकर्म उरकला. म्हणून गणपादा आज बँकेत गेला व्हता.

पासबूक बँकेत दाखवून अडीच लाखाची चौकशी केली, पण आप्पाच्या नावावर पंचवीस हजारच हायेत, हे ऐकून हिरमुसल्या तोंडानी माघारी फिरला. घरात येताच आप्पाच्या फोटुकडं बघत पुटपुटला, 'वारस लावतो म्हणला पर बेवारस केलंस!'

इचार करता करता लोकं बोलल्याचं त्याला आठवलं. हनुमंतरावानी रस्त्याचं डांबर खाल्लं, दवाखान्याचं सिमेंट खाल्लं, शाळेची कौलं खाल्ली पण गड्या मामाचंबी...गणपादा पुरा गोंधळला व्हता. तसाच फोटूपुढं पडून राहिला. एव्हाना सारं घरदार जमा झालं व्हतं.

मारुती व्याकूळ होऊन बोलला,

''आपल्याला त्ये पैसे धार्जिनंच नाय. दोन महिन्यात म्हाताऱ्याची चटणी झाली अन् आता गणपादालाबी बाधलं की काय?''

तसा गणपादाच्या बायकोनी व मुलीनी हंबरडा फोडला. ■

कविता

मी पुन:श्च हरी ओम केलाय...

मी देखील पुन्हा आज पुन:श्च हरीओम केलाय,
माझाच भुतकाळ माझ्या पुढे आज नतमस्तक झालाय.

विखुरलेल्या जिर्ण स्वप्नांना मी आशेच पाणी घातलंय,
अपयशाच्या साऱ्या जखमांना मी प्रयत्नांनी स्वच्छ धुतलंय.

थकलेल्या माझ्या श्वासांना, मी पुन्हा संजीवन दिलंय,
वेढलेल्या वटवृक्षावर पुन्हा एक नव पान आलंय.

तुजा कुठेही माझ मी मन आटलंय,
तुझ्या शिवाय जगावंसं, मला आज मनापासून वाटलंय.

क्षितीजं सारी एकवटून, मी आकाश पालथ घातलंय,
दाही दिशांना एकवटून मी माझं सर्वस्व थाटलंय...

बाळकृष्ण ठाणगे
नेवासे,
अहिल्यानगर.

कर्तृत्वाची परीक्षा

विजया पंधारे
पोलीस निरीक्षक (गुन्हे)
गाडगे नगर पोलीस ठाणे

पोलिसांना कधी कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागेल याचा नेम नाही. आव्हान निर्माण झाले, की त्याला तोंड देते वेळी ना पोलीस स्टेशनच्या हद्दीची मर्यादा असते; ना जिल्ह्याची. बस संकट कोसळावे आणि खाकी वर्दिने ते पदरात सामावून घ्यावे असे सूत्रच झाले आहे. महाराष्ट्र पोलीस एकत्र येवून कोणत्याही कठीण प्रसंगाला तोंड देण्याचे सामर्थ्य व ती ऊर्जा नेहमीच जपतो आहे. काही संकटे सोडवताना फक्त ताकद लागते, तर काही संकटांना सोडवताना या काटेरी फणसरूपी पोलिसाचे मन मऊ गऱ्यासारखे होऊन जाते. अशाच प्रसंगाचा

प्रत्यय देणारी घटना अमरावती शहर येथील फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील अकोला हायवे वरील खदान टेकडी येथे घडली. दि. २२ मार्च २०२६ – रविवारचा दिवस. पोलीस अधिकाऱ्यांना क्वचित मिळणारी साप्ताहिक सुट्टी. कोण जाणे कधीकधी घटनादेखील पोलिसांच्या कर्तृत्वाची परीक्षा घेण्यासाठी घडतात की काय..!! आणि अशीच पोलिसांच्या कसरतीची परीक्षा घेणारी घटना सुरू झाली ती अशी–

गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ १, अमरावती शहर यांनी पोलीस नियंत्रण कक्ष येथे एक कॉल हस्तांतरित केला. सदर कॉलनुसार एक महिला ही आत्महत्या करण्यासाठी १५० मीटर खदान टेकडी, अकोला हायवे रोड येथे चढली आहे. परिणामी दामिनी पथक, सी.आर. मार्शल तसेच विजया पंधरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस ठाणे गाडगे नगर यांना माहिती देऊन ताबडतोब घटनास्थळी रवाना करावे अशा सूचना श्री. शिंदे पोलीस उपायुक्त परिमंडळ–१ यांनी दिल्या होत्या. सदरचे घटनास्थळ पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांच्या पोलीस ठाण्यातील नसले तरी त्यांना आत्महत्या रोखण्याचे प्रकरण चांगले हातळण्याचा अनुभव असल्याने त्यांना सदर घटनास्थळी पाठविण्यात आले.

सदरची माहिती संबंधितांना तत्काळ देण्यात आली, परंतु वेगवेगळ्या पोलीस कर्तव्यात व्यस्त असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी अन्य सर्व कामे सोडून गर्भवती महिलेला

गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ १, अमरावती शहर यांनी पोलीस नियंत्रण कक्ष येथे एक कॉल हस्तांतरित केला. सदर कॉलनुसार एक महिला ही आत्महत्या करण्यासाठी १५० मीटर खदान टेकडी, अकोला हायवे रोड येथे चढली आहे. परिणामी दामिनी पथक, सी.आर. मार्शल तसेच विजया पंधरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस ठाणे गाडगे नगर यांना माहिती देऊन ताबडतोब घटनास्थळी रवाना करावे अशा सूचना श्री. शिंदे पोलीस उपायुक्त परिमंडळ-१ यांनी दिल्या होत्या.

वाचवण्याच्या कामास प्राधान्य देत त्यांनी घटनास्थळी धाव घेतली.

गाडगे नगर पोलीस ठाणे येथे साध्या वेशात पॉक्सोच्या तपासात व्यस्त असलेल्या पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी क्षणाचाही विलंब न लावता पोलीस ठाण्याचे शासकीय वाहन व पोलीस अंमलदार विनोद दांडगे, मनोहर जाधव व महिला पोलीस अंमलदार नितीन कामडी व यांच्यासह घटनास्थळी रवाना झाल्या. घटनास्थळी बघ्यांची खूप गर्दी जमलेली होती. मात्र गर्भवती महिलेला वाचवायला टेकडीवर चढण्याची कोणी हिंमत करत नव्हते अशा वेळी कस लागतो तो पोलिसांच्या हिंमतीचा व प्रसंगावधान राखत निर्णय घेण्याचा.

विश्वजीत सरनाईक पोलीस ठाणे फ्रेजरपुरा हे डि. ओ. कर्तव्यावर असल्याने त्यांनी तत्परतेने रुग्णवाहिका व अग्निशमन घटनास्थळी बोलावून घेतले. विजया पंधरे व दामिनी पथक कर्तव्यावर असणाऱ्या सुनिता वानखडे व रजनी ढवळे ह्या सरनाईक यांच्यासह सरळ व मोठ्या आकाराचे दगड असलेल्या टेकडीवर झपाझप चढून वर गेले. दगडावरून पाय घसरण्याची छोटी चूकदेखील खूप महागात पडून जिवावर बेतणारी होती, परंतु त्याची त्याची पर्वा न करता गर्भवती महिलेला सुखरूप व सुरक्षित ठेवण्याचा जणू त्यांनी मनाशी चंगच बांधला होता. योग्य ती सर्व खबरदारी घेत सर्व पोलीस त्या महिलेपर्यंत सावधगिरीने पोहोचून व तिला बोलण्यात गुंतवले. बोलता बोलताच २ खाजगी लोकांच्या मदतीने पकडून टेकडीच्या काठावरून टेकडीच्या मध्यभागावर आणले व तिला शांत करून आत्महत्या न करण्याबाबत पोलीस निरीक्षक विजया पंधरे यांनी समुपदेशन केले. यावेळी सदर महिला आत्महत्या न करता स्वत:चा दवाखान्यात उपचार करायला तयार झाली. मात्र ती जागेवरच बेशुद्ध झाल्याने तिला दामिनी पथकच्या महिला पोलीस अंमलदार सुनीता वानखडे व रजनी ढवळे यांनी त्या

महिलेचे थंड पडलेले हातपाय चोळून तिचे डोके मांडीवर घेऊन तिला दिलासा दिला. पंधरे यांनी ॲम्ब्युलेन्समधील डॉक्टर व स्टाफ यांना कापडी स्ट्रेचर घेऊन टीम सह टेकडीवर बोलावले. तसेच मोठी जाड दोरी घेऊन पोलीस अंमलदार योगेश श्रीवास, हरिष चौधरी, नितीन कामडी, जयेश परिवाले, मनोहर जाधव, अभिजीत नंदागवळी, रोशन वऱ्हाडे, केशव निकम, रोशन डोंगरे, विनोद दांडगे हे सदर महिलेला टेकडीवरून खाली आणायला टेकडीवर आले आणि लगेच टेकडीवरील झाडाला दोरीची दोन्ही टोके बंधून खाली दोऱ्या सोडल्या. पोलीस स्टाफने त्यांच्याकडे असलेले शेले, दुपट्टे काढून सदर महिलेला स्ट्रेचरवर व्यवस्थित व सुरक्षित बांधण्याकरिता दिले. लोकप्रिय व्यक्तिमत्त्व असलेले कर्तव्यदक्ष शिंदे यांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी घटनास्थळी स्वत:हून हजर होऊन महिलेल्या सुरक्षित खाली कसे आणायचे याचे मार्गदर्शन केले. त्याबरहुकुम उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच काही सुज्ञ नागरीक यांच्या मदतीने सदर गर्भवती महिलेस टेकडीवरून सुरक्षित खाली आणण्यात आले.

'देव तारी त्याला कोण मारी' असे असले, तरी पोलीससुद्धा देवदूतासारखा आहे. पोलिसांची ही शौर्याने परिपूर्ण असलेली कसरत साधीसुधी वाटत असली, तरी मोठा धोका पत्करणारी व चॅलेंजिंग होती. त्या महिलेने त्या उंच दगडी टेकडीवरून उडी मारली असती, तर ती महिला व तिच्या पोटातील बाळ फार वाईट अवस्थेत मृत पावले असते. नागरिकाची सतर्कता व पोलिसांचे तिला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करण्याचे कौशल्य नक्कीच वाखाणण्यासारखे आहे.

सदर महिलेला टेकडीवरून खाली आणायला टेकडीवर आले आणि लगेच टेकडीवरील झाडाला दोरीची दोन्ही टोके बंधून खाली दोऱ्या सोडल्या. पोलीस स्टाफने त्यांच्याकडे असलेले शेले, दुपट्टे काढून सदर महिलेला स्ट्रेचरवर व्यवस्थित व सुरक्षित बांधण्याकरिता दिले. लोकप्रिय व्यक्तिमत्त्व असलेले कर्तव्यदक्ष शिंदे यांनी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी घटनास्थळी स्वत:हून हजर होऊन महिलेल्या सुरक्षित खाली कसे आणायचे याचे मार्गदर्शन केले. त्याबरहुकुम उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार, तसेच काही सुज्ञ नागरीक यांच्या मदतीने सदर गर्भवती महिलेस टेकडीवरून सुरक्षित खाली आणले गेले.

गर्भवती महिला व तिचे बाळ सुरक्षित असल्याचे डॉक्टरांनी पोलिसांना कळविताच त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. 'याची देही याची डोळा, पाहावा तो सोहळा अनुपम्य' अशी त्यावेळची स्थिती झाली होती. बजावलेल्या कर्तव्याचे पोलिसांना समाधान तर वाटलेच पण जनसामान्यात पोलिसांची प्रतिमा उंचावून पोलीस कर्तव्यावर जनतेचा भक्कम विश्वास निर्माण झाल्याचा एक अनोखा अभिमान देखील पोलिसांना वाटत होता. अमरावती शहर पोलिसांनी केलेल्या या कामगिरीचे जनतेने भरभरून कौतुक केले आहे.

अभिनंदनास पात्र असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांनीही आलेला हा कठीण प्रसंग मोठ्या कौशल्याने यशस्वीरित्या हाताळून समाजात खाकीचा रुबाब कायम ठेवत उत्कृष्ठ कामगिरी बजावली. इतरांनी व पोलिसांनी या घटनेपासून प्रेरित होण्याचे आवाहन श्री. राकेश ओला , पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी केले आहे. ■

आशा : अभी ना जाओ छोड कर

संजीव देवकर
पुणे

नावाप्रमाणेच अनेक मरगळ आलेल्या मनांना जगण्याची उमेद देणाऱ्या आणि आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहण्याची इच्छा असणाऱ्या आशाताई अनेक रसिकश्रोत्यांच्या आठवणीत सदैव ताज्याच राहतील. आशाताईंनी आजवर विविध शैलींची गाणी गाऊन स्वत:ची वेगळी छाप निर्माण केली. जगातल्या अनेक भाषांमधून गाण्याचा जागतिक विक्रम करणाऱ्या पद्मविभुषण पुरस्काराने सन्मानित आशाताईंना विनम्र श्रद्धांजली.

आशा या नावात उमेद, अपेक्षा आणि इच्छा तर भोसले नावात तेज, पराक्रम आणि शौर्य! अशी पार्श्वभूमी असलेल्या ख्यातनाम पार्श्वगायिका आशा भोसले यांचा अत्यंत तेजोमय, आशादायी आणि तितकाच संघर्षमय जीवनप्रवास अखेर ९२ व्या वर्षी थांबला. तेव्हा रसिकांच्या ओठांवर अभी ना जाओ छोड कर, के दिल अभी भरा नहीं याच ओळी रेंगाळत राहिल्या. मराठी, हिंदी, बंगाली, पंजाबी, तेलगू–तमिळ तसेच जगभरातील २० भाषांतून ११ हजारांपेक्षा जास्त गाणी गाण्याचा विश्वविक्रम करणाऱ्या कालातीत आवाजाच्या लोकप्रिय अभिजात गायिका आशा भोसले यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयामध्ये निधन झाले.

महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात पंडीत दिनानाथ मंगेशकर यांच्या कुटुंबात ८ सप्टेंबर, १९३३ रोजी जन्मलेल्या आशाताई यांनी मागील आठ

दशके आपल्या वैविध्यपूर्ण गाण्यांनी आणि जादुई आवाजाने भारतातीलच नव्हे, तर जगभरातील संगीतप्रेमींचे विश्व समृद्ध केले. सांगली येथील वास्तव्यात वडील पं. दिनानाथ यांनी जगाचा निरोप घेतला, तेव्हा आशाताई केवळ ९ वर्षांच्या होत्या. पुढे माई मंगेशकर यांनी आपल्या मुलांसह सांगली सोडून मुंबईत वास्तव्य केले. तत्पूर्वी आशाताईंचे ४ थ्या इयत्तेतच शिक्षण सुटले होते. माईंनी मुंबईत आल्यावर पं. नागपूरकरांकडे आशाताईंना संगीत शिक्षणाचे धडे गिरवायला लावले. वडील मा. दिनानाथ यांच्याकडून मिळालेला स्वरांचा वारसा पुढे नेत आशाताईंनी मग संगीताचे शिक्षण घेत गायकीत आपला आगळावेगळा ठसा उमटविला. पण तो प्रवास इतका सहज आणि सोपा नव्हता. अनेक कसोट्या, परीक्षा, कठीण प्रसंगांना तोंड देत, प्रसंगी आघात पचवत आशाताईंचा हा संघर्षमय प्रवास झाला.

चांगली गायिका ते अभिजात पार्श्वगायिका हा खडतर प्रवास आणि संगीतमय कारकिर्द घडविताना आशाताईंना अनेक कठीण प्रसंगातून जावे लागले. वाटेत भोगावे लागणारे दुःख ही पचवावे लागले. व्यक्तीगत आयुष्यातील अनेक चढउतार, संगीत क्षेत्रातील स्पर्धा, नियतीने पदरात टाकलेले दुःख, उपेक्षा या सर्वांवर आशाताईंनी जिद्दीने मात करत चिकाटीने व कष्टाने मानाचे स्थान प्राप्त केले.

सुरुवातीच्या काळात संगीत क्षेत्रात कारकिर्द घडत असताना एकीकडे अमीरबाई, जोहराबाई, शमशाद बेगम, गीतादत्त सारख्या दिग्गज गायिकांचा सामना करावा लागला. तर दुसरीकडे स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर नावाच्या वलयापासून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करायची परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागली. अगदी सुरूवातीला मराठीत 'चला चला नवबाला' (माझं बाळ) आणि हिंदी चित्रपटात सावन आजा (चुनरिया – १९४७) गीत गाण्याची संधी त्यांना मिळाली. मात्र पुढे अनेक वर्षे दुय्यम गाणीच त्यांच्या वाट्याला आली. तब्बल दहा वर्षांच्या संघर्षानंतर संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या सानिध्यात आशाताईंचा आवाज निखरला. पुढे अनेक चित्रपटांतून मुख्य नायिकेचा हा आवाज बनला.



सन १९५२ ते १९५७ याकाळात संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या संगीतात उडे जब जब झुल्फे तेरी म्हणत उडत्या चालीत आशाताईंच्या आवाजाने आकाशात उंच भरारी मारली. नंतर संगीतकार सचिनदेव बर्मनदांनी सिनेमातील व्यक्तिरेखांना नजरेसमोर ठेवून गाणी गाण्याची आशाताईंना शिकवण दिली. आशाताईंना कारकिर्दीत हा सल्ला उपयुक्त ठरला. मग बर्मनदांच्या संगीतात १९५७ ते १९६२ या पाच वर्षांमध्ये ओ पंछी प्यारे गात आशाताईंचा स्वर प्रमुख बनत स्थिरावला. संगीतकार राहूलदेव बर्मन यांच्या समवेत काम करताना तर आशा भोसले यांचा आवाज उच्च टिपेला टच करत एका वेगळ्याच उंचीवर पोहोचला. 'ओ मेरे सोना रे सोना रे' म्हणत आशा भोसले यांचे पंचमदांसोबत

सर्वांथांनी सूर जुळले. दोघांनी अनेक युगलगीते गायली. दरम्यान पंचमदांनी आशाताईंना अनेक आव्हानात्मक गाणी दिली. जशी की आ जा आ जा, मैं हूँ प्यार तेरा (तिसरी मंझील), दैय्या मैं कहाँ आ फँसी (कारवाँ), दम मारो दम (हरेरामा हरेकृष्णा), मेरा नाम शबनम हैं (कटीपतंग), जाने जा ढूंढता फिर रहा (जवानी दिवानी), चुरालिया हैं तुमने जो दिलको (यादों की बारात), मेरा कुछ सामान (इजाजत) अशी किती गाणी आठवावीत. गाण्यातील मुरक्या, हरकती, आलाप, ताना ही सौंदर्यस्थळे खुबीने हाताळणाऱ्या गायिका म्हणजेच आशा भोसले होय!

संघर्षमय व खडतर प्रवासानंतर प्रकाशझोतात आल्यावर मात्र आशाताईंनी मागे वळून पाहिलेच नाही. ५०-६० आणि ७०-८० तसेच ९०चे दशकच नव्हे तर २००० - २०१० च्या दशकातील रसिकांच्या मनावर या अद्भुत, अलौकिक स्वरांनी गारूड केले. सरदार मलिक, सज्जाद हुसेन, गुलाम महंमद या संगीतकारांकडे गाणी गात गातच संगीतकार सचीनदेव बर्मन, ओ. पी. नय्यर आणि राहूलदेव बर्मन, ए आर रेहमान, जतीन ललित यांच्या संगीत दिग्दर्शनात पार्श्वगायिका आशा भोसले नावाचा अद्भुत आवाज अफलातून खुलला, फुलला आणि रसिक श्रोत्यांच्या मनाला माधुर्य देऊन गेला. आशा भोसले या

आशा भोसले या आवाजाचा आवाका अफाट होता. सुरांच्या साहाय्याने भारतातीलच नव्हे तर जगभरातील रसिक मनावर अधिराज्य गाजवणारा हा एक आगळा वेगळा, विलक्षण आणि कालातीत आवाज राहीला! या आवाजाने प्रत्येक मैफलीत चैत्यन निर्माण करत रसिकांना पर्वणीच बहाल केली.

आवाजाचा आवाका अफाट होता. सुरांच्या साहाय्याने भारतातीलच नव्हे तर जगभरातील रसिक मनावर अधिराज्य गाजवणारा हा एक आगळा वेगळा, विलक्षण आणि कालातीत आवाज राहीला! या आवाजाने प्रत्येक मैफलीत चैत्यन निर्माण करत रसिकांना पर्वणीच बहाल केली.

आशाजींच्या आवाजाला बेहोश धुंदीची किनार होती. या बेहोश धुंदीचा अनुभव घ्यायचा असेल तर देव आनंद यांच्या हरे रामा हरे कृष्णा सिनेमातील दम मारो दम गाणे ऐकून बघा. मुझफ्फर अली यांच्या १९८१ सालातील उमराव जान चित्रपटातील 'ये क्या जगह हैं दोस्तो या गीतातून आशाताईंनी आपल्या गज़ल गायकीचा ठसा निर्माण केला. याच चित्रपटातील गाण्यानी त्यांना पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळवून दिला. मुत्तु कुडी कवाडी हडा (दो फुल) या गाण्यातून प्रांतवार भावभावना व्यक्त करण्यात त्यांचा आवाज समर्थ ठरला. नायिका रेखावर

चित्रित खुबसूरत चित्रपटातील सुन सुन दिदी तेरे लिये एक रिश्ता आया हैं। या गीतातून नात्यातील गोडवा जपला आहे.

आशाताईंनी राधा कैसे ना जले (लगान), चलो बुलावा आया हैं म ाता ने बुलाया हैं (आशा), ओ रोम रोम में बसनेवाले राम (नीलकमल), सभी भक्तों के मन में काली निवास करती (करिश्मा काली का) अशा भक्तीमय रचनांमधून रसिक प्रेक्षकांच्या मनात भक्तीरस फुलविला, तर दिल लगाकर हम ये समझे (जिंदगी और मौत), रात के हम सफर (अॅन इव्हिनिंग इन पॅरिस), अभी न जाओ छोडकर (हमदोनो), चुरा लिया हैं तुमने जो दिल को (यादों की बरात), प्यार जिंदगी हैं (मुकद्दर का सिकंदर), दो लब्जो की हैं कहानी (द ग्रेट गॅम्बलर), कब के बिछडे हुये हम आज (लावारिस), इन आँखों की मस्ती के अफ़साने हजारो हैं (उम राव जान) अशा लडिवाळ, लाडीक प्रेमगीतांमधून ऐकणाऱ्या प्रत्येकाच्या हृदयात प्रेम भावना दरवळत ठेवली.

साठ, सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील रजत पडद्यावरील व्हॅम्पसाठी आशाताईंनी अनेक गाणी गायली. प्रसिद्ध नर्तकी हेलन व गायिका आशा भोसले या जोडगोळीने हिंदी चित्रपटात कॅब्रेगीत आणि डान्सने धुमाकूळ घातला होता. आई ये मेहरबा (हावडी ब्रीज), ये मेरा दिल प्यार का दिवाना (डॉन), पिया तू अब तो आजा (कारवाँ), दिल जलो का दिल जला के (जंजीर), हुस्न के लाखो रंग (जॉनी मेरा नाम) ही त्या त्या काळात गायलेली क्लब गीते ऐकताना रसिक प्रेक्षकांना आज ही थिरकायला लावतात. सोबतच ९० आणि अलिकडच्या काळातील तन्हा तन्हा यहाँ पे जीना (रंगीला), कोई आये तो ले जाये (घातक), बच के तू रहना रे बच के तू रहना, खल्लास (कंपनी) अशी त्यांच्या

संगीतकार सुधीर फडके अर्थात बाबुजी यांच्याबरोबर गायन केलेली फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश, धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, स्वप्नात रंगले मी चित्रात दंगले मी, चंद्र आहे साक्षीला तसेच शारद सुंदर चंदेरी राती, मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजुनी, सांज ये गोकुळी सावळी सावळी, ऋतू हिरवा ऋतू बरवा, माझिया मना जरा थांबना अशी किती तरी गाणी आठवत आहेत.

आवाजाची फोडणी दिलेली काही आयटम साँग्ज देखील अत्यंत गाजली. ले गयी ले गयी, दिल ले गयी ले गयी (दिल तो पागल हैं) आणि 'खल्लास' या गीतांवर २१ व्या शतकातील तरुण– तरुणींनाही या आवाजाने मंत्रमुग्ध केले.

पार्श्वगायिका आशा भोसले यांनी चार पिढ्यांना खिळवत ठेवत आपल्या आवाजाने बेधुंद केले. अगदी भावगीत, भक्तीगीते, कॅब्रे, लावणी, नाट्यगीते, प्रेमगीत, गजल, मुजरा, कव्वाली आणि विरहगाणी अशा सर्व प्रांतात आशाताईंनी लीलया भरारी मारली. महम्मद रफी आणि आशा भोसले (७८१ द्वंद्वगीते), किशोरकुम ार आणि आशा भोसले (८०९ द्वंद्वगीते) यांच्या सोबत गायलेली गाणी अत्यंत गाजली. रसिकांसाठी ही एक मेजवानीच ठरली आहे.

पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार, दोन राष्ट्रीय पुरस्कार, अनेक फिल्म फेअर अॅवॉर्ड, ग्रॅमी अॅवॉर्ड आणि जीवन गौरव, महाराष्ट्र भुषण यांसारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित गायिका आशा भोसले यांनी मराठीत देखील विपुल आणि वैविध्यपूर्ण गाणी गायलेली आहेत. संगीतकार सुधीर फडके अर्थात बाबुजी यांच्याबरोबर गायन केलेली फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश, धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, स्वप्नात रंगले मी चित्रात दंगले मी, चंद्र आहे साक्षीला तसेच शारद सुंदर चंदेरी राती, मलमली तारुण्य माझे, तरुण आहे रात्र अजुनी, सांज ये गोकुळी सावळी सावळी, ऋतू हिरवा ऋतू बरवा, माझिया मना जरा थांबना अशी किती तरी गाणी आठवत आहेत.

आजही त्यांच्या निधनानंतर मनातील आशा ही, की 'अभी ना जाओ छोड कर' अशी व्हर्साटाईल पार्श्वगायिका आशा भोसले यांना साद घालत ही भावपूर्ण आदरांजली.... ■

डायल ११२ आणि दापोडी पोलीस ठाण्यात

कार्यरत पोलिसांची तत्पर कारवाई

दिनांक ३१ मार्च २०२६ या दिवशी सायं. १८.२७ वाजण्याच्या सुमारास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीतील दापोडी पोलीस ठाणे परिसरातील हॅरिस ब्रिज येथे एक धक्कादायक घटना घडली. एक महिला पुलावरून उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न करत होती. त्याक्षणी एका सतर्क नागरिकाने प्रसंगावधान राखत ही गंभीर बाब ओळखली आणि ताबडतोब डायल ११२ वर संपर्क साधून मदत करण्याची विनंती केली.

कॉल टेकरने क्षणाचाही विलंब न करता अवघ्या काही सेकंदांमध्ये माहिती संबंधित पोलीस यंत्रणेला पोहोचवली. प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असताना ही जलद प्रतिक्रिया अत्यंत निर्णायक ठरली.

पोलिसांची कारवाई

सदर कॉलची माहिती मिळताच दापोडी डायल ११२ कर्तव्यावरील पोलीस अंमलदार फुंदे व चौगुले यांनी तत्परतेने एक महिला पोलीस अंमलदार भोसले यांच्यासह घटनास्थळी धाव

सुशांत फुंदे
पोलीस अंमलदार
दापोडी पोलीस ठाणे

दिनेश चौगुले
पोलीस अंमलदार
दापोडी पोलीस ठाणे

प्रतिभा पंडित भोसले
महिला पोलीस अंमलदार
दापोडी पोलीस ठाणे

घेतली. घटनास्थळी पोहोचताच संबंधित अंमलदार यांनी हॅरिस ब्रिज, दापोडी येथे सदर अज्ञात महिलेचा शोध घेतला असता सदरची महिला त्या ठिकाणी मिळाली नाही. म्हणून डायल ११२ वर कॉल करणारे कॉलर यांच्याशी मोबाईल फोनवर डायल ११२ चे अंमलदार फुंदे यांनी संपर्क साधला.

फुंदे यांनी सदर घटनेबाबत विचारपूस केली असता, सदर महिला त्यावेळी हॅरिस ब्रिज या ठिकाणी नसून ती तेथून निघून गेल्याचे कॉलर यांनी सांगितले. नंतर डायल ११२ वरील सर्व अंमलदारांनी सदर महिलेचा दापोडी रेल्वे रूळाच्या दिशेने जाऊन शोध घेतला. त्यावेळी त्यांना दापोडी रेल्वे रूळावर एक महिला बसल्याचे आढळले. अंमलदार सदर महिलेजवळ पोहोचले. तिची पाहणी केली असता सदर महिलेच्या पायाला मुका मार लागल्याचे आणि पाय सुजल्याने तिला चालता येत नसल्याचे आढळून आले. तिच्याकडे अधिक चौकशी केली, परंतु सदरची महिला तिचे नाव, पत्ता व इतर कोणतीही वैयक्तिक माहिती देण्यास तयार नव्हती. तरी पोलिसांनी संवेदनशीलता दाखवत तिच्या सुरक्षिततेस प्रथम प्राधान्य दिले व तिला डायल ११२ मोटार वाहनामध्ये बसवून पुढील कायदेशीर प्रक्रिया आणि काळजी घेण्यासाठी दापोडी पोलीस स्टेशन येथे हलविण्यात आले. त्यानंतर पोलीस ठाणे येथे आणून सदर महिलेस अधिक विश्वासात घेऊन तिला धीर देण्यात आला. नंतर

एका जागरूक नागरिकाची सतर्कता आणि डायल ११२ प्रणालीची जलद कार्यवाही यामुळे एक अनमोल जीव वाचला आहे.
पोलिसांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि मानवतेच्या भावनेमुळे एका कुटुंबाला पुन्हा एकदा आशेचा किरण दिसला. ही यशोगाथा समाजात सकारात्मक संदेश देणारी असून प्रत्येकाला संकटाच्या वेळी पुढे येण्याची प्रेरणा देणारी आहे.

तिच्या कुटुंबियांशी संपर्क करून त्यांना पोलीस स्टेशन येथे बोलावून घेण्यात आले. पुढील कारवाईसाठी दिवसपाळी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक देशमुख यांच्या ताब्यात देण्यात आले.

तिच्याकडे अधिक चौकशी केली असता, घरगुती भांडणामुळे ती रागाच्या भरात घरातून निघून सदर ठिकाणी आत्महत्या करण्यासाठी गेल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर ठाणे अंमलदार व इतर महिला यांनी तिला समजावून योग्य ते समुपदेशन केल्यानंतर सदर महिलेला तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात सुखरूप दिले आहे.

निष्कर्ष

सदरची घटना म्हणजे वेळेवर घेतलेला निर्णय आणि तत्पर प्रतिसाद याचे जिवंत उदाहरण आहे. एका जागरूक नागरिकाची सतर्कता आणि डायल ११२ प्रणालीची जलद कार्यवाही यामुळे एक अनमोल जीव वाचला आहे.

पोलिसांच्या धैर्य, कर्तव्यनिष्ठा आणि मानवतेच्या भावनेमुळे एका कुटुंबाला पुन्हा एकदा आशेचा किरण दिसला. ही यशोगाथा समाजात सकारात्मक संदेश देणारी असून प्रत्येकाला संकटाच्या वेळी पुढे येण्याची प्रेरणा देणारी आहे.

यातील महिलेस आत्महत्येच्या प्रयत्नापासून वाचविणारे डायल ११२ कर्तव्यावरील पोलीस अंमलदार फुंदे, चौगुले व महिला पोलीस अंमलदार भोसले यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ■

प्रतीक्षा

रामचंद्र मोहिते
पोलीस निरीक्षक
शिळ डायघर पोलीस
स्टेशन, ठाणे

खाडीजवळच्या दलदलीत एका पेटीत कुजलेल्या अवस्थेतील एक मृतदेह जवळपास पाच ते सहा दिवस बेवारस अवस्थेत पडून होता. कोण होती ही व्यक्ती? काय होती तिच्या आयुष्याची कहाणी? आणि मेल्यानंतर तिला न्याय मिळण्यासाठी अजून किती काळ प्रतीक्षा करावी लागणार होती?

संध्याकाळची वेळ. साडेसहा वाजले होते. दिव्याच्या खाडीच्या दलदलीलगत असलेली आणि तेथील चिखलात अर्धवट रुतलेली ती केशरी रंगाची पत्र्याची पेटी त्या स्पॉटवरचा आकर्षणाचा बिंदू बनली होती. शिळ डायघर पोलीस स्टेशनचे पोलीस पथक, अग्निशमन दलाचे कर्मचारी, फॉरेन्सिक टीम, फोटोग्राफर असे सगळेजण त्या ठिकाणी हजर झाले होते. साधारण तासाभरापूर्वी इथल्या पोलीस पाटलांनी फोन करून त्या जागी अमुक अमुक वर्णनाची पेटी

भूषण कापडणीस
सहा. पोलीस निरीक्षक
शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे

संतोष कांबळे
पोलीस अंमलदार
शिळ डायघर पोलीस स्टेशन, ठाणे

आढळली असून त्यातून दुर्गंधी येत आहे असा फोन केल्यावर तत्परतेने पोलीस पथक सर्व लवाजम्यानिशी घटनास्थळी हजर झाले होते.

पेटीतून प्रचंड दुर्गंधी येत होती. नाकावर रूमाल धरूनच वावरावे लागत होते. शिळ डायघर पोलीस ठाण्याचे त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस निरीक्षक रामचंद्र मोहिते स्वत: तिथे उपस्थित होते. अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी पुढे होऊन पेटी दलदलीतून बाहेर काढली.

पेटीचे झाकण बंद करून तिला तीन ठिकाणी कुलूप लावलेले दिसत होते. कटरच्या साहाय्याने ते तोडावे लागले. पेटीचे दार उघडल्यावर पोलिसांना आत एक प्लॅस्टिकची गोणी दिसली. त्यात असलेल्या तब्बल सात पोत्यांच्या खाली त्या दुर्गंधीमागचे सत्य लपलेले होते...

पोलिसांनी ती पोती बाजूला केली. त्याखाली एका चादरीत एक मृतदेह गुंडाळलेला होता. कुजल्यामुळे त्या मृत शरीराचे मांस झडले होते. गळून पडले होते. अनेक ठिकाणी किडे पडले होते. त्या मृत शरीराचे दोन्ही हात आणि दोन्ही पाय नायलॉनच्या दोरीने बांधलेले होते. एकंदर मृतदेहाची अवस्था अत्यंत भयानक होती. दुर्गंधी येण्यासारखीच परिस्थिती होती.

मिळालेल्या तक्रारीवरून गुन्हा रजिस्ट्रेशन नंबर १३७/२०२१

जमलेल्या लोकांनी 'नाही' अशा अर्थी माना हलवल्या. जवळपास कुठे सीसीटीव्ही पण नव्हते. सगळ्यात आधी त्या अज्ञात व्यक्तीची ओळख पटवणे गरजेचे होते. यासाठी सध्या पोलिसांसमोर एकच छोटासा धागा होता ती केशरी रंगाची पत्र्याची पेटी.

कलम ३०२ २००१ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलिसांनी सर्वप्रथम ती नायलॉनची दोरी सोडून त्याचे दोन्ही हात मोकळे केले ती दुर्गंधी सहन करतच. त्यानंतर मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून देण्यात आला. आजूबाजूला बघ्यांची तुरळक गर्दी होती.

''तुमच्यापैकी कोणी कोणाला इथे ही पेटी टाकताना वगैरे बघितलं?''

जमलेल्या लोकांनी 'नाही' अशा अर्थी माना हलवल्या. जवळपास कुठे सीसीटीव्ही पण नव्हते. सगळ्यात आधी त्या अज्ञात व्यक्तीची ओळख पटवणे गरजेचे होते. यासाठी सध्या पोलिसांसमोर एकच छोटासा धागा होता ती केशरी रंगाची पत्र्याची पेटी.

एक काम करा या पेटीचा एक फोटो घ्या आणि जरा अशा प्रकारची पेटी कोण बनवतो याची माहिती काढा साहेबांनी आपल्या बरोबर आलेल्या अंमलदारांना सूचना केल्या त्याप्रमाणे दोन पथके तो फोटो घेऊन ठाणे आणि नवी मुंबईच्या दिशेस रवाना झाली.

***

''साहेब, आम्ही त्या पत्र्याच्या पेटीविषयी इकडे ठाणे, नवी मुंबई एरियात सगळीकडे चौकशी केली. इथल्या लोकांचं म्हणणं पडलं, की ही अशी पेटी इथे बनत नाही. अशा पेट्या तयार करण्याचे कारखाने धारावीत आहेत.'' पोलीस पथकातील अंमलदारांनी मोहिते साहेबांना माहिती दिली. त्याप्रमाणे ते लगोलग पोलिसांचे पथक घेऊन धारावीकडे रवाना झाले.

धारावीच्या गल्लीबोळातून पोलीस त्या पत्र्याचा पेटीचा फोटो दाखवत फिरू लागले. अवाढव्य पसरलेल्या त्या परिसरातून त्यांना नेमकी अशी जागा हुडकून काढायची होती, जिथे अशा प्रकारची विशिष्ट पेटी बनवण्याचा कारखाना होता. शोधाशोध केल्यानंतर पोलिसांना अखेरीस या कारखान्याचा शोध लागला.

एका बोळाच्या टोकाशी असलेल्या त्या छोट्याशा पत्र्याच्या दुकानात आतल्या बाजूला बसून काही कारागीर काम करत होते. याच ठिकाणी त्या पेटीचा जन्म झाला होता. १९४७ ची कराची पेटी अशा नावाने ती प्रसिद्ध होती. तिचा इतिहासही मोठा रंजक होता. १९४७ मध्ये स्वातंत्र्याच्या वेळी देशाची फाळणी झाली आणि पाकिस्तानची निर्मिती झाली त्यावेळी मोठ्या प्रमाणावर सामान वाहून नेण्यासाठी अशा प्रकारची पेटी वापरली जात असे.

पोलिसांना आलेले बघून एक कामगार दुकानाच्या बाह्यभागात आला.

''काय झालं साहेब? कोन पायजे? काय काम आहे?''

''दुकानाचा मालक कुठे आहे?''

''मालक बाहेरगावी गेलेत साहेब. काय झालं?''

''त्यांचा नंबर दे.''

त्या माणसाने पोलिसांना मालकाचा नंबर दिला. मोहिते साहेब दुकानापासून थोडे दूर जाऊन फोनवर बोलू लागले.

''मी तुम्हाला आत्ता एका पेटीचा फोटो पाठवतो. तो जरा नीट बघून सांगा, ही पेटी तुमच्याच कारखान्यात तयार झाली आहे

धारावीच्या गल्लीबोळातून पोलीस त्या पत्र्याचा पेटीचा फोटो दाखवत फिरू लागले. अवाढव्य पसरलेल्या त्या परिसरातून त्यांना नेमकी अशी जागा हुडकून काढायची होती, जिथे अशा प्रकारची विशिष्ट पेटी बनवण्याचा कारखाना होता.

का?''

''होय साहेब.'' पलीकडून मालक अदबीने बोलला.

पुढच्याच क्षणी साहेबांच्या मोबाईलवरून तो फोटो त्या मालकाच्या फोनवर हस्तांतरित झाला. केवळ फाईल ओपन करायचा अवकाश, त्या फोटोतल्या पेटीला फार ओळखबिळख पटवायची गरज नव्हती. मालकाला ती चांगलीच परिचयाची होती. जन्मदात्री आई आपल्या पोटच्या पोराला कधी विसरते का?

''साहेब ही पेटी मीच बनवलीय. अशा पेट्या आम्ही होलसेल मध्ये बनवतो आणि होलसेलमध्येच विकतो.''

''अच्छा... मला एक सांगा, ही पेटी तुम्ही कोणाला विकली होती का?''

त्याने काही सेकंद थांबून थोडा आठवणीला ताण दिला आणि मग लखकन त्याच्या डोक्यात प्रकाश पडला!

''हां साहेब... ही तर त्या बाईने नेलेली पेटी!''

''कोण बाई?''

''पंधरा-वीस दिवसांपाठी आली होती साहेब आपल्या दुकानात. तिला एकच पेटी पाहिजे होती. आम्ही अशी सिंगल पेटी विकत नाही, बल्कमध्ये देतो. तिला तसं सांगितलंही. तिला काय बल्कमध्ये घ्यायचं नव्हतं आणि किंमतही परवडणारी नव्हती. म्हणून मग ती परत गेली. पण नंतर दोन-तीन दिवसांनी तिचा परत फोन आला, की तिला ती पेटी हवीच आहे. जरा अर्जंटमध्ये. कुठे गावाला जायचं होतं तिला.

म्हणून मग ती बाई भावाबरोबर येऊन ती पेटी घेऊन गेली.

''अच्छा! त्या बाईचे काही कॉन्टॅक्ट डिटेल्स आहेत का? तुमच्याकडे तिचा नंबर तर असेल ना? तिनी तुम्हाला कोणत्या नंबरवरून कॉल केला होता?''

''दोन मिनिट थांबा साहेब, देतो.''

त्यानंतर दोन-तीन मिनिटांनीच त्या मालकाने मोहिते साहेबांना हवा असलेला नंबर पाठवला.

त्या फोन नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता तो नंबर भांडीकुंडी पुरवणाऱ्या एका एजन्सीच्या नावे असल्याचे पोलिसांना समजले. पोलिसांनी या एजन्सीकडे चौकशी केली त्यावेळी सदर महिला दोन-तीन दिवसांपूर्वीच आपल्याकडे कामासाठी म्हणून आल्याचे तिथल्या मालकाने सांगितले.

''तू आता एक काम करायचंस...'' मोहिते साहेब त्याच्याकडे रोखून बघत म्हणाले, ''आत्ता माझ्यासमोर तिला फोन लावायचा. इथे पोलीस तुझी चौकशी करत आलेत याची तिला अजिबात कल्पना न देता. समजलं? फक्त तिला काहीतरी कारण काढून इथे बोलवून घे. काहीही सांग. तुझ्यासाठी काम आलं आहे, पैसे जास्त मिळतायेत, वगैरे वगैरे... ठीक आहे? आणि फोन स्पीकरवर ठेव.''

त्या मालकाने त्याप्रमाणे त्या महिलेला फोन लावला. पहिल्याच रिंगला फोन उचलला गेला.

''हां साहेब, बोला ना! काय झालं?'' पलीकडून आवाज आला.

''हां, कोण? पुष्पा ना?''

''हो साहेब. पुष्पाच बोलतीये.

त्यानंतर दोन-तीन मिनिटांनीच त्या मालकाने मोहिते साहेबांना हवा असलेला नंबर पाठवला. त्या फोन नंबरचे तांत्रिक विश्लेषण केले असता तो नंबर भांडीकुंडी पुरवणाऱ्या एका एजन्सीच्या नावे असल्याचे पोलिसांना समजले.

काय झालं''

''काही नाही, इथे एक काम आलं आहे तुझ्यासाठी... भांड्याचं. जमेल का?''

तिकडून पोलीस, 'जमेल का वगैरे विचारत बसू नकोस, तिला कसंही करून बोलव.' अशा अर्थी त्याला खुणा करत होते.

''मी काय म्हणतो... म्हणजे जमवच! पैसे पण चांगले मिळताहेत आणि या लाईनला असं आहे की तू एकदा कामाला नाही बोललीस की कामही तुला नाही म्हणत राहतं. पार रस्त्यावर येतात लोकं. धंद्यात कस्टमरचा विश्वास फार महत्त्वाचा असतो. त्याच्या अडचणीला आपण हजर असायला हवं. माझं ऐक, आढेवेढे घेऊ नकोस. येच तू लवकर.''

''बरं आहे साहेब. येते मी. पंधरा मिनिटात पोहोचते तिथे.''

साहेबांनी त्या मालकाकडे बघून पसंतीचा अंगठा दाखवला, आणि शेजारच्याच एका चहाच्या दुकानापाशी ते चहा पित थांबले.

त्याप्रमाणे साधारण पंधरा-वीस मिनिटांनी पुष्पा तिथे आल्यानंतर त्या एजन्सीच्या मालकाने पोलिसांना लांबूनच खूण केली आणि अलगदपणे पुष्पा पोलिसांच्या ताब्यात आली.

''बोल... कुणाला मारलंस तू? आणि कशापायी?'' साहेबांनी तिच्याकडे बघत विचारले.

''मरण्याचीच लायकी होती त्याची!''

''कोण? नीट कळेल असं बोल.''

''धर्मेंद्र. ज्याचा मुडदा तुम्हाला

भेटला तो.''

''का मारलं त्याला?''

''मग काय करायचं? माझ्या आयुष्याचं वाटोळं केलं त्याने. माझा नवरा मरून बरेच दिवस झाले. तीन मुलं आहेत पदरात. धर्मा मला भेटला आणि काही दिवसात आमचं चांगलं जमलं. मलाही जोडीदार हवा होता, वाटलं होतं, पोरांच्या डोक्यावर बापाचं छत्र असेल तर बरं होईल. तर कसलं काय! पोरांचा आजा त्यांना घेऊन गेला स्वतःबरोबर गावाकडे निघून. तरी मी सगळं मागे सारून याच्याबरोबर राहायला लागले. दोन वर्षं खोली भाड्याने घेऊन राहिलो आम्ही. पण असं बिनलग्नाचं, बिननात्याचं किती दिवस राहणार? लोकं चवकश्या करायचे. माझं म्हणणं होतं, आम्ही लग्न करावं अन राजरोस चार लोकांसारखं नवरा बायको म्हणून राहावं. पण याची चालढकल सुरू. आज करू, उद्या करू करत टाळायचा. तेही एक वेळ चाललं असतं. पण माझ्याबरोबर राहायचा आणि महत्त्वाच्या गोष्टी माझ्यापासून लपवायचा. त्याच्या गावाकडे त्याच्या लग्नाची बोलणी सुरू झाली होती. पोरगी बघायला जाणार होता. मग मी कोण होते त्याची? असं डोकं सटकलेलं त्या दिवशी... दोन वर्षं फुकट घालवली याच्या नादाला लागून, याच्या आणाभाकांना भुलून. मग ठरवलं, याचा सोक्षमोक्ष लावायचा. माझ्या भावाला मदतीला घेतलं आणि गळाच घोटला त्याचा. थोडाही जित्ता राहू नये म्हणून डोस्क्यात मारून कायमचं संपवलं.''

पेटीत बंद असलेल्या त्या ओळखण्यापलीकडच्या मयताची न्यायाची प्रतीक्षा अखेर संपली.

''... धर्मा मला भेटला आणि काही दिवसात आमचं चांगलं जमलं. मलाही जोडीदार हवा होता, वाटलं होतं, पोरांच्या डोक्यावर बापाचं छत्र असेल तर बरं होईल. तर कसलं काय!...''

पोलिसांनी घटनास्थळावरील मुद्देमाल, निवेदन पंचनामा मुद्देमाल, कपडे, मोबाईल हे सर्व तपासणीकरिता मा. संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांच्याकडे पाठविले. त्याचप्रमाणे पुष्पा हिच्याकडून मयताचे कागदपत्र आणि घराचे कागदपत्र जप्त केले. लोखंडी पेटी विक्रेता व इतर साक्षीदार यांचे जबाब नोंद करून सीडीआर प्राप्त केले. आरोपी पुष्पा आणि तिचा भाऊ यांच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

दोन्ही आरोपींना भादंवि कलम ३०२, ३४ अन्वये आजीवन कारावास व २०,००० रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने साधा करावास, कलम २०१, ३४ अन्वये तीन वर्षे सश्रम करावास आणि कलम १२० (ब) अन्वये तीन वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

शिळ डायघर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक रामचंद्र मोहिते, पोलीस अंमलदार सचिन सावळे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

अपराधी कोण?

नंदा पाराजे
तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, मंगरूळपीर उपविभाग, वाशिम

पंधरा वर्षाची गोदा ही आदिवासी तरुणी एक दिवस अचानक गायब झाली. आणि तितकीच आश्चर्याची गोष्ट म्हणजे दोन तीन दिवसांनी ती परतही आली. पण या मधल्या काळात तिच्या आयुष्यात प्रचंड उलथापालथ झाली होती. काय घडले होते? यामागचा अपराधी कोण होता?

दिनांक ०८ जून २०१९. जामखेड येथे राहणारा आदिवासी समाजातला ५० वर्षांचा जालिंदर घाईघाईने जऊळका पोलीस स्टेशन येथे आला आणि त्याने त्याची मुलगी गोदा ही रात्रीच्या दरम्यान घरातून कोठेतरी निघून गेली असल्याची तक्रार नोंदवली. तिचा गावात व गावाबाहेर शोध घेतला असता ती कुठेही सापडली नाही. तिला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवून नेले असावे असा त्याला संशय होता आणि तशाच

प्रमोद जाधव
सहा. पोलीस उपनिरीक्षक, जऊळका पोलीस ठाणे, वाशिम

राधेश्याम महल्ले
पोलीस अंमलदार, जऊळका पोलीस ठाणे, वाशिम

सरुबाई हिमगिरे
पोलीस अंमलदार, जऊळका पोलीस ठाणे, वाशिम

स्वरूपाचा रिपोर्ट दिला होता. त्यानुसार भादंवि कलम ३६३ प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले पोलीस अंमलदार विलास ताजणे यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच फिर्यादी व घटनास्थळाचे शेजारी राहणारे लोक यांच्याकडे चौकशी केली. १५ वर्षाच्या अपहृत गोदाचा परिसरात व जवळच्या नातेवाईकांकडे कसून शोध घेण्यात आला. परंतु व्यर्थ. त्यानंतर मात्र या प्रकरणाने काहीसे अनपेक्षित वळण घेतले.

११ जूनचा दिवस. जालिंदर व त्याची पत्नी घरातच होते. ते आपसात काहीतरी बोलत असताना अचानक गोदा घरी आली. गोदाला असे अचानक समोर आलेले बघून त्या नवरा बायकोला आनंदमिश्रित आश्चर्याचा धक्का बसला, पण तो केवळ दोन क्षणच टिकला. गोदाच्या चेहऱ्यावरनं काहीतरी गडबड झाली आहे असेच वाटत होते.

१५ वर्षाच्या अपहृत गोदाचा परिसरात व जवळच्या नातेवाईकांकडे कसून शोध घेण्यात आला. परंतु व्यर्थ. त्यानंतर मात्र या प्रकरणाने काहीसे अनपेक्षित वळण घेतले.

''कुठे गेलेलीस?'' जालिंदरने विचारले.

गोदा आधी रडायलाच लागली. आईने तिची कशीबशी समजूत घातल्यावर ती बोलू लागली.

''रात्री एक वाजता इथे संजय आलेला. मला बोलला, पळून जाऊन लग्न करू.. आन पुढे असंही बोलला की तू आली नाहीस तर मी पॉयझन घेईन. मी घाबरले. काय करावं कळेचना. तशीच घराबाहेर आले. त्याने मला पळवून त्याच्या गावी नेलं. लग्न करू असं बोलला आनि नाही ते काम केलं माझ्यासंगं.'' असे म्हणून ती परत हमसून हमसून रडू लागली.

''पोलिसांना सांगायला हवं हे समदं आता...'' जालिंदरची बायको म्हणाली.

जालिंदरने ताबडतोब या घटनेची माहिती पोलीस ठाण्यात दिली. त्यामुळे आधी दाखल केलेल्या गुन्ह्यात कलम ३६६ अ ३७६ (२) समाविष्ट करण्यात आले आणि गुन्ह्याचा तपास नंदा पाराजे, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग मंगरूळपीर, जिल्हा वाशिम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

त्यानंतर पोलिसांनी पीडिता गोदा हिची चौकशी करून तिचा जबाब नोंदवून घेतला. तसेच तिची वैद्यकीय तपासणी करून तपासणीचे नमुने ताब्यात घेण्यात आले. पीडितेचे आई-वडील आणि घटनेशी संबंधित साक्षीदार यांच्याकडे चौकशी करून त्यांचे जबाब नोंदविण्यात आले. सीआरपीसी कलम १६४ अन्वये पीडितेचा जबाब नोंदवून घेण्यात आला. आता यापुढचे महत्त्वाचे काम आरोपीचा शोध घेणे हेच होते. पोलिसांनी आता परत नव्या दमाने

कामाला सुरुवात केली.

आरोपीचा शोध घेण्याकरिता पोलीस पथक रवाना करण्यात आले. आरोपीचा जामखेड परिसरात सर्वत्र शोध घेतला असता तो सापडला नाही. मात्र तो मूळचा कराळेवाडी, तालुका मेहकर, जिल्हा बुलढाणा येथील असल्याची आणि जामखेड येथे राहणाऱ्या जनार्दन नावाच्या व्यक्तीचा तो भाचा असल्याची पोलिसांना खात्रीलायक माहिती मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी प्रथम त्याच्या मामाला– जनार्दनला– सोबत घेतले आणि आरोपीच्या मूळ गावी जाऊन त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीचीही वैद्यकीय तपासणी करून नमुने जप्त करण्यात आले. आरोपीला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, त्याने गुन्हा कबूल केला. त्याने दिलेल्या निवेदनानुसार तपास पथकाने त्याच्या मूळ गावी जाऊन पीडिता गोदा आणि आरोपी यांनी परिधान केलेले कपडे आणि घटनास्थळावरचे नमुने जप्त केले.

सर्व जप्त मुद्देमाल तपासणीसाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, अमरावती येथे पाठवण्यात आला. त्याचप्रमाणे पीडितेचा जन्म तारखेचा दाखला प्राप्त करण्यात आला. त्या दाखल्याप्रमाणे ती अल्पवयीन असल्याचे निष्पन्न करण्यात आले. सर्व तपासणीअंती आरोपीने पीडितेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन तिला फूस लावून पळवून नेल्याचे आणि तिच्यावर वारंवार जबरदस्तीने शारीरिक अत्याचार केल्याचे निष्पन्न झाले. गुन्ह्याचा तपास निर्धारित वेळेत पूर्ण करून पोलिसांनी आरोपीला अटक करत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

आरोपी मूळचा कराळेवाडी, तालुका मेहकर, जिल्हा बुलढाणा येथील असल्याची आणि जामखेड येथे राहणाऱ्या जनार्दन नावाच्या व्यक्तीचा तो भाचा असल्याची पोलिसांना खात्रीलायक माहिती मिळाली.

न्यायालयाकडून सर्व साक्षी पुरावे तपासण्यात आल्यानंतर आरोपी संजय याला भादंवि कलम ३६३ अन्वये पाच वर्षे शिक्षा व १०,००० रुपये दंड, कलम ३६६ (अ) अन्वये दहा वर्षे सश्रम कारावास व २०,००० रुपये दंड, भादंवि कलम ३७६(२)(आय)(एन) सह कलम ४, ५(एल) पोक्सो अन्वये आजन्म कारावास व २०,००० रुपये दंड, अजाजअप्रका ३(१)(डब्ल्यू)(i)(ii) अन्वये २ वर्षे सश्रम कारावास व ५,००० रुपये दंड, अजाजअप्रका ३(२)(v) अन्वये आजन्म कारावास व २०,००० रुपये दंड, अजाजअप्रका ३(२)(va) अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास व १०,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, मंगरूळपीर उपविभाग नंदा पाराजे, सहायक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद जाधव, तसेच पोलीस अंमलदार राधेश्याम महल्ले व सरुबाई हिमगिरे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

बी. एन. हातमोडे
पोलीस निरीक्षक
खुलताबाद पोलीस
स्टेशन, छ. संभाजीनगर

जाब

चुकीबद्दल जाब विचारण्याचा अधिकार त्या चुकीमुळे होरपळलेल्या प्रत्येकाला असतो. पण याचा अर्थ कायदा हातात घेऊन अपराध करणे असा नक्कीच नाही. आपल्या आई-वडिलांमधील भांडणांसाठी वडिलांना दारू पुरवणाऱ्या दुकानदाराला जबाबदार धरणे, त्याला जाब विचारणे हे काही प्रमाणात समर्थनीय होते. मात्र त्यापुढची पायरी उचलणे दुर्दैवीच होते.



दिवेलागणीच्या वेळी गावाच्या एका बाजूला असलेले चंदनचे खोपटे गजबजून जात असे. ही रोजचीच बाब होती. जेमतेम एक एकर जमीन असलेला चंदन त्या एवढ्या तुकड्यातून शेतीचे अल्प, तुटपुंजे उत्पन्न काढत असे. त्याच्या जोडीला खर्च भागवण्यासाठी म्हणून संध्याकाळी आपल्या घराच्या मागच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत एक पत्र्याची शेड टाकून दारूची भट्टी लावत असे. संध्याकाळी सातच्या नंतर गावातले कष्टकरी मजूर थकलेल्या

योगेश ताठे
पोलीस अंमलदार
खुलताबाद पोलीस स्टेशन,
छ. संभाजीनगर

दिपाली धात्रक
पोलीस अंमलदार
खुलताबाद पोलीस स्टेशन,
छ. संभाजीनगर

शरीराला विसावा मिळावा म्हणून तिथे हजेरी लावत.

चंदनची रोजची गिऱ्हाईके ठरलेली होती. त्यात कधी चुकून कुणाकडे आलेला एखादा पाहुणा वगैरे आला तरच बदल होत असे. एरवी मौजे राजेराय टाकळी या छत्रपती संभाजीनगर मधल्या त्या छोट्याशा गावात रोजचे तेच चेहरे दिसत आणि ते जिथे हमखास दिसत अशा ठिकाणांमध्ये चंदनच्या दारूभट्टीचा समावेश होत असे.

चंदन साधारण पन्नाशीचा होता. आपली पत्नी विठा आणि दोन मुले यांच्यासह तो गावात राहत असे. गावातल्या सगळ्याशी त्याचे मैत्रीचे संबंध होते. धंदा करायचा तर तोंडात साखर आणि डोक्यावर बर्फ हवाच! चंदन या गोष्टीची पुरेपूर काळजी घेत असे. त्यातूनच त्याने एक एक गिऱ्हाईक जोडून ठेवले होते.

मे महिन्याचे दिवस होते. उन्हाची काहिली वाढलेली. पारा इतका वर गेला होता की थोड्याशा हालचालींनी पण जिवाचे पाणी पाणी होत होते. पण गावातल्या कष्टकऱ्यांना उन्हातान्हात राबण्यावाचून पर्याय नव्हता. निळूभाऊ हा त्यापैकीच एक. चंदनचा मित्रच. दोघे साधारण सारख्याच वयाचे होते. निळूभाऊ तसा बऱ्यापैकी सरळ मार्गी होता.. नित्यनेमाने चंदनच्या गुत्त्यावर हजेरी लावायची, एक चपटी रिचवायची

चंदनची रोजची गिऱ्हाईके ठरलेली होती. त्यात कधी चुकून कुणाकडे आलेला एखादा पाहुणा वगैरे आला तरच बदल होत असे. एरवी मौजे राजेराय टाकळी या छत्रपती संभाजीनगर मधल्या त्या छोट्याशा गावात रोजचे तेच चेहरे दिसत.

आणि शांतपणे घरी जाऊन झोपायचे. बायका पोरांना तो कधी एका अक्षरानेही बोलत नसे की इतर लोकांप्रमाणे दारू पिऊन शिवीगाळ, मारझोड असले प्रकार करत नसे.

त्या दिवशीही संध्याकाळचे सात वाजले आणि निळूभाऊ नेहमीप्रमाणे चंदनच्या गुत्त्यावर आला. दोघांनी मिळून काही वेळ गप्पा मारल्या. त्यानंतर नेहमीप्रमाणे निळूभाऊने आपला रोजचा कोटा घशात ओतला आणि घरी निघून गेला. नेहमीची गिऱ्हाईकेही निघून गेली. त्यानंतर साधारण साडेसातच्या सुमारास चंदन घरी आला. जेवणाची वेळ होईपर्यंत बाहेरच्या खोलीत तो हिशोबाच्या वहीत काहीतरी आकडेमोड करत बसला. विठाचा आतमध्ये स्वयंपाक सुरू होता. पण उन्हामुळे आणि उकाड्यामुळे तिलाही स्वयंपाकघरात सलग काम करणे जमत नव्हते. त्यामुळे ती अधूनमधून बाहेर येऊन चंदनशी काहीबाही बोलत होती आणि दोन–तीन मिनिटे बाहेरची हवा खाऊन परत आत जात होती.

असेच ते काहीतरी बोलत असताना अचानक निळूभाऊचा मोठा मुलगा महेश बाणासारखा त्यांच्या घरात घुसला. त्याच्या हातात कुऱ्हाड होती. चेहऱ्यावरून संताप ओसंडून वाहत होता. काहीतरी बिनसले होते हे नक्की. चंदन त्यांच्याकडे आश्चर्याने बघू लागला. विठाचेही भीतीने डोळे विस्फारले.

''काय रे महेश, काय झालं? तू आत्ता इथे कसा?'' त्याने विचारले.

''काय रे हलकटा... काय झालं म्हणून वर आम्हालाच विचारतोस?''

हा पवित्रा अनपेक्षित होता. त्याच्या मुलाच्या वयाच्या एका मुलाने त्याचा हलकट म्हणून उद्धार केला होता. ते शब्द लोखंडाच्या गरम सळईसारखे त्याच्या कानात घुसले. तरीपण संयम राखत त्याने विचारले,

''का रे बाबा, झालं तरी काय? एवढा का कातावला आहेस?''

''काय झालं??? माझ्या बापाला नाही नाही त्या सवयी लावल्या तू! तुझ्यामुळे त्याला दारूचा नाद लागला आणि आता आवरत नाही बघ तो कोणाला!''

''कोण? निळू?? कसं शक्य आहे! नाकासमोर चालणारा माणूस तो... कधी चार शिव्यासुद्धा घातल्या नसतील कोणाला.''

''घालत नव्हताच रे! आता घालायला लागला तुमच्यासारख्या चिखलातल्या किड्यांबरोबर राहून,'' असे म्हणत त्याने हातातली कुऱ्हाड रागारागाने त्याच्यावर उगारली.

चंदन शक्यतो शांत राहण्याचा, सामोपचाराने घेण्याचा प्रयत्न करत होता, पण हे मात्र अतीच झाले. न जाणो एखादा फटका वर्मी बसायचा. चपळाईने चंदनने त्याच्या हातातून ती कुऱ्हाड काढून घेतली.

''हे असलं काही करू नको बाबा! जा. जा, घरी जा. आधीच डोकं तापलंय तुझं. नंतर बोलू...'' असे म्हणत त्याने ती कुऱ्हाड त्याच्या हातातून हिसकावून घेतली. पण या शब्दांनी शांत होईल तर तो महेश कसला! तो तिरीमिरीत बाहेर गेला आणि अंगणातील एक दगड उचलून त्याने तो चंदनच्या दिशेने भिरकावला. चंदनने नेम चुकवला आणि तो महेशकडे बघतच राहिला.

त्यानंतर थोडा वेळ गेला असेल

चंदनच्या गुत्त्यावर दारू पिऊन घरी गेल्यावर निळूभाऊने म्हणे घरी बायका पोरांना शिवीगाळ केली होती. बायकोने रांधलेल्या मटणात रागारागाने लोटाभर पाणी ओतले होते.

नसेल, महेश आपल्या धाकट्या भावाला राजेशला घेऊन परत तिथे आला.

परत एकदा भांडण वादावादी सुरू झाली. यावेळी बोलायला दोघेजण होते. दोघेही तितक्याच तावातावाने बोलत होते. भांडणाचे कारण इतके क्षुल्लक होते की त्यात एवढे चिडण्यासारखे काय असेच कुणालाही वाटले असते. चंदनच्या गुत्त्यावर दारू पिऊन घरी गेल्यावर निळूभाऊने म्हणे घरी बायका पोरांना शिवीगाळ केली होती. बायकोने रांधलेल्या मटणात रागारागाने लोटाभर पाणी ओतले होते. आपल्या बायकोला आणि दोन्ही पोरांना वाट्टेल तशा शिव्या देत स्वतःशीच बडबड करत तो झोपून गेला होता. आणि दोघांच्या म्हणण्यानुसार हे आजकाल वरचेवर व्हायला लागले होते. थोडक्यात जगासमोर निळूभाऊचे सरळमार्गी, सद्वर्तनी असे जे रूप होते ते प्रत्यक्षात पूर्णपणे बदलले होते आणि त्याचा त्रास त्याच्याच बायकापोरांना सहन करावा लागत होता.

''याने बिघडवलंय आपल्या बापाला!'' महेश आपल्या धाकट्या भावाकडे बघून बोलत होता. भांडणाचा आवाज टिपेला पोहोचल्याने आजूबाजूच्या घरांमध्ये राहणारे दोघे तिघे शेजारी बाहेरही आले होते आणि कानोसा घ्यायचा प्रयत्न करत होते. या भावांचा एकंदर आविर्भाव बघून त्यांना थेट शांत करण्याची मात्र कोणाचीही हिंमत होत नव्हती.

''धर याला. आज सोक्षमोक्षच लावायचा आहे या गोष्टीचा.'' असे म्हणत महेशने राजेशकडे

बघून विशिष्ट प्रकारे मान हलवली. राजेशने पुढे होत चंदनचा ताबा घेतला आणि त्याची मान पकडून खाली दाबली. पुढच्याच क्षणी चपळाईने पुढे होत महेशने आपल्या हातातला चाकू त्याच्या पाठीत खुपसला आणि तीन-चारदा सपासप वार केले. चंदन रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. या अनपेक्षित घटनेने विठाची तर जणू दातखीळच बसल्यासारखी झाली. ती मोठमोठ्यांदा आरडाओरडा करू लागली. तोवर हे दोघेजण पसार झाले. तोपर्यंत बाहेरूनच कानोसा घेणारे शेजारी धावत आले. शिवाय बाजूलाच राहणारा त्याचा भाऊ दिनेश हा देखील त्याला या प्रकाराबद्दल समजताच तिथे आला. जमलेल्यांपैकी एकाने आपली गाडी काढली आणि चंदनला घेऊन ते ग्रामीण रुग्णालयाकडे निघाले. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. डॉक्टरांनी चंदनला तपासून मयत घोषित केले.

दरम्यानच्या काळात या घटनेची माहिती खुलताबाद पोलीस स्टेशनला प्राप्त झाली. त्यानंतर लगेचच पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असलेले पोलीस निरीक्षक दशरथ हातमोडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळाला भेट दिली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करायला सुरुवात केली. छोट्याशा घराच्या त्या बाहेरच्या खोलीत फरशीवर अनेक ठिकाणी रक्ताचे डाग पडलेले होते. साधी माती आणि रक्त मिश्रित माती यांचे नमुने जप्त करण्यात आले. त्याचवेळी तिथे असलेल्या एका रंगीबेरंगी चादरीवरही रक्ताचे डाग आढळले. ती चादरही ताब्यात घेण्यात आली. त्याचप्रमाणे आधी फेकून मारलेला एक ओबडधोबड दगड आणि

पुढच्याच क्षणी चपळाईने पुढे होत महेशने आपल्या हातातला चाकू त्याच्या पाठीत खुपसला आणि तीन-चारदा सपासप वार केले. चंदन रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. या अनपेक्षित घटनेने विठाची तर जणू दातखीळच बसल्यासारखी झाली.

लाकडी दांडा असलेली कुऱ्हाड हे साहित्यदेखील ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. रात्रीची वेळ होती. त्यामुळे घटनास्थळ संरक्षित करण्यासाठी तिथे एका पोलीस अंमलदारांची नेमणूक करण्यात आली.

***

पोलीस उपनिरीक्षक व्ही. एम. वाघ यांचा फोन वाजला.

''जय हिंद साहेब.''

''जय हिंद. या मर्डर केस मधले दोघं आरोपी पळून गेलेत अपेक्षेप्रमाणे... औरंगाबाद साईडला गेलेत अशी खबर आहे. तुम्ही एक काम करा, स्वतः जातीनं त्यांच्या मागावर जा. आणि हो, खाजगी वाहनाने... आणि युनिफॉर्म नको.''

''आलं लक्षात सर. लगेच निघतो.''

दरम्यानच्या काळात चंदनचे शवविच्छेदन करून त्याचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. इकडे पोलिसांनी आरोपितांचा कसून शोध घ्यायला सुरुवात केली. मोबाईल टॉवर लोकेशनवरून प्राप्त झालेल्या डेटा नुसार लवकरच त्यांचा ठावठिकाणा कळला आणि पोलिसांनी चपळाईने दोघांनाही ताब्यात घेतले.

***

दोघांच्याही डोळ्यांत पश्चात्तापाचा लवलेश नव्हता. याच मनोवृत्तीमुळे त्यांच्या हातून खुनासारखा गंभीर गुन्हा घडला होता. दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी गुन्ह्यात वापरलेला चाकू पोलिसांनी त्यांच्याकडून ताब्यात घेतला. तसेच गुन्हा करतेवेळी त्यांनी परिधान केलेले

कपडेही ताब्यात घेण्यात आले. हत्यार आणि इतर जप्त मुद्देमाल पुढील परीक्षणासाठी पाठवण्यात आला आणि त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त करण्यात आला. तसेच मयताचा शवविच्छेदन अहवालही प्राप्त करण्यात आला. महत्त्वाच्या साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. आरोपींच्या विरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आरोपी क्र. १ महेश याला मा. न्यायालयाने दोषी ठरवले असून त्याला भादंवि कलम ३०२ अन्वये आजीवन कारावास व १०,००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील खुलताबाद पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक बी. एन. हातमोडे, पोलीस अंमलदार वाय. बी. ताठे आणि डी. डी. धात्रक यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

कविता

"घड्याळाचे काटे"

घड्याळाच्या काट्यांना अडखळताना मी पाहिले आहे;
विनाकारण माझ्यावर त्यांना जळताना मी पाहिले आहे.

आतुर असते मन, भेटीची वेळ ठरलेली असते जेव्हा;
तेव्हा सेकंदाला मिनिटासारखे छळताना मी पाहिले आहे.

क्षणांना शोभतं का सांगा, इतके निष्ठुर होणे ?
अश्रूंना पारिजातासारखे ओघळताना मी पाहिले आहे.

काल चंद्र माझ्या कुशीत जेव्हा गाढ निजला होता;
तेव्हा मिनिटाला सेकंदागत पळताना मी पाहिले आहे.

भेट दिवसा असेल कधी, केवळ दिवसापुरती;
तेव्हा सूर्याला अवेळीच मावळताना मी पाहिले आहे.

अबोला अन् रुसव्याचा काळ सरता सरत नाही;
तासाला तासाचा गजर टाळताना मी पाहिले आहे.

विरहाचा अग्नी जेव्हा जाळीत असतो काळजाला;
दिवसांना रोज त्याच वाटेने मागे वळताना मी पाहिले आहे.

युगे सरली कित्येक, भेटीची आस फिटली नाही अजून;
क्षणभर प्रेमासाठी आयुष्य उधळताना मी पाहिले आहे.

जन्म-जन्मांतराची स्वप्ने अनेक गोठली होती जणू;
तुझ्या मिठीत आज त्यांना विरघळताना मी पाहिले आहे.

'दिनबा'
(डॉ. दिनेश कमल गिरधर बारी)

उलगडा

यशवंत सोळसे
पोलीस निरीक्षक
उमरेड पोलीस ठाणे
नागपूर

घरी बाहेर पडताना थोड्या वेळाने परत येतो असे सांगणारा भिकाजी अचानक बेपत्ता होतो. त्या रात्रीच आणि पुढचे काही दिवस त्याच्या शोधासाठी उमरेड पोलीस अविरत प्रयत्न करतात त्यांना तो सापडतोही पण... काय झाले होते नेमके? भिकाजी कशासाठी बाहेर पडला होता? उमरेड पोलिसांनी कसे उलगडले हे सारे प्रकरण?

सप्टेंबर महिना सुरू झाला होता. नागपूरमधील उमरेड परिसरात सप्टेंबरच्या सुरुवातीपासूनच पावसाची संततधार कमी होऊन ऊन सावली असा पाठशिवणीचा खेळ सुरू झाला होता. त्यात सणासुदीचा काळ असल्यामुळे भिकाजी सारख्या भंगार विकण्याचे आणि घेण्याचे काम करणाऱ्यांसाठी हा काळ अतिशय महत्त्वाचा होता. पाच तारखेला संध्याकाळी पाचच्या सुमारास रोजच्याप्रमाणे भिकाजी घरी आला होता.

''भिकाजी, चल आटीप लवकर. मग नंतर सगळ्या पुढच्या कामाला उशीर होऊन जातो ना. हा घे चहा आणि

विष्णू जायभावे
पोलीस अंमलदार
उमरेड पोलीस ठाणे
नागपूर

रूपेश महादुले
पोलीस अंमलदार
उमरेड पोलीस ठाणे
नागपूर

पाव आणि जेवायला ये लवकर घरी. मी तोवर करून ठेवते.''

आई कमलाच्या या बोलण्यावर भिकाजीने होकारार्थी मान हलवली.

''आये, तू मले असं रोज रोज घरी लवकर बोलवत नको जाऊस. मी आल्यानंतर खात जाईन. माजी राह पण बघू नको.

''काऊन नाही बघायची? त्यापेक्षा तूच रात्री लवकर येऊन जा ना.''

''बघू नंतर. मी लवकर यायचं की नाही ते.''

''हां ठीक आहे आणि तसंही मले बाहेर जायचंय आजपण.''

''आज काय काम बाहेर? पाऊसपण थांबला नाही अजून.''

''अगं एका ठिकाणी भरपूर मिळणारे ते विकून चांगले पैसे येतील.''

''मग उद्या जा. उद्या का जाऊन नाही राहिला तू?''

''तुले नाही कळणार ग. चल चहा पाव दे.''

आईने पुढे धरलेला त्याच्यासमोरचा चहा आणि पाव भिकाजीने

प्रविण चवरे
पोलीस अंमलदार
उमरेड पोलीस ठाणे
नागपूर

पटकन संपवला आणि तो आईकडून त्याच्या नोंदीचे रजिस्टर घेऊन बाहेर पडला.

''मी जाऊन येतो हा. तुमचं झालं की तुम्ही झोपून घ्या.''

''नाय नाय तू आल्याशिवाय आम्ही काय झोपत नाय.''

बराच वेळ झाला तरी रजिस्टर घेऊन बाहेर पडलेला भिकाजी अजून परतला नव्हता. वेळ जसजसा पुढे सरकत होता, तसतशी कमलाच्या जिवाची घालमेल वाढत होती. ती अस्वस्थपणे घरात फेऱ्या मारत होती.

आईच्या त्या बोलण्याकडे दुर्लक्षा करत भिकाजी घाईघाईने घराजवळ बाहेर पडला. भर पावसात एका हातात उघडलेली छत्री आणि दुसऱ्या हातात रजिस्टर घेऊन तो भराभरा चिखलातला रस्ता पायाने तुडवत निघाला. तो निघाला तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते, पण आभाळ मात्र गच्च भरले होते. जणू काही रात्र झाली असावी. जणूकाही पुढे भविष्यात होणाऱ्या गोष्टींची नांदीच त्यावेळी निसर्गाकडून मिळत होती. भिकाजी बाहेर पडल्यावर कमलाने आता तिच्या पुढच्या कामाला सुरुवात केली. या सगळ्यात वेळ कसा गेला हे तिला कळलेच नाही. बराच वेळ झाला तरी रजिस्टर घेऊन बाहेर पडलेला भिकाजी अजून परतला नव्हता. वेळ जसजसा पुढे सरकत होता, तसतशी कमलाच्या जिवाची घालमेल वाढत होती. ती अस्वस्थपणे घरात फेऱ्या मारत होती. तिची ती अवस्था बघून भिकाजीचा भाऊ संपाती तिला धीर देण्याचा प्रयत्न करू लागला.

''संपाती ए... ऐक ना, तुला येताना वाटेत कुठे दिसला का रे तो?''

''अहं आणि दिसला असता तर मी शांत बसून राहिलो असतो का?''

''तू खरं सांगतोय ना?''

''मी काऊन खोटं बोलू? कमाल करून राहिली ना तू बाप्पा.''

''अरे कुठं गेला मग तो? किती वेळ झाला? मला काही बरं वाटून नाही राहिलं. आपण ढुंढून काढू त्याले. तू चल माझ्याबरोबर.''

''हं... चल.''

संपातीने दरवाजा लावून

घेतला आणि दोघेही भिकाजीला शोधू लागले. त्याचे मित्र, तो जाऊ शकतो अशा सगळ्या ठिकाणी त्या मायलेकांनी शोध घेतला. शोधूनही सापडत नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी नागपूर जिल्ह्यातील उमरखेड पोलीस ठाणे गाठले.

''साहेब माजा पोट्टा सापडून नाही राहिला.'' समोर असलेल्या पोलीस अंमलदारांना कमलाने रडतरडत सांगितले. कमलाने सांगितल्यावर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अंमलदारांनी उमरखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यशवंत सोळसे यांना याची माहिती दिली.

''नेमकं सांगा काय झालं कधी निघाला तुमचा मुलगा घरातून?''

''आज संध्याकाळले. मले म्हणला, 'मी जरा बाहेर जाऊन येतो कामासाठी.''

''कोणाबरोबर जातो आहे किंवा काय याबद्दल काही बोलला का?''

''नाही ,पर जाताना रजिस्टर आईकडून घेऊन गेला.'' संपातीने पुढे पुष्टी जोडली.

''रजिस्टर?''

''साहेब, आम्ही भंगार सामान विकणे आणि विकत घेणे अशी दोन्ही गोष्टी करतो त्याच्या नोंदी त्या रजिस्टरमध्ये करतो.''

''अच्छा. तो कोणाबरोबर गेला आहे किंवा जातो याबद्दल काही बोलला का तो?''

''हो साहेब तो हे काम आणखी दोन लोकांबरोबर करतो.''

''बरं ठीक आहे. तुम्ही फोटो आणलाय त्याचा?''

पोलिसांना त्यांनी भिकाजीचा फोटो दिला. त्याचबरोबर त्याचे मित्र आणि काम करतानाचे त्याचे साथीदार यांच्याबद्दलचीही

आता पोलीस भिकाजीचे घरातले, नाना, विलास यांच्यासारखे लोक असे सगळेजण त्याला शोधण्याचा प्रयत्न करू लागले. पण हे शोधसत्र सुरू असताना नाना आणि विलास यांच्या बोलण्यात, हालचालींमध्ये विसंगतता आढळली होती.

आवश्यक ती माहिती दिली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अविरतपणे भिकाजीला शोधण्याचे प्रयत्न सुरू केले.

यादरम्यान विलास आणि नाना यांच्याकडे चौकशीसाठी तपासपथक पोहोचले.

''आज दिवसभरात भिकाजीला भेटला होतात का?''

''हो. थोड्या वेळापूर्वीच भेटला होता. पण मग काम झाल्यावर तो गेला परत. का बरं काय झालं साहेब?'' नानाने घाबऱ्या स्वरात विचारणा केली.

''नाही तो घरी गेलाच नाही.''

''इथून किती वाजता निघाला तो?''

''झाला बराच वेळ. एव्हाना घरी जायला हवा होता तो.''

''ठीक आहे. तुमचा त्याच्याशी काही कॉन्टॅक्ट झाला तर लगेच कळवा आम्हाला.''

एवढे बोलून पोलीस बाहेर पडणार तेवढ्यात नाना आणि विलास त्यांच्या पाठोपाठ आले.

''साहेब, आम्ही पण येतो तुमच्याबरोबर त्याला शोधायला.''

''ठिक आहे. चला.''

आता पोलीस भिकाजीचे घरातले, नाना, विलास यांच्यासारखे लोक असे सगळेजण त्याला शोधण्याचा प्रयत्न करू लागले. पण हे शोध सत्र सुरू असताना नाना आणि विलास यांच्या बोलण्यात, हालचालींमध्ये विसंगतता आढळली होती. पोलिसांना मिळत असलेली माहिती ही विलास व तात्या यांनी सांगितलेल्या गोष्टीपेक्षा वेगळी होती. साहेबांनी स्वत:च्या तर्काबद्दल आपल्या सहकाऱ्यांशी सल्लामसलत केली. साहेबांच्या या तर्काला तपासपथकाने दुजोरा दिला.

''नाना जरा इकडे ये.''

''आलो साहेब काय झालं? भिकाजी सापडला?''

''तेच तर तुला विचारावं म्हणून तुला बोलावलं मी. बोल कुठे आहे भिकाजी?''

''हे काय बोलून राहिलात साहेब? मले ठाऊक असतं तर मी कशाला तुमच्याबरोबर त्याले ढुंढून राहिलो असतो.''

''ते तर तू सांगशील ना आम्हाला? बोल कुठे आहे भिकाजी?''

''साहेब हे उल्टं बोलून राहिलात ना तुमी बाप्पा. मले नाही ठाऊक भिकाजी कुठे ते.''

पोलिसांना मात्र त्याच्या बोलण्यावर आजिबात विश्वास बसत नव्हता. शेवटी साहेबांनी आता त्यांच्या अनुभवाच्या आधारे या सगळ्याचा तपास करण्याचे ठरवले.

''ये विलास, भिकाजी कुठे आहे ते तुला नक्की माहिती असणार. हे बघ तुम्हाला तिघांना एकत्र बघणारे लोकं आहेत आमच्याजवळ. त्यामुळे भिकाजीला कुठे लपवून ठेवलंय ते सांग पटकन.'' साहेब त्याच्याकडे रोखून बघत म्हणाले.

''मले नाई माहीत. मले कसं माहीत असणार तो भैताड कुठे आहे ते?''

'' हे बघ आत्ता सांगितलं तर चांगल. नाहीतर नंतर जर पुढे तपासात भिकाजीच्या गायब होण्यात तुमच्या दोघांचा हात आहे तर मग मात्र सफाई देता येणार नाही. त्यामुळे आत्ताच सांगून टाक भिकाजीला कुठे ठेवलंय ते?''

साहेबांचा तो आवेश बघून विलासला आपली डाळ फार काळ शिजणार नाही हे कळून चुकले.

''सांगतो. त्याले एका शेतात पुरलाय.''

त्याच्या सांगण्यानुसार विलास

त्याच्या सांगण्यानुसार विलास आणि नानासह पोलिसांचा ताफा एका ठिकाणी आला. त्यांनी दाखवलेल्या ठिकाणी जमीन खोदण्याचे काम सुरू करण्यात आले. बऱ्याच खोलपर्यंत खोदकाम झाल्यावर तेथे काहीतरी असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यांचा हा अंदाज खरा ठरला.

आणि नानासह पोलिसांचा ताफा एका ठिकाणी आला. त्यांनी दाखवलेल्या ठिकाणी जमीन खोदण्याचे काम सुरू करण्यात आले. बऱ्याच खोलपर्यंत खोदकाम झाल्यावर तेथे काहीतरी असल्याचा संशय पोलिसांना आला. त्यांचा हा अंदाज खरा ठरला. पोलिसांना एका पोत्यात भिकाजीचा मृतदेह आढळला. घटनास्थळाचा पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला. पोलिसांनी भिकाजीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. घटनास्थळावरून पोलिसांनी जैविक नमुने हस्तगत केले. तसेच पोलिसांनी मेमोरेंडम पंचनाम्याद्वारे गुन्ह्यासाठी वापरलेला लाकडी बांबूही जप्त केला. तसेच दोन्ही आरोपितांचे कपडे हस्तगत करण्यात आले. आरोपितांच्या रक्ताचे नमुने संकलित करण्यात आले. सर्व साक्षीदारांचे सीआरपीसी ६४ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आले. संकलित केलेल्या सर्व बाबी वैद्यकीय परीक्षणासाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आल्या. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून शवविच्छेदन अहवाल तसेच मृत्यूचा दाखला प्राप्त केला.

''आता सांग का मारलं तुम्ही त्याला?''

''मग काय करणार आमच्यात भांडण झालं होतं भंगार विक्रीचे मिळालेले पैसे होते ना त्याच्या हिश्शावरून आम्ही दारू प्यायला बसलो होतो तर हा लागला बोलायला. 'मला कमी पैशे मिळाले. तुम्ही दोघांनी जास्त घेतले.' आत्तापर्यंत हे खूपदा झालं होतं. ते ऐकल्यावर आमचं डोस्कंच फिरलं ना. तिथे बांबू पडला होता. तो घातला त्याच्या डोक्यात तसा तो खाली पडला. त्याला उठवायचा प्रयत्न केला पण तो उठलाच नाही. म्हणून मग एका बोरीत भरलं आणि

शेतात नेऊन पुरलं.''

एवढे बोलून विलास शांत बसला. पोलिसांनी ज्याच्या मदतीने भिकाजीला शेतात पुरण्यासाठी मदत करणाऱ्या तिसऱ्या व्यक्तीला अर्थात रोहितलाही अटक केली. पोलिसांनी तिन्ही आरोपितांविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

मा. न्यायालयाने समोर आलेले साक्षीपुरावे ग्राह्य धरून विलास आणि तात्या यांना दोषी ठरवून भा.दं.वि कलम ३०२, ३४ अन्वये आजीवन कारावास आणि प्रत्येकी १० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. तसेच तिनही आरोपींना भा.दं.वि कलम २०१, ३४ नुसार ३० महिने सश्रम कारावास आणि प्रत्येकी ३ हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ३ महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास नागपूर ग्रामीण येथील उमरेड येथील पोलीस निरीक्षक यशवंत सोळसे, पोलीस अंमलदार विष्णू जायभावे, रूपेश महादुले व प्रविण चवरे यांनी अतिशय कुशाग्रतेने व कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

कविता

असा हा आहे महाराष्ट्र

कित्ती सुंदर समृद्ध निसर्ग हा पहा
आपलेसे घेअी करून महाराष्ट्र हा

छत्रपती शिवाजी महाराजांची भूमि
संत महात्मे थोर विभूतींची ही भूमि
प्रतिभावंत कलावंत येथले महा

डोंगरदऱ्या संथपणे वाहती नद्या
हिरव्याकंच जंगलांची किती संपदा

भाग्यवंत आम्ही आमुचा जन्म येथ हा

मायभूमि कर्मभूमि सर्व दिग्गजांची
महाराष्ट्राचे आम्ही आहोत रहिवासी

चव ही कांदा भाकरीची घेवुनि पहा
किती सुंदर समृद्ध निसर्ग हा पहा
काळजात राही भरून महाराष्ट्र हा

शिवरायांची असे भूमि राष्ट्र हे महा

दत्तात्रय जोशी
पुणे

एक कॉल

प्रविण पाथरकर
पोलीस उपनिरीक्षक
एमआयडीसी वाळुंज पोलीस ठाणे
छत्रपती संभाजीनगर

एका स्त्रीने एका पुरुषाला केलेला एक साधा कॉल. 'आपल्याला भेटायला ये' अशी आर्जवे करणारा. पण तो तिने कोणत्या परिस्थितीत केला होता? स्वत:हून केला होता की कुणाच्या सांगण्यावरून? आणि त्या कॉलनंतर काय घडणार होते?

मे महिन्याची सुरुवात झाली झाली होती. पन्नाशीच्या आसपास वय असलेले बाळासाहेब असह्य वेदनांनी विव्हळत होते. त्यावेळी त्यांच्या दारासमोर राजू रिक्षावाला रिक्षा घेऊन थांबला. रिक्षा उभी करून घाईने तो आत आला.

''ए चला, घ्या त्यांना... आरामात आरामात.''

काही जणांनी विव्हळत असलेल्या बाळासाहेबांना उचलून राजूच्या रिक्षात बसवले. बरोबर त्यांची पत्नी मोनालीही होती. हमरस्ता लागल्यावर राजूच्या रिक्षाने जोर पकडला.

''आ.. आ... आई, आई गंऽऽ ''

कृष्णाकांत शिंदे
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
(मार्गदर्शक)
एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे
वाळूंज, छत्रपति संभाजीनगर

विठ्ठल शिंगाडे
पोलीस अंमलदार
एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे
वाळूंज, छत्रपति संभाजीनगर

बी. ए. बोर्डे
पोलीस अंमलदार
(कोर्ट पैरवी)
छत्रपति संभाजीनगर

एम. एस. सैय्यद
पोलीस अंमलदार
(कोर्ट पैरवी)
छत्रपति संभाजीनगर

''काका धीर धरा. पोचू आपण.''

असह्य वेदनांनी कळवळणाऱ्या बाळासाहेबांना राजू धीर देत होता. त्यांच्या अंगावर अनेक ठिकाणी वार करण्यात आले होते. आपण कधी एकदा दवाखान्यात पोहोचतो असे त्या दोघांना झाले होते. रिक्षा रुग्णालयाच्या आवारात येऊन थांबली. पाठोपाठ पोलीस घटकांचीही गाडी रुग्णालयाच्या आवारात आली. काहीजणांनी या घटनेबद्दल त्यांना कळवले होते. या पोलीस घटकांकडूनच छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मधील वाळुंज एमआयडीसी पोलीस ठाण्यात सदर घटना कळविण्यात आली. घटना समजताच वाळुंज पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असणारे प्रवीण पाथरकर आपल्या पथकासह रुग्णालयात काही वेळातच दाखल झाले.

''हॅलो डॉक्टर, हाऊ इज ही? आम्ही बोलू शकतो त्यांच्याशी?''

बाळासाहेबांवर उपचार करत असलेल्या डॉक्टरांशी हस्तांदोलन करत साहेब विचारते झाले.

''हो. पण त्यांना फार स्ट्रेस देऊन चालणार नाहीये. त्यांच्या शरीरावरच्या जखमा बऱ्याच खोल आहेत. सो, त्यांच्याशी बोलताना त्यांना स्ट्रेस येणार नाही याची तुम्हाला काळजी घ्यावी लागेल.''

''नक्कीच. थँक्स.''

साहेबांच्या या बोलण्यावर



पुढे बाळासाहेबांनी घडलेला प्रसंग साहेबांना सांगितला. त्यांनी सांगितलेल्या हकिकतीनुसार पोलिसांनी पुढच्या तपासाला सुरुवात केली. याची सुरुवात घटनास्थळाच्या पंचनाम्याने झाली. पोलिसांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला.

मंद स्मित करून डॉक्टर त्यांच्या कामासाठी निघून गेले. आता पोलिसांचे पथक बाळासाहेब असलेल्या बेडपाशी जाऊन पोहोचले. पोलिसांना बघताच बाळासाहेब उठून बसण्याचा प्रयत्न करू लागले.

''नाही, नाही. उठू नका तुम्ही.'' साहेब त्यांना हाताने नकारार्थी इशारा करत म्हणाले. ''कोणी केलं हे सगळं?''

''साहेब, काय सांगायचे माझे दुर्दैवाचे फेरे? कधी वाटलं नव्हतं हा दिवसपण बघायला लागंल. त्या दोघांना सोडू नका साहेब.''

''दोघं? कोण दोघं?''

पुढे बाळासाहेबांनी घडलेला प्रसंग साहेबांना सांगितला. त्यांनी सांगितलेल्या हकिकतीनुसार पोलिसांनी पुढच्या तपासाला सुरुवात केली. याची सुरुवात घटनास्थळाच्या पंचनाम्याने झाली.

पोलिसांनी घटनास्थळाचा दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळावरून साधी माती आणि रक्तमिश्रित माती हस्तगत करण्यात आली. पोलिसांनी महत्त्वाचे साक्षीदार निष्पन्न करून त्यांचे सीआरपीसी १६४ प्रमाणे जबाब नोंदवून घेतले. हे सगळे सुरू असतानाच दुसऱ्या बाजूला बाळासाहेबांनी सांगितलेल्या संशयितांचा शोध घेतला जात होता. संशयित कोठे असू शकतात याबद्दलचा अंदाज आणि गावातून त्यांच्याबद्दलची मिळालेली माहिती याची मोठ्या प्रमाणावर मदत होत होती. साहेब दोन्ही संशयितांबद्दल चौकशी करत असताना आदेशबद्दल एक महत्त्वाची गोष्ट त्यांना समजली. साहेबांनी सहकाऱ्यांशी चर्चा करून त्यानुसार शोधकार्य सुरू ठेवले. या दरम्यान पोलिसांनी आदेश आणि आदिनाथ या दोन्ही संशयितांचा तपास करण्यासाठी तांत्रिक तपास सुरूच ठेवला होता.

***

हे सगळे शोधकार्य सुरू असताना ज्याची भीती होती तेच घडले. रुग्णालयात बाळासाहेबांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी आता या दोन्ही संशयितांवर आधीच नोंदवलेल्या गुन्ह्यात ३०२ या कलमाची वाढ केली. बातमी कळताच साहेबांनी बाळासाहेबांच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा करून तो शवविच्छेदनासाठी पाठवला.

***

तपासपथक त्यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एका कौलारू घरासमोर येऊन दाखल झाले. साहेबांनी दरवाजावर थाप मारली. थोड्याच वेळात एका तरुणीने दरवाजा उघडला.

''इथे मंजिरी कोण?''

''मीच आहे. का? काय झालं साहेब?''

''तुमच्याकडे थोडं काम होतं.''

''बोला ना साहेब. माझ्याकडे काय काम होतं?''

''तुम्ही आदेशला ओळखता?''

''हो. तो भाऊ लागतो माझा.''

''फक्त भाऊ? तुमचे आणि आदेशचे नेमके काय संबंध आहेत ते आम्हाला समजलंय. त्यामुळे आम्हाला मदत करणं तुमच्या भल्याचं आहे.''

''बरं साहेब. सांगा काय करायचं ते.''

पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे मंजिरीने आदेशला फोन केला.

''अरे कुठे आहेस? भेटायचं होतं तुला.''

''आज एकदम लईच लाडात आलीया माजी रानी... आँ? एकदम भेटायचं म्हणती?''

''हां.... रानी म्हनतो आणि भेटायचं टाळतोस होय?'' मंजिरी बेमालूम नाटक करत म्हणाली.

''नाही गं जरा गडबडीत हाय

आदेश ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी आलाच नाही. एक प्रयत्न वाया गेला, पण पोलीस हार मानणार नव्हते.तो गावात आल्याची माहिती तपासपथकाला कळली. मिळालेल्या माहितीनुसार साहेबांनी तत्परतेने कारवाई करत अन्य एका पथकाला त्याला पकडण्यासाठी तातडीने रवाना होण्याची सूचना केली.

म्या, म्हणून जमायचं न्हाई. बाकी काईच नाय.''

''तुझं प्रिम असेल माज्यावर तर तू नक्की भेटशील मला– मी सांगते तिथे, मी सांगीन त्या वेळी. न्हाईतर तुजं तोंड पुन्हा दावायचं न्हाई मला.'' एवढे बोलून मंजिरीने फोन बंद केला.

मंजिरीने बोलावलेल्या ठिकाणी तिला भेटायला आदेश येणार असल्याने पोलीस आता आदेशला पकडण्याच्या तयारीत होते. पण आदेश ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी आलाच नाही. एक प्रयत्न वाया गेला, पण पोलीस हार मानणार नव्हते.

तो गावात आल्याची माहिती तपासपथकाला कळली. मिळालेल्या माहितीनुसार साहेबांनी तत्परतेने कारवाई करत अन्य एका पथकाला त्याला पकडण्यासाठी तातडीने रवाना होण्याची सूचना केली. साहेबांच्या सूचनेनुसार पोलिसांनी आदेशला गावातूनच ताब्यात घेतले. आदेशला घेऊन पोलिसांचे वाहन त्वरेने एमआयडीसी वाळुंज पोलीस ठाण्याच्या दिशेने मार्गस्थ झाले. तपासपथक पोलीस ठाण्याच्या आवारात शिरताच पूर्ण रस्ताभर स्वत:चे तोंड अखंडपणे सुरू ठेवणारा आदेश एकाएकी गप्प झाला. पोलिसांनी तांत्रिक तपास करून आदिनाथलाही ताब्यात घेतले. पोलिसांनी गुन्हा घडला त्यावेळचे दोन्ही आरोपितांचे कपडे त्याच्याकडून हस्तगत केले.

''का मारलं तुम्ही त्यांना?''

''आम्ही मारलं? काहीतरीच काय साहेब?''

''हे बघ आदेश, तू तर थापा मारूच नकोस आम्हाला. कारण खोटं बोलण्याचे काय परिणाम होतात हे तुला चांगलंच माहितीये. तुला आधीही दुसऱ्या एका प्रकरणात अटक झाली आहे. त्यामुळे ते परत एकदा घडू नये असं वाटत असेल तर

सांगू टाक. का मारलं तुम्ही दोघांनी तुमच्या वडिलांना?''

साहेबांच्या या प्रश्नावर तो गप्प राहिला. साहेबांनी आपला मोर्चा आता आदिनाथकडे वळवला.

''आदिनाथ नाव ना तुझं?'' समोर उभ्या असलेल्या आदिनाथच्या शर्टाची कॉलर नीट करत साहेबांनी विचारणा केली. साहेबांच्या या प्रश्नावर त्याने होकारार्थी मान हलवली.

''हे बघ आदिनाथ, तू सांगून टाक. नाही सांगितलं तर तुझ्या भावाला पूर्वीचा अनुभव आहे, त्यामुळे त्याला सवयीचं असू शकतं. पण तुझं काय? तुला खोटं बोलणं जड जाऊ शकतं.''

हे बोलणे ऐकून आदिनाथच्या चेहऱ्यावरचा रंग उडाला.

''मी घरी आला तेव्हा हा भांडत होता दादांशी आणि आई तिथे उभी होती.''

''मग पुढे?''

आता आदिनाथने बोलायला सुरुवात केल्यावर आदेशपुढे खरं बोलण्यावाचून काही पर्यायच शिल्लक नव्हता.

''साहेब, मी घरी गेलो त्या दिवशी संध्याकाळी. मला पैसे हवे होते. मी जमिनीतला माजा हिस्सा मागितला तर काय मोठं पाप केलं? आज ना उद्या ती मला मिळणारच होती. पण वेळेला मिळाली नाही तर काय फायदा? म्हणून मी मागितला हिस्सा. तर ते म्हणाले तुला नाही मिळणार. एकवेळ मी एखाद्या गरजूला दीन, पण तुला न्हाई देणार. मग काय करणार? त्यात आमचं लग्न पण करून दिलं नाही. मग काय आम्ही बाकीच्या दोस्तांचे चाललेले सुखी संसारच बघत बसायचे. आम्हाला काय वाटत नसेल आमचं लग्न व्हावं? तर हे त्यालापण तयार नाहीत. म्हणायचे, 'तुम्ही काही कामधंदा करत नाही नीट, कुठल्या तोंडानी दुसऱ्याच्या लेकीबाळी सुना म्हणून आणू.' मग काय! त्या दिवशी पण त्यावरून बोलाचाली झाली

तुम्ही काही कामधंदा करत नाही नीट, कुठल्या तोंडानी दुसऱ्याच्या लेकीबाळी सुना म्हणून आणू.' मग काय! त्या दिवशी पण त्यावरून बोलाचाली झाली आमच्यात. तेवढ्यात हा आदिनाथ आला. ते तेच वाक्य बोलले. ते बोलणं ऐकून आमची सटकली. शेतातला विळा पडला होता. तो घेतला.

आमच्यात. तेवढ्यात हा आदिनाथ आला. ते तेच वाक्य बोलले. ते बोलणं ऐकून आमची सटकली... तिथे शेतातला विळा पडला होता. तो घेतला. खाली चाकू होता तोपण घेतला, आणि केला वार. तसं ते ओरडायला लागले. मग काय, घराबाहेर लोक जमा झाले. म्हणून आम्ही पळालो. तुम्ही शोध घेताय हे समजलं होतं, म्हणून मंजिरीनी बोलावलं तरी आलो नाही. पण शेवटी तुम्ही पकडलंच.''

पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेला चाकू व विळा मेमोरेंडम पंचनाम्याद्वारे हस्तगत केले. संकलित केलेल्या सर्व गोष्टी पोलिसांनी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठवून दिल्या. तसेच शवविच्छेदन अहवाल संपादित केला. पोलिसांनी दोन्ही आरोपितांविरोधात मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मा. न्यायालयाने समोर आलेले साक्षीपुरावे ग्राह्य धरून त्या दोघांना दोषी ठरवून भा.दं.वि कलम ३०२ अन्वये आजीवन कारावास आणि प्रत्येकी २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास छत्रपती संभाजीनगर येथील एमआयडीसी वाळुंज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कृष्णकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर, पोलीस अंमलदार विठ्ठल शिंगाडे, बी. ए. बोर्डे, एम. एस. सैय्यद यांनी अतिशय चपळाईने पूर्ण केला आहे.■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

कै. रामराव नारायण हाटे

दिवंगत
हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ

कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे

बक्षिस योजना

श्री. रमेश रामराव हाटे (Bombay Helpline Consultancy Services India Pvt. Ltd.) व Smt. Laxmidevi Ram Narayan Hate Charitable Trust यांच्याकडून त्यांचे दिवंगत वडील रामराव नारायण हाटे, तत्कालीन पोलीस अधीक्षक, क्राईम ब्रांच २, सीआयडी आणि दिवंगत आई लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे यांचे स्मरणार्थ दिलेल्या रकमेतून दक्षता मासिकातील सर्वोत्कृष्ट तपासकथा, लेख/कविता/कथा यांच्यासाठी दरमहा बक्षीस योजना सुरू करण्यात आली आहे.

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे एप्रिल २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:

तपशील	तपासकथा/ लेख/कविता यांचे नाव	विजेत्याचे नाव	रक्कम
सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक	विश्वासघाताचा बळी	श्री. नितीन ढेरे, पोलीस निरीक्षक, जयगड पोलीस ठाणे, रत्नागिरी	रु. ७,०००/-
सर्वोत्कृष्ट तपासकथा व्दितीय क्रमांक	आमिष	अतुल झेंडे, तत्का. उपविभागीय पोलीस अधिकारी, नाशिक (ग्रामीण)	रु. ५,०००/-
सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता प्रथम क्रमांक	युद्ध नको, बुद्ध हवा	रघुनाथ मोहिते, मुंबई	रु. ३,०००/-
सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता व्दितीय क्रमांक	ऊब मायेची	प्रशांत जोशी, छत्रपती संभाजीनगर	रु. २,०००/-

सोशल मुशाफिरी

महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांमधील पोलीस दलांच्या अधिकृत ट्विटर (आता एक्स) हॅन्डलवर त्या त्या भागातील महत्त्वाच्या घडामोडी, गुन्हे तपास, उपक्रम यांची माहिती देणाऱ्या काही पोस्ट्स.

पिंपरी चिंचवड पोलीस, २१ एप्रिल

अंमली पदार्थ विरोधी पथकाची संघटित रॅकेटवर कडक कारवाई

NDPS व MCOCA अंतर्गत गुन्हे दाखल; टोळीवर एकूण १५ गुन्हे, त्यापैकी ०७ अंमली पदार्थांशी संबंधित.

०५ आरोपी अटक

₹८,६१,९०० किंमतीचा मुद्देमाल जप्त

नाशिक शहर पोलीस, २१ एप्रिल

नाशिक शहर पोलीस अंमली पदार्थांविरोधात शून्य सहनशीलतेची कारवाई सुरूच मागील आठवड्यातही बॅक-टू-बॅक दोन धाडींत ४ आरोपी जेरबंद,

₹६.५८ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त.

१५.०४.२०२६ : सातपूर परिसरात कारवाई, २ आरोपी ताब्यात

१६.०४.२०२६ : पेठ रोड परिसरात कारवाई, २ आरोपी ताब्यात

अकोला पोलीस, २० एप्रिल

'अपघातमुक्त अकोला'साठी प्रशासनाची धडपड;

eDAR ॲपचा ॲक्शन मोड, महामार्गावरील १० हून अधिक अपघात स्थळांची (ब्लॅक स्पॉटची) मा.पोलीस अधीक्षक व इतर प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी! ठोस उपाययोजना निश्चित...!

कोल्हापूर पोलीस, २५ एप्रिल

वार्षिक तपासणी २०२६ । कोल्हापूर पोलीस

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत कोल्हापूर पोलीस दलाची वार्षिक तपासणी पार पडली. कामकाजाचा आढावा आणि मार्गदर्शन यामुळे पोलीस दलाला नवी ऊर्जा मिळाली आहे.

पाककृती

हेल्दी नाचणी पिझ्झा

नाचणी पिझ्झा

साहित्य:

१०० ग्रॅम नाचणी पीठ

७० ग्रॅम ज्वारी पीठ

१ कांदा

७–८ ठेचलेला लसूण

१ सिमला मिरची

१ टोमॅटो

१ टेबलस्पून कोबी

२ चीझ क्यूब्स

५० ग्रॅम पनीर तुकडे

१ टेबल स्पून शेजवान सॉस

२ टेबलस्पून टोमॅटो सॉस

१ टीस्पून बटर

चवीपुरते मीठ

कृती:

१. प्रथम सर्व भाज्या उभ्या कट करून घ्या. लसूण ठेचून घ्या.

२. एका प्लेटमध्ये नाचणी पीठ व ज्वारी पीठ घेऊन त्यात चवीपुरते मीठ टाका. तव्यावर पाणी टाकून गरम झाल्यावर पिठात टाका व भरपूर मळून घ्या. चांगले मळल्यामुळे पिठास मऊपणा येतो. प्लेटमध्ये थोडेसे नाचणी पीठ भुरभुरून जाडसर भाकरी थापून घ्या. भाकरीच्या दोन्ही बाजू भाजून झाल्यावर गॅसवर फुगवून घ्या.

३. भाकरी किंचित गरम असताना फुगलेल्या भाकरीचा वरील भाग अलगदपणे चाकूने कट करून घ्या. एका बाऊलमध्ये शेजवान सॉस व टोमॅटो सॉस मिक्स करून भाकरीच्या पापुद्रा काढलेल्या भागात लावून घ्या. वरून पापुद्रा लावून त्याच्या वरील बाजूला तयार सॉस व बटर लावून घ्या.

४. त्यावर चिरलेला कांदा, सिमला मिरची, कोबी, ठेचलेला लसूण, टोमॅटो अशा सगळ्या भाज्या एकावर एक घालून त्यावर पनीरचे तुकडे टाका. व शेवटी भरपूर चीज किसून घ्या.

पर्पल कॅबेज सॅलड

५. गॅसवर निर्लेप तवा ठेवून त्यावर बटर टाका. नंतर तयार नाचणी पिझ्झा ठेवून झाकण ठेवा आणि मध्यम गॅसवर तीन ते चार मिनिटे शिजू द्या (चीज थोडेसे वितळेपर्यंत). नंतर एका प्लेटमध्ये काढून घ्या. हेल्दी पिझ्झा तयार आहे.

पर्पल कॅबेज सॅलड

साहित्य:

१ भांडे भरून पर्पल कॅबेज बारीक चिरून

पिवळी सिमला मिरची बारीक कापलेली

ब्रोकोली एक मोठी वाटी भरून बारीक तुरे काढून

१ सफरचंद बारीक चिरून

१ वाटी हिरवा कोबी बारीक चिरलेला

२ चमचे मध

२ छोटे चमचे मिरी पावडर

चवीनुसार मीठ

१ टेबलस्पून ऑलिव्ह ऑइल

१ मोठा चमचा किसमिस

१ चमचा मॅरीनेटेड ब्लॅक ऑलिव्ह

२ चमचे लिंबाचा रस

कृती:

१. नॉनस्टिक पॅन गॅसवर ठेवून त्यामध्ये ऑलिव्ह ऑइल घाला. मग पर्पल व हिरवा कोबी घालून छान फ्राय करा. मोठा गॅस ठेवा. दोन मिनिटे झाली, की पिवळी सिमला मिरची व ब्रोकोली घालून तेही दोन मिनिटांसाठी मोठ्या गॅसवर फ्राय करा.

२. सगळ्यात शेवटी सफरचंदाचे तुकडे घाला आणि मग मीठ व पेपर पावडर घालून, लिंबाचा रस घालून व्यवस्थित परता. गॅस मोठाच ठेवा.

३. त्यामध्ये किसमिस, मध व ऑलिव्ह घालून गॅस बंद करा. गॅस बंद केल्यावर दोन मिनिटांसाठी परता, कारण पॅन गरम असतो व त्यामध्ये सगळे एकजीव होते. खाली उतरवून पूर्ण गार करून नंतर फ्रीजमध्ये ठेवून थंडगार सर्व्ह करा. ■

शब्दकोडे



आडवे शब्द

१. नलपत्नी ३. एक पालेभाजी ५. प्रियकर, भ्रतार ७. महाभारत काळापासून उल्लेख आलेला एक पक्षी ९. निगराणी ११. आर्द्र आणि घामाच्या धारा काढणारी हवा १३. रास्त १४. पक्षी १५. समई १६. बरोबरी २०. उमराव, जमीनदार २३. राज्यशकट हाकणारी यंत्रणा २४. रीतभात, पद्धत २७. एका मराठी लेखकाच्या नावाची आद्याक्षरे २९. सपत्नी ३०. काल्पनिक सुंदर स्त्री ३१. चौकी ३२. पुरुष

उभे शब्द :

१. मध्यस्थ २. धनुष्यबाण ३. प्राचीन भारतातील थोर राजनीतिकार व अर्थशास्त्रज्ञ ४. सिंह ६. चिन्ह ८. भांडण १०. दुष्ट, वाईट काम करणारा १२. धनुष्याची प्रत्यंचा ताणल्यावर निर्माण होणारा ध्वनी १३. सातारा जिल्ह्यातील एक ऐतिहासिक शहर १४. कोवळ्या दुधाचा पदार्थ १७. ताप येण्यापूर्वी अंग मोडून येण्याची स्थिती १८. एक अप्सरा १९. मोरांचा आवाज २१. भाजी २२. उंबरठा २५. त्रास २६. पगार २८. एक शहर

दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-

एप्रिल २०२६ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : _____

पत्ता : _____

_____ मोबाईल : _____

अकाऊंट नं : _____ आयएफएससी कोड _____

दै	नं	दि	नी	■	नि	दा	न	■	र
ना	द	■	लां	ड	गा	■	का	र	वी
■	कि	ता	ब	■	हे	रं	ब	■	कि
अ	शो	का	री	ष्ट	■	ज	■	सा	र
वि	र	स	■	■	■	ना	रा	य	ण
ना	■	तू	तू	मै	मै	■	वा	ली	■
श	री	र	■	ना	ल	स्ती	■	■	का
■	त	■	सं	■	■	■	चे	ह	रा
उ	भा	दा	वा	■	म	■	ला	ज	■
र	त	■	द	शा	न	न	■	र	मा

लाखो वाचक

ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...

आपली प्रत आजच राखून ठेवा!



महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय् खलनिग्रहणाय्

पत्रव्यवहारासाठी पत्ताः
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१
mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine May 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय

प्रेषक :

सरसंपादक, दक्षता

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

प्रति,